सोलापूर तरुण भारत
आसमंत

**नुकतीच मोदी सरकारने आपल्या कारकिर्दीची एकूण ११ वर्षे पूर्ण केली. ही ११ वर्षे सर्वच क्षेत्रांतील सर्वांगीण प्रगतीची आणि परिवर्तनाची ठरली आहेत. त्यानिमित्ताने मागील दशकभरात लिहिल्या गेलेल्या विकासाच्या या नवअध्यायाचा मागोवा घेणारा हा लेख...**

# मोदी सरकारची ११ वर्षे: भारताच्या परिवर्तनातील ऐतिहासिक टप्पा

गौरव

**हरदीप एस. पुरी**



'लोकशाहीमध्ये उपेक्षित आणि वंचित जनतेला पुरवल्या जाणाऱ्या वस्तू आणि सेवांच्या वितरणामध्ये उच्च दर्जाची तपासणी हा एक महत्त्वाचा घटक असतो. भारतात या तपासणीचे निकष काटेकोर आहेत. कोणतीही घोषणा वस्तुनिष्ठतेशिवाय आणि कोणताही दावा परिणामांशिवाय टिकाव धरत नाही. खरे परिवर्तन हे तळागाळापर्यंत पोहोचायला हवे. कारण, आपल्या लोकशाहीत 'अंत्योदय' हाच मतदाता असतो. म्हणूनच 'मोदी ३.०'च्या एका वर्षाच्या कार्यकाळात दिल्ली, महाराष्ट्र आणि हरियाणात मिळालेला प्रचंड जनादेश हा केवळ राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा टप्पा नसून, आजच्या भारतात वक्तृत्वाने नव्हे, तर वितरणानेच विश्वास संपादन केला जातो, या गोष्टीचा वस्तुपाठ आहे.

'सर्वोदय ते अंत्योदय' या तत्त्वज्ञानावर आधारित कार्यक्रम देशाच्या विकासात एकही भारतीय मागे राहणार नाही, याची काळजी घेतात. २५ कोटींहून अधिक नागरिकांना बहुआयामी गरिबीतून वर काढण्यात आले आहे. 'प्रधानमंत्री किसान सन्मान निधी' अंतर्गत ११ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना ३.६८ लाख कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले आहे. 'लखपती दीदी' उपक्रमाने एक कोटींहून अधिक ग्रामीण महिलांना एक लाख रुपयांहून अधिक वार्षिक उत्पन्न प्राप्त करण्यासाठी सक्षम केले आहे. 'प्रधानमंत्री आवास' योजनेंतर्गत जवळजवळ तीन कोटी घरे मंजूर करण्यात आली आहेत.

'जलजीवन मिशन'ने १५.४४ हून अधिक ग्रामीण कुटुंबांना नळाच्या पाण्याची जोडणी दिली आहे. 'आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजने'चा विस्तार करण्यात आला असून, ७० किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या कोणत्याही उत्पन्न गटातील सर्व नागरिकांना दरवर्षी पाच लाख रुपयांचे मोफत आरोग्य संरक्षण देण्यात येईल. याचा लाभ अंदाजे सहा कोटी ज्येष्ठ नागरिकांना मिळणार असून, ज्याद्वारे त्यांना सर्वसमावेशक आरोग्यसेवा आणि आर्थिक संरक्षण मिळेल, अशी अपेक्षा आहे. याशिवाय, पहिल्या फळीतील वस्ती पातळीवरील आरोग्य सेवा कर्मचार्यांचा समावेश करण्यासाठी या योजनेचा विस्तार करण्यात आला. हे आश्चर्यकारक आकडे म्हणजे, केवळ आकडेवारी नसून, लाखो भारतीय कुटुंबांमधील परिवर्तनाच्या कथा आहेत.

दहशतवाद्यांकडून निष्पाप पर्यटकांना लक्ष्य करण्यात आलेल्या पहलगाम हल्ल्याला दिलेल्या जलद आणि चोख प्रत्युत्तरातून दहशतवादाविरोधातील भारताच्या शून्य सहनशीलतेच्या धोरणाप्रति पंतप्रधानांची वचनबद्धता स्पष्ट झाली आहे. देशाने या हानीबद्दल शोक व्यक्त केला. पण, एकजुटीने उभे राहून 'ऑपरेशन सिंदूर' अचूकतेने आणि वर्चस्वाने राबवून दहशतवादाशी लढण्याचा आणि आपल्या नागरिकांचे रक्षण करण्याचा आपला दृढनिश्चय पुन्हा एकदा अधोरेखित केला. भारतीय संरक्षणदलांचे तांत्रिक आणि धोरणात्मक श्रेष्ठत्व जगाने पाहिले, ज्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर आणि निर्णायक नेतृत्वाचे पाठबळ आहे.

दृढ राजकीय इच्छाशक्तीला स्वावलंबनातील धोरणात्मक गुंतवणुकीची साथ मिळते. 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान भारताच्या जलद, अचूक कामगिरीला, संरक्षण क्षमतेच्या स्वदेशीकरणावर गेली अनेक वर्षे लक्ष केंद्रित केल्यामुळे काही अंशी बळ मिळाले. २०१४ सालानंतर भारताच्या संरक्षण उत्पादनाचे झपाट्याने आधुनिकीकरण झाले असून, निर्यातीत लक्षणीय वाढ झाली आहे. हे परिवर्तन आकस्मिक नाही. 'आत्मनिर्भर भारत'



२०१४ २०१९

अभियानांतर्गत, 'संरक्षण अधिग्रहण प्रक्रिया (डीएपी)', 'संरक्षण उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहन धोरण (डीपीईपीपी)' आणि काही क्षेत्रांसाठी १०० टक्के 'एफडीआय' खुले करणे, यांसारख्या प्रमुख सुधारणा, स्वदेशी कंपन्यांना भरभराटीला येण्यासाठी उपयोगी ठरल्या. ड्रोन आणि घटकांसाठी दोन समर्पित 'पीएलआय योजना' सुरू केल्यामुळे पुढील पिढीतील नवोन्मेशाला आणखी चालना मिळाली.

आज भारताने डिझाईन केलेले क्षेपणास्त्र प्रणाली, चिलखती वाहने आणि नौदल प्लॅटफॉर्म केवळ आपल्या सैन्यात तैनात केले जात नाहीत, तर ८० हून अधिक देशांमध्ये निर्यात केले जातात, ज्यामुळे विश्वासार्ह संरक्षण भागीदारांवर जगाचा विश्वास



२०२४

वाढत असताना प्रादेशिक सुरक्षा प्रदाता म्हणून भारताची प्रतिमा बळकट होत आहे. उत्पादन हे या दृष्टिकोनाच्या केंद्रस्थानी आहे. मोठ्या गुंतवणुकी आणि सरकारी प्रोत्साहनांमुळे भारत सेमीकंडटर क्षेत्रात प्रगती करत आहे. 'टाटा इलेट्रॉनिस' आसाममध्ये २७ हजार कोटी रुपये खर्चाचा सेमीकंडटर असेम्ब्ली आणि टेस्टिंग प्लांट उभारत आहे, जो २०२५ सालच्या मध्यापर्यंत सुरू होण्याची शयता असून, या ठिकाणी सुमारे २७ हजार रोजगार निर्मितीची अपेक्षा आहे. दरम्यान, 'एचसीएल' आणि 'फॉसकॉन' यांच्यातील ३ हजार, ७०६ कोटी रुपये खर्चाच्या संयुक्त उपक्रमातून उत्तर प्रदेशातील जेवर येथे डिस्प्ले ड्रायव्हर चिप्सवर लक्ष केंद्रित करून एक सेमीकंडटर युनिट स्थापन केले जाणार आहे, ज्याचे उत्पादन २०२७ साली सुरू होईल.

भारत ही आता जगातील तिसरी सर्वांत मोठी स्टार्टअप परिसंस्था असून, यामध्ये १.५७ लाखांहून अधिक मान्यताप्राप्त स्टार्टअप्स आहेत. ज्यामध्ये १०० हून अधिक 'युनिकॉर्न' आणि 'एआय', 'बायोटेक' आणि सेमीकंडटरवर लक्ष केंद्रित करणारे ३ हजार, ६०० हून अधिक डीप-टेक उपक्रम समाविष्ट आहेत.

आपल्या एकट्या अवकाश क्षेत्रातच २००हून अधिक स्टार्टअप्सची सुरुवात झाली असून, ती आत्मविश्वासपूर्ण नवोन्मेशी अर्थव्यवस्थेच्या उदयाचे संकेत देते. 'स्टार्टअप इकोसिस्टम'ने यापूर्वीच १७.२ लाखांहून अधिक थेट रोजगार निर्माण केला असून, समस्यांचे निराकरण करणाऱ्या आणि उद्योजकांच्या नवीन पिढीला चालना दिली आहे.

दरम्यान, भारत स्थिरपणे जगातील सर्वांत 'कनेटेड लोकशाही' म्हणून उदयाला आला आहे. ८० कोटींहून अधिक इंटरनेट वापरकर्ते आणि १३६ कोटी आधार नोंदणीसह हा जगातील सर्वांत मोठा डिजिटल ओळख कार्यक्रम आहे. आता जागतिक डिजिटल पेमेंटमध्ये आपला वाटा ४६ टक्के आहे, जो 'यूपीआय'सारख्या प्लॅटफॉर्मद्वारे चालवला जातो आणि ज्याने आर्थिक व्यवहारांचे लोकशाहीकरण केले आहे. या प्रणालींनी केवळ नागरिकांना सक्षम बनवले नसून, प्रशासनाला अधिक सतर्क, जलद आणि अधिक पारदर्शक बनवले आहे.

२०२४-२५ सालच्या केंद्रीय अर्थसंकल्पात आपल्या सरकारच्या निर्णयक्षमतेचे प्रतिबिंब उमटले आहे. यामध्ये एकूण ४४.६ लाख कोटी इतका खर्च अपेक्षित होता, तर भांडवली खर्च दहा लाख कोटी इतका अभूतपूर्व पातळीवर पोहोचला. कर सवलती वाढवण्यात आल्या. मध्यमवर्गीयांसाठी सवलती दुप्पट करण्यात आल्या आणि स्टार्टअप्ससाठी दीर्घकाळापासून चिंतेचा विषय असलेला एंजल टॅस रद्द करण्यात आला. या सुधारणांमुळे उपभोग बळकट होत असून, उद्योजकतेला चालना मिळते आणि भारताच्या दीर्घकालीन विकासाचा मार्ग मजबूत होतो. 'मोदी ३.०'ला एक वर्ष पूर्ण होत असताना ही गती अचूक आहे. रस्ते, कारखाने आणि सौर पॅनेल ही केवळ प्रगतीची चिन्हे नसून, ती आकांक्षेचा पाया आहेत. आर्थिक, सामाजिक आणि धोरणात्मक अशा प्रत्येक क्षेत्रात भारत राष्ट्रीय पुनरुज्जीवनाचा एक नवीन अध्याय लिहीत आहे. आदेश स्पष्ट आहे.




दृष्टिकोन अबाधित आहे आणि पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली निर्णायक दशक सुरू आहे. इतिहास या कालखंडाला केवळ जलद विकासाचा टप्पा म्हणून नव्हे, तर भारताने विश्वास ठेवला, परिवर्तन केले आणि नेतृत्व केले, तो क्षण म्हणून नोंदवेल.

(लेखक केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूमंत्री आहेत.)

# सुरक्षित विमान प्रवासावर प्रश्नचिन्ह!



**अहमदाबादच्या सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून गुरुवारी लंडनमधील गॅटविक विमानतळाच्या दिशेने झेपावलेले एअर इंडियाचे विमान विमानतळालगतच्या मेघानीनगर वस्तीतील बी. जे. मेडिकल कॉलेजचा परिसरातील विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाच्या इमारतीवर आदळले आणि त्याने पेट घेतला. या अपघातात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांच्यासह २६१ प्रवाशांना प्राण गमवावे लागले आहेत. देशातील या सर्वात मोठ्या विमान अपघातामुळे सुरक्षित विमान प्रवासावर प्रश्नचिन्ह निर्माण झोल आहे. अनेक स्वप्ने उराशी बाळगून लंडन, पोर्तुगाल, कॅनडा या देशांकडे निघालेल्या भारतीय प्रवाशांचा यात अकाली बळी गेला.**

निमित्त

**प्रतिनिधी**

एअर इंडियाच्य या विमानाने उड्डाण घेतल्यावर काही क्षणांतच कॉकपिटमधून 'मायडे' कॉल देण्यात आला होता. हा कॉल म्हणजेच आपत्कालीन परिस्थिती दर्शविणारा संकेत. पण त्यानंतर लगेचच एअर ट्रॅफिक कंट्रोलशी संपर्क तुटला आणि काही क्षणांतच लोकांनी आकाशातून धूर आणि अग्नीच्या ज्वाळा पडताना पाहिल्या. ही घटना संपूर्ण देशाला हादरवणारी ठरली आहे. या विमान अपघाताची दृश्ये दृश्ये अंगावर काटा आणणारी आहेत. प्रत्येक माणूस दु:खातिरेकाने स्तब्ध झाला आहे. जगातील भयंकर विमान अपघातांपैकी हा एक आहे. या घटनेने संपूर्ण देश हादरला. ज्या इमारतीवर विमान कोसळले तेथील काही डॉक्टरांनाही जीव गमवावा लागला. ही घटना केवळ विमान अपघाताची नाही, तर मानवी जीवनाच्या अनमोल मूल्यांची आणि सुरक्षिततेच्या जबाबदारीची आठवण करून देणारी आहे. यातून सुदैवाने वाचलेला एकमेव विश्वेशकुमार रमेश वगळत सर्व प्रवाशांनी आपले प्राण गमावले. ही आकडेवारीच या अपघाताची भीषणता दर्शविते. आता विमानतळ प्राधिकरण, केंद्र व राज्य सरकारच्या तपास यंत्रणा या अपघाताची संभाव्य कारणे शोधत आहेत. त्यात इंजिनात बिघाड, काही तांत्रिक दोष, (पान ४ वर)

# चिनाब सेतू काश्मीरचा नवा आकर्षणबिंदू

**जगातील सर्वात उंच रेल्वे पूल जम्मू-काश्मीरमधील चिनाब नदीवर तयार करण्यात आला आहे. या पूलामुळे काश्मीरचे खोरे देशाच्या इतर भागांशी जोडले जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगातील सर्वात उंच असलेल्या या चिनाब पुलाचे नुकतेच उद्घाटन केले. हा सेतू अभियांत्रिकी चमत्कार समजला जातो. हा पूल जम्मू काश्मीरच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकासात मोठी भर घालणारा असून काशश्मीरचा नवा आकर्षणबिंदू म्हणून जग त्याकडे पाहत आहे. चिनाब सेतूमुळे काश्मीर खोऱ्याला उर्वरित भारताशी जोडले गेल्याने काश्मीरसाठी प्रगतीचा नवा अध्याय सुरू झाला आहे.**

लक्ष्यवेध

**प्रतिनीधी**

काश्मीर खोऱ्याला उर्वरित भारताशी जोडणाऱ्या महत्वाकांक्षी प्रकल्पाचा एक भाग म्हणून चिनाब सेतूकडे पाहिले जात आहे. या सेतूची संकल्पना अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळातच विचाराधीन होती. या प्रकल्पाला त्यावेळी राष्ट्रीय प्रकल्प म्हणून ओळखले गेले होते. तथापि, २००४ मध्ये काँग्रेसच्या नेतृत्वात केंद्र सरकार स्थापन झाल्यानंतर या प्रकल्पाची गती मंदावली. २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने या प्रकल्पाला वेग देण्यात आला. आता या सेतूचे निर्माणकार्य पूर्ण करण्यात आले आहे. पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झाल्यानंतर आता या पुलावरून वंदे भारत आणि इतर गाड्यांचा प्रवास सुरू झाला आहे. या सेतूमुळे भारत आता (पान ४ वर)



विश्वसंचार

मल्हार कृष्ण गोखले

# नकाशा : ज्ञान आणि मनोरंजनाचा खजिना

नजीकच्या भविष्यात पाकिस्तानची फाळणी होईल का, याबद्दल जाणून घेताना आपण गेल्या दोन लेखां ध्ये बलुचिस्तान आणि सिंध प्रांतांबद्दल माहिती घेतली होती. आता बघू या वायव्य सरहद्द प्रांताकडे.

प्रिय वाचक, गेले तीन आठवडे आपण 'विश्वसंचार' स्तंभातून पाकिस्तानच्या बलुचिस्तान, सिंध आणि वायव्य सरहद्द प्रांत या राज्यांमध्ये काय घडामोडी घडत आहेत; ती राज्ये पाकिस्तानातून फुटून बाहेर पडायला कशी आणि का उत्सुक आहेत, पण त्यांना ते खरोखर शक्य होणार आहे का आदी मुद्यांचा विचार केला. बऱ्याच वाचकांनी दूरध्वनी वा समाजमाध्यमांद्वारे जो संवाद केला, त्यावरून असे लक्षात आले की, त्यांना पंजाब प्रांत पाकिस्तानात कसा? असा प्रश्न पडलेला आहे. या प्रश्नाचे मूळ हे आहे की, आपण नकाशा ही वस्तू बघतच नाही.

आपण तो नकाशा शाळेतच सोडून आलो आहोत. म्हणून मी अनेकदा वाचकांना विनंत करीत असतो की, 'विश्वसंचार' वाचताना सोबत एक चांगला ॲटलास घेऊन बसा. विषय मांडणीमध्ये कोणताही भौगोलिक संदर्भ आला की, ॲडलास उघडून तो देश, तो प्रांत, ते शहर, गाव, पर्वत, नदी, समुद्र हे नेमके कुठे आहे, हे मुद्दाम पाहा, समजून घ्या आणि मग पुढे वाचा. यामुळे वर्तमान बातमी, तिच्या पाठीमागचा इतिहास आणि भूगोल यांची आपली समजूत एकदम पक्की होईल. अगदी हेच टॉम हार्परही सांगतायत. ते म्हणतात, ''नकाशा ही भिंतीवर टांगलेली एक वस्तू नसून, नकाशा पाहण्यातून, समजावून घेण्यातून आपली समजूत वाढत असते.'' टॉम हार्पर हे लंडनच्या ब्रिटिश लायब्ररीच्या नकाशा विभागाचे प्रमुख आहेत. आता प्रथम ब्रिटिश लायब्ररी ही काय संस्था आहे, हे पाहूया.


मध्य लंडनमध्ये ब्रिटिश म्युझियम हे जगद्विख्यात वस्तुसंग्रहालय आहे. ते सन १७५३ साली स्थापन झाले. त्यात इतर असंख्य मौल्यवान वस्तूंप्रमाणेच हजारो ग्रंथ होते. १९७३ साली म्हणजे तसे पाहता हल्लीच ५०-५२ वर्षांपूर्वी ही सगळी ग्रंथसंपदा वेगळी काढून ब्रिटिश लायब्ररीची स्थापना करण्यात आली. लंडनचा ह्युस्टन रोड रेल्वे स्थानकाजवळ हे राष्ट्रीय ग्रंथालय आहे.

इथे एकंदर १७ कोटी वस्तू आहेत. त्यापैकी १ कोटी ३९ लक्ष ५० हजार पुस्तके आहेत. ३ लाख ५१ हजार ११६ हस्तलिखिते आहेत. ४३ लक्ष ४७ हजार ५०५ नकाशे आहेत. ८२ लक्ष ६६ हजार २७० डाक तिकिटे म्हणजे स्टॅम्पस् आहेत. १६ लक्ष ७ हजार ८८५ संगीताच्या रेकॉर्डस् आहेत आणि ६० लाख रेकॉर्डिंग्ज म्हणजे संगीत मैफली किंवा नामवंत व्यक्तींची भाषणे लाईव्ह रेकॉर्ड केलेली अशी आहेत. ब्रिटिश लायब्ररी हे ब्रिटनो राष्ट्रीय ग्रंथालय असल्यामुळे ग्रंथालय कायद्यानुसार ब्रिटिश भूमीवर प्रकाशित होणारे प्रत्येक नवे पुस्तक आपोआपच इथे येते. त्यामुळे या संग्रहात सतत भर पडत असते. दुसऱ्या महायुद्धापूर्वी जागतिक महासत्ता असलेला ग्रेट ब्रिटन हा देश दुसऱ्या महायुद्धात जिंकला खरा; पण त्याचा इतका भीषण शक्तिपात झाला की, एकंदर जागतिक क्रमवारीत तो 'थर्ड क्लास' देश ठरला. उलटणाऱ्या प्रत्येक दशकाबरोबर तो पुन्हा वर येण्याऐवजी आणखी खालीखालीच चाललाय, असे तज्ज्ञ लोक म्हणतात. दुसऱ्या महायुद्धात पराभूत झालेले नि बेचिराख झालेले जर्मनी, जपान कुठल्या कुठे पोहोचलेत; ब्रिटन मात्र चाललाय आपला कडेकडेने! ते कसेही असो, पण पुन्हा वर येण्याची इच्छा ब्रिटिशांच्या अंतर्मनात आहे, हे दाखवणारे चिन्ह म्हणजे ब्रिटिश लायब्ररीचा अर्थसंकल्प.

नव्या युगात ज्ञानाला अतोनात महत्त्व आहे; किंबहुना ज्ञान आणि शक्ती यांच्या जोरावरच आपण पुन्हा वर येऊ, हे ब्रिटिशांनी नेमके जाणलेले आहे आणि म्हणूनच ब्रिटिश लायब्ररीचा वार्षिक अर्थसंकल्प आहे १४७.६ दशलक्ष स्टर्लिंग पौंड! असो. तर, एवंगुणविशिष्ट ब्रिटिश लायब्ररीने आपल्या संग्रहातल्या साडेत्रेचाळीस लक्ष नकाशांपैकी निवडक अशा फक्त २०० नकाशांचे एक प्रदर्शन सध्या भरवलेले आहे. अगोदर उल्लेख केलेले नकाशा विभागाचे प्रमुख टॉम हार्पर यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनीच हे २०० नकाशे निवडले आहेत.


प्रदर्शन पाहणाऱ्यांची भूगोलाची, नकाशा शास्त्राची, इतिहासाची, त्यातही विशेषत: गत शतकाच्या इतिहासाची समजूत हे नकाशे पाहता पाहता वाढावी, अशा अंदाजाने त्यांनी हे नकाशे निवडलेले आहेत. म्हणून त्यांनी प्रदर्शनाला नाव दिलंय 'मॅप्स अँड दि ट्वेंटिएथ सेंचुरी!' नकाशा बनवण्याचे शास्त्र कुणी शोधून काढले, हा अर्थातच वादग्रस्त विषय आहे, पण आधुनिक काळापुरते बोलायचे तर सध्या प्रचलित असलेल्या नकाशा शास्त्राची- कार्टोग्राफीची सुरुवात युरोपात झाली. गेरार्डस् मर्केटर या फ्लेमिश भूगोलतज्ज्ञाने सन १५६९ साली पहिला आधुनिक नकाशा रेखाटला, असे मानले जाते. पण यानंतरही पुढची तीनशे-सव्वातीनशे वर्षे सर्वसामान्य माणसाला नकाशाचा फारसा उपयोग नव्हता.

लष्करी सेनापती, अधिकारी, दर्यावर्दी, व्यापारी, संशोधक हेच मुख्यत: नकाशे काढून घ्यायचे नि त्याचा उपयोग करायचे. सन १८९८ मध्ये अमेरिकेत हेन्री फोर्डने मोटार या नवीन वाहनाचा शुभारंभ केला. लोक अगोदर घोड्यावरून आणि घोडागाडीतून प्रवास करीतच होते. पण मोटारमुळे प्रवास करण्याचे प्रमाण वाढले नि तिथंपासून पुढे जगभर सतत वाढतच गेले. त्यामुळे नकाशा या वस्तूची मागणी वाढली. १९१४ साली युरोपात जर्मनी आणि फ्रान्स यांच्यात युद्ध जुंपले.




पाहता पाहता या युद्धाने अत्यंत विक्राळ रूप धारण करून संपूर्ण जगालाच कवेत घेतले. म्हणून त्याला महायुद्ध असे म्हणू लागले. महायुद्धामुळे विविध देशांच्या सेनादलांनी आपापल्या उपयोगानुसार लाखांनी नकाशे छापले. १९१८ साली संपलेल्या या महायुद्धाने खुद्द जगाचाच नकाशा बदलून टाकला. काही साम्राज्ये, काही देश नाहीसे झाले तर काही देश नव्याने जन्मले.

तशी साम्राज्यांची पतने आणि उत्थाने इतिहासाच्या प्रत्येक वळणावर होतच आलेली आहेत. पण यावेळेस ही पतने, नकाशांच्या माध्यमातून जगभर सर्वत्र सर्वसामान्यांच्या हातात गेली. त्यानंतर १९३९ ते १९४५ या कालखंडात अधिक संहारक, अधिक भीषण असे दुसरे महायुद्ध झाले. जर्मनी, फ्रान्स, ब्रिटन या महासत्ता संपल्या; तर अमेरिका, सोव्हिएत रशिया या नवीन महासत्ता उदयाला आल्या. म्हणजे नेमके काय घडले, हे शब्दांप्रमाणेच नकाशाच्या रेषांमधून जगभरच्या सर्वसामान्यांपर्यंत पोहोचले. दुसऱ्या महायुद्धाने वैज्ञानिक संशोधनाचा वेग प्रचंड वाढवला. तशी नकाशा शास्त्रातही भर पडली. समुद्र तळाचे नकाशे यापूर्वीही काढले गेले होते, पण त्यांचे उद्दिष्ट समुद्री वनस्पती, जलचर प्राणी, प्रवाळ बेटे इत्यादींचे शास्त्रीय संशोधन एवढेच होते. महायुद्धानंतर अमेरिकन नौदलाने युरोप खंड आणि अमेरिका खंड यांच्या दरम्यान पसरलेल्या अटलांटिक महासागराच्या तळाचा अतिशय तपशीलवार नकाशा बनवला.



कशासाठी? तर आपल्या अत्याधुनिक आण्विक पाणबुड्या कुठे कुठे लपवून ठेवता येतील, हे पाहण्यासाठी. अमेरिकन नौदलाने बनवलेला हा अत्यंत सुंदर नकाशा या प्रदर्शनात मुद्दाम मांडलेला आहे. अलिकडे वेगवेगळे विषय पटकन समजून देण्यासाठी जे तक्ते किंवा चार्ट्स वापरले जातात, तेही मुळात नकाशेच होत. अलिकडेच दिल्लीत धुक्यामुळे वाहतुकीचा प्रचंड घोळ झाला. हे धुके नैसर्गिक नसून प्रदूषणामुळे निर्माण झालेले होते.

त्यानिमित्ताने भारतातल्या आणि एकंदरच जगातल्या कोणकोणत्या प्रगत शहरांमध्ये भीती नि कसे प्रदूषण आहे, हे दाखवणारे अनेक तक्ते प्रसिद्ध झाले होते. हे सगळे एक प्रकारचे नकाशेच होत. नकाशांचा उपयोग प्रचारासाठीही करण्यात आलेला आहे. उदा. व्हिएतनाम युद्धात सततच्या संघर्षामुळे नि अमेरिकेने वापरलेल्या 'नापाम बॉम्ब' नावाच्या अतिशय बदनाम अस्त्रामुळे लोकजीवन कसे उद्ध्वस्त झालेय, हे नकाशाद्वारे दाखवून युद्धविरोधी प्रचार करण्यात आला होता. दुसऱ्या महायुद्धात प्रारंभी हिटलरच्या झंझावाती चढायांनी जवळ जवळ सगळा युरोप पादाक्रांत केला होता. पण १९४२ नंतर दोस्त राष्ट्रांनी हळूहळू जर्मनीला मागे रेटायला सुरुवात केली. हे सगळे त्यावेळी वृत्तपत्रांमधून नकाशांद्वारे दाखवून एक प्रकारे प्रचारच करण्यात आला होता.

जनतेने मनोबल वाढवण्यासाठी असा प्रचार आवश्यकच असतो. म्हणून नकाशा पाहणे आणि समजून घेणे हे फार फार आवश्यक आहे. आत्ताचाच विषय पुढे न्यायचा म्हटले तर भारतासह पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांचा नकाशा आपण जर नीट बघितला तरच आपल्या लक्षात येईल की, 'द ग्रेट गेम'मध्ये रशियाला थोपविण्यासाठी इंग्रजांन अफगाणिस्तान भारतापासून कसा तोडला? नंतर पाकिस्तान बनवताना पंजाब प्रांत कसा अर्धा पाककडे आणि अर्धा भारताकडे ठेवला? ऑपरेशन सिंधूनमध्ये भारताच्या वायुदलाने नेमके कुठे कुठे हल्ले चढवून पाकचे कंबरडे मोडून काढले? हे सर्व जेव्हा आपल्याला समजते, कळते किंवा खरे म्हणजे आकळते, तेव्हा आपल्याला खरा वाचनानंद मिळतो आणि मन उल्साहाने भरून जाते.

(लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

---

सुखात्म

डॉ. अविनाश मोहरील

# डक करता यावे!

त्याच्या कामामध्ये त्याला निराशा येऊ लागलेली असते. अशा निराशेच्या स्थितीमध्येच विचार करत तो रेल्वे स्टेशनवर बसलेला असतो. मनामध्ये नाही नाही ते विचार येऊ लागलेले असतात. आपल्याला करायचे काय आहे आणि आपण करतो काय आहे, या संभ्रम निर्माण करणाऱ्या विचित्र अवस्थेत बसला असतानाच त्याचे बॉस त्याला भेटायला येतात. बॉस त्याला विचारतात, ''काय झाले?'' त्याच्या मुळातच भिडस्त स्वभावामुळे तो सुरुवातीला काही सांगत नाही. पण बॉसच्या आग्रहास्तव तो त्याच्या मनातील निराशेचे कारण बॉसला सांगतो. तो सांगतो, ''सर, मला काय करावे सुचत नाही. ज्या क्रिकेट खेळासाठी मी ही नोकरी स्वीकारली ते मला काहीच करता येत नाहीये. मी सध्या रणजीपर्यंतच खेळू शकतोय. शिवाय येथे ड्युटी करावी लागते. एकूण विचार केला तर या प्लॅटफार्मवरून त्या प्लॅटफॉर्मवर धावण्यामुळे माझी केवळ धावण्याची प्रॅक्टिस होऊन जाते; परंतु खेळाचे काय करू सर? कधी कधी असे वाटते की, सारे सोडून निघून जावे. परंतु असा विचार आला की, बाबांचा चेहरा डोळ्यांसमोर येतो आणि मग मी पुन्हा प्लॅटफॉर्म ते प्लॅटफॉर्म धावणे सुरू करतो. सर, खरे सांगतो, मला आता नैराश्य येऊ लागलेय. हे काम आटोपून घरी जातो ना, तेव्हा प्रत्येक वेळी असे वाटते की, मैदानावर आऊट होऊन पॅव्हेलियनमध्ये परत येतोय. काही सुचत नाहीये सर.'' त्याचे बॉस त्याचे सारे बोलणे शांतपणे ऐकून घेतात. आपल्या कर्मचाऱ्यांना समजून घेऊन, त्यांच्यावर विश्वास दाखवून तसेच खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे राहणारे असे ते बॉस असतात. उगाच नियमांचा बडगा दाखवित स्वत:चे महत्त्व वाढविण्याचा प्रयत्न करणारे नसतात. आपल्या सोबत काम करणारा तो नवा मुलगा अडचणीत आहे, असे पाहून त्याला ते अत्यंत शांतपणे काही गोष्टी समजवतात. अनेक वेळा निराशेच्या क्षणी कुणीतरी सांभाळणारं हवं असते. अशावेळी आपल्या मनाची स्थिती आपल्याला कोणताही सकारात्मक विचार करू देत नाही. मनात येतात ते केवळ नकारात्मक विचार व त्या विचारांमुळे मानसिक स्थिती ढासळू लागते. अशावेळी आपल्या स्वत:ला त्यामधून सहसा बाहेर पडता येत नाही. तेथे कुणाच्या तरी सकारात्मक विचारांची गरज असते. आपल्या कर्मचाऱ्यांना मनापासून बळ देणारे व त्याची कामातील उपयोगिता व त्याचा विकास या दोन्ही बाबींकडे लक्ष देऊन प्रसंगी वरिष्ठांसमोर त्याला उघडे न पाडता, त्याला सांभाळून घेणारे ते बॉस त्या पोराला लाभले असतात व त्यामुळे त्याला त्याच्या या निराशेच्या स्थितीमधून त्याचे बॉस, त्याला पटेल अशा उदाहरणासह अलगद बाहेर काढतात. या प्रसंगी मला त्या बॉसच्या संवेदनशील मनाला सलाम करावा वाटतो. कारण ते या प्रसंगात कर्मचाऱ्यांना वठणीवर आणणारा अधिकारी म्हणून नाही तर त्यांना सांभाळणाऱ्या पित्याच्या भूमिकेतून बोलत असतात. ते बॉस निराशेने ग्रासलेल्या त्या मुलाला त्याच्या ग्राऊंडवरचेच काही प्रश्न विचारतात. सुरुवातीला ते ऐकून तो बिचकतो. नेमके बॉसला काय म्हणायचे आहे, ते त्याच्या लक्षात येत नाही. तो केवळ उत्तरे देत जातो. बॉस विचारतात, ते सारे जाऊ दे बेटा, मला एक सांग, जेव्हा तुला गोलंदाज फुलटॉस बॉल टाकतो तेव्हा तू काय करतो? तो उत्तरतो, मी हीट करतो. पुढे ते विचारतात, हाफ व्हॉली बॉल टाकला तर काय करतो? तो म्हणतो, ड्राईव्ह करतो. पुढचा प्रश्न, चांगला आऊट स्विंगर आला तर काय? तो सांगतो, सोडून देतो, चांगला इन स्विंगर आला तर? डीफेंड करतो. आणि शेवटचा प्रश्न ते विचारतात, जर खेळता न येणारा बाऊंसर आला तर काय करतो? तो म्हणतो डक करतो, म्हणजेच खाली वाकून तो बॉल विकेट कीपरकडे सरळ जाऊ देतो. यानंतर ते त्याला छोटासा, पण कामाचा संदेश सांगतात. ते त्याला सांगतात की, सध्याची तुझी स्थिती म्हणजे हा शेवटचा मी सांगितलेला न खेळता येणारा बाऊंसर आहे असे समज. आणि त्या बाऊंसरचा सामना मैदानावर करण्याकरिता तू जी पॉलिसी राबवतो तीच प्रत्यक्ष जीवनात वापर. त्याला डक कर. कारण हा बॉल खेळण्याचा प्रयत्न केला तर कॅच आऊट होण्याची किंवा कपाळमोक्ष होण्याची भीती असते. काही वेळ हे डक करणे सुरू ठेवावे लागेल.

एक लक्षात ठेव, प्रत्येक बॉल सारखा नसतो, तुला फुलटॉस मिळेलच तेव्हा हीट कर. म्हणजेच सध्याची परिस्थिती कायम राहणार नाही. दिवस पालटतील, तुला हवी तशी संधी मिळेल त्यावेळी त्याचा सर्वोत्तम वापर करून यशस्वी हो. एका छोट्याशा संदेशाने व संवादाच्या आधारे ते बॉस त्याला आधार देतात. त्याला ते सांगतात, इकडच्या कामाची चिंता करू नको; तू जो मोठ्या स्वप्नांकरिता संघर्ष करतोय त्याचा विचार कर. वरिष्ठांना काय सांगायचे ते मी सांगतो. मी तुझ्या सोबत आहे. क्रिकेटपटू महेंद्रसिंह धोनीच्या जीवनावरील चित्रपटामध्ये हा छोटासा परंतु महत्त्वाचा प्रसंग आहे. खरोखरीच आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात असे कित्येक प्रसंग येतात ज्यावेळी निराशेने मन ग्रासलेले असते. निराशेचा सामना सर्वच वयोगटातील लोकांना करावा लागतो. त्या निराशेच्या क्षणांमध्ये सर्वात महत्त्वाची भूमिका असते ती म्हणजे आपल्या मनाची. कारण नैराश्याचा पहिला प्रहार होतो तो आपल्या मनावर. निराशा मनाला दुबळी करते, मनावर ताबा मिळवते आणि मग त्याचा परीणाम होतो तो शरीरावर. त्यामुळेच कधी कधी या निराशेने ग्रासलेले मन शरीराला आपल्या बाजूने एवढे जास्त खेचते की त्याचे अस्तित्व संपवून टाकणारी कृतीदेखील याच मानसिक अवस्थांमध्ये केली जाते. कधी आर्थिक अडचणींचा ताण सहन न झाल्यामुळे मन निराश होते, तर कधी परीक्षेमध्ये गुण कमी मिळाले म्हणून जीवनातील यशस्वितेची ही एकमेव संधी होती असा भ्रम निर्माण होऊन मन खिन्न होते. कामाच्या ठिकाणी चांगली वागणूक मिळाली नाही व अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही तरी मन विषण्णतेकडे झुकायला लागते किंवा साऱ्या योग्यता असून अपेक्षित यश पदरात न पडल्यामुळे बरेच वेळा मनावर निराशेचा कब्जा होतो. अशा नैराश्य क्षणांमध्ये प्रसंगी शरीराचे अस्तित्व संपविणारी आत्महत्येसारखी कृती केली जाते. म्हणूनच असे काही टोकाचे व भयानक होण्याआधी वर उल्लेखित संदेश महत्त्वाचा ठरतो. आयुष्य हे वेगवेगळ्या प्रकारे आपल्या समोर येत असते. काही सहजतेचे तर काही कठीण परीक्षा घेणारे क्षण येत राहतात. या प्रसंगांना क्रिकेटच्या भाषेत बोलायचे झाल्यास वेगवेगळ्या प्रकारचे बॉल असे समजायला हरकत नाही. तांत्रिक दृष्टीने प्रत्येक वेगवेगळ्या बॉलला सामोरे जाताना कृती ठरलेली आहे. एका चांगल्या फलंदाजाला तो बॉल कळला पाहिजे. या दोन गोष्टींच्या समन्वयामुळेच फलंदाज यशस्वी होतो. जीवनाचेही असेच आहे. कोणत्या प्रसंगी कसे वागायचे याचे सर्वसामान्य मापके ठरलेली आहेत. प्रसंग व त्याला सामोरे जाण्याची कृती याचा ज्याने मेळ जुळविला तो यशस्वी होतो. मला व्यक्तिश: असे वाटते की, या सर्व कृतींमधील सर्वात महत्त्वाची आहे डक करणे. सहजता असेल तेव्हा जीवन ताकदीने व प्रभावीपणे जगणे ही गोष्ट महत्त्वाची आहे, परंतु तसे जगण्याची माणसाची मूलभूत प्रवृत्ती असते. जगण्यासाठी क्लिष्ट प्रसंग समोर आल्यावर व त्यास सामोरे जाण्याची इच्छा असतानाही त्याच्यामधील धोके ओळखून संयमाने त्या प्रसंगाला डक करणे ही सर्वात कठीण प्रक्रिया आहे. कारण अशा प्रसंगी अकारण दाखविलेले धाडस अंगलट येण्याची शक्यता असते. पुढे अनेक चांगले प्रसंग येणार आहेत व त्यावेळी संपूर्ण क्षमता वापरता येईल हा संयमित व शहाणा सल्ला ज्या क्षणी मन देते, तेव्हाच आपण डक करतो. लौकिकार्थाने कदाचित आपण डक केल्यावर प्राप्त काहीच होत नाही. परंतु पुढच्या प्रसंगांना सामोरे जाऊन यश मिळविण्यासाठी आपला खेळ सुरू राहतो. खेळ सुरू राहणे महत्त्वाचे आहे व त्याकरिता प्रसंगी डक करणेदेखील महत्त्वाचे आहे.

---

संस्कारांच्या देशा

रमा गोळवलकर

# गुरवे नम:

भारतीय जीवन पद्धतीत जितकं महत्त्व भौतिक संसाधनांच्या उपभोगाला आणि त्यातून मिळणाऱ्या सुखाला आहे, तितकं किंबहुना काहीसं जास्तच महत्त्व आध्यात्मिकतेला दिलेलं आहे. इतर सारे प्राणिमात्र आणि मानव यांच्यातला सर्वात मोठा फरक म्हणजे मानवाला असलेला मोठा मेंदू आणि भूमीशी ९० अंश सांधणारा पाठीचा कणा. माणूस वगळता इतर सर्वच प्राण्यांचा आढावा घ्या. अनेक कृमी कीटक आणि जंतुजातींना पाठीचा कणाच नसतो. ज्यांना असतो ते सारे चार किंवा त्याहून अधिक पायांवर उभे असतात किंवा चालतात. त्यामुळे माणूस हा एकच एक प्राणी असा आहे, ज्याला दोन पायांवर सरळ उभं राहता येतं. म्हणून आधुनिक जीवशास्त्रात त्याला 'होमो इरेक्टस' म्हणतात. अजून त्याचा मेंदू मात्र इतर प्राण्यांसारखाच होता. आता या होमो इरेक्टसच्या हाताच्या पंजात काही रचनात्मक बदल घडून आले आणि त्याचा अंगठा काहीसा खाली सरकला. त्याच्या हाताची पकड इतर सर्वच वानर प्रजातीहून वेगळी झाली. त्याचा परिणाम म्हणजे तो अधिक सफाईनं अवजारं तयार करू शकला. त्यातच कुठेतरी घर्षणातून आग उत्पन्न करता येते, याचा त्याला शोध लागला. त्याचा थेट परिणाम म्हणजे मांस भाजून खाता येणं. भक्ष्य म्हणजे जे काही खायचं आहे ते शिजवणं म्हणजे त्यावर प्रक्रिया करणं. इतर कोणताही प्राणी असं स्वत: प्रक्रिया केलेलं भक्ष्य खात नाही. मांस भाजलं की त्यातली प्रथिनं शिजतात आणि पचायला सोपी होतात. अशा प्रकारे पचलेल्या प्रथिनांनी एक किमयाच केली. माणसाच्या लहान मेंदूच्या वर एक दुसरा मेंदू विकसित होऊ लागला. पिढी दर पिढी त्या मेंदूचा आकार वाढू लागला. कवटीची पोकळी मोठी होऊ लागली आणि त्यात तो मोठा मेंदू चांगलाच फोफावला. या मोठ्या मेंदूनं माणसाला इतर प्राणी जगापासून वेगळंच काढलं. भूमी नांगरून शेती करणं, विविध वनस्पतींना माणसाळवून त्यातून खाण्यायोग्य उत्पादन करणं, अन्न शिजवून खाणं, थंडी-उन्हापासून संरक्षण मिळविण्यासाठी वस्त्रं आणि निवारा या दोन अधिकच्या सोयी करणं, हा सगळा पसारा मनुष्यप्राण्यानंच स्वत:भोवती निर्माण केला. 'बोलणं' हे तर त्या वेगळेपणाचं ठळक वैशिष्ट्य आहे.




या जगाविषयी वाटणारं कुतूहल, त्याची उकल करण्यासाठी वापरलेल्या वेगवेगळ्या क्लुप्त्या, त्यातून विकसित झालेलं गणित, भाषा, कला यांसारख्या विविधांगी बौद्धिक करामती करण्याची जादू केली ती याच मोठ्या मेंदूनं. या अवयवाची पूर्ण क्षमता अजून वापरलीच गेली नसल्याचा दावा मेंदूवर संशोधन करणारे वैज्ञानिक करतात. 'कोऽहं? अर्थात मी कोण आहे?' आणि 'मृत्यूनंतर काय होतं?' हे दोन प्रश्न पडलेला माणूस हा एकमेव प्राणी आहे, असं निदान सध्या हाती असलेल्या पुराव्यांच्या आधारे म्हणता येईल. कारण जगभरात जेवढा ऊहापोह या दोन प्रश्नांवर झालेला आहे तितका इतर कोणत्याही प्रश्नावर झाला नसावा. या प्रश्नांची उत्तरं शोधतानाच अध्यात्म ही ज्ञानशाखा या मोठ्या मेंदूतून उगवलेली आहे. भारतीय ऋषिमुनींनी त्यावर आपलं चिंतन अतिशय विस्तारानं मांडलेलं आहे. त्याचा गोषवारा असा की, देह आणि आत्मा हे द्वैत आहे. ते एकमेकांना पूरक आणि प्रेरक आहे. त्यांच्या एकत्रित राहण्यातूनच प्राणिमात्र या जगात वावरतो. काही काळ लोटला की त्या प्राण्याचं जीवनचक्र पूर्ण होतं आणि जीर्ण झालेलं कलेवर त्यागून आत्मा वेगळा होतो. नवीन शरीर धारण करून पुन्हा या पृथ्वीतलावर वावरू लागतो. 'वासांसि जीर्णानि यथा विहायनवानि गृह्णाति नरोऽपराणि । तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ।।' (श्रीमद्भगवद्गीता २.२२) जीवन-मृत्यू हे एक चक्र आहे. आत्मा त्यातून फिरत राहतो. म्हणून सर्वच भारतीय भाषांत याला 'जन्म-मृत्यूचा फेरा' असा शब्दप्रयोग आहे. मग आता पुढचा प्रश्न हा की, या फेऱ्यातून आपली मुक्तता होईल का आणि झाली तर ती कशी होईल? या ठिकाणी 'गुरू' ही संकल्पना प्रकट होते. हा सगळा नमनाचा भाग त्यातल्या पुनरुक्तीसह मुद्दामच थोडा लांबवला. कारण 'गुरू' म्हणजे काय हे सांगण्याआधी ही सगळी पृष्ठभूमी माहीत असणं आवश्यक असतं. या भौतिक जगाच्या व्यवहारात माणूस जितका गुंतत गेला तितका त्याच्या भावभावनांचा गुंता वाढत गेला. या गुंत्याचा प्रताप असा की त्यातून विविध संसारिक व्याप आणि ताप वाढत गेलेत. या सगळ्याला एक संज्ञा आहे 'प्रपंच.' भूमी, जल, तेज, वायू आणि आकाश या पाच महाभूतांपासून जे काही तयार होतं आणि जे आपल्या पाच ज्ञानेंद्रियांना आकळतं, ते सारं या प्रपंचाचाच भाग असतं. त्यामुळे या भौतिक जगातले सगळे व्यवहार हे 'प्रपंच' या एकाच शीर्षकाखाली गणले जातात. प्रत्येक क्षणी या प्रपंचात काही ना काही घडामोडी घडत असतात आणि त्यात माणूस अडकून पडतो. म्हणूनच आध्यात्मिक क्षेत्राचे जाणकार या प्रपंचाला माया किंवा मिथ्या म्हणतात.

हिंदी भाषेत तर खोटं बोलण्यालादेखील 'प्रपंच' हा शब्द रूढ झालेला आहे. एका विवक्षित क्षणी प्रपंचाचा सगळा भार असह्य झाला की, त्या सगळ्यातला फोलपणा स्पष्ट होऊ लागतो आणि मानवी मन परमार्थाकडे झुकू लागतं. इंद्रिय सुखापेक्षा वेगळं, उन्नत, उदात्त काही आहे का, याचा शोध सुरू होतो. पण प्रपंचाच्या गुंत्यात अडकलेला पाय मात्र निघता निघत नाही. अशा त्या भांबावलेल्या द्विधा अवस्थेत समोरची वाट धूसर होते, अनेकदा दिसेनाशी होते. अशा वेळी जो योग्य मार्ग दाखवतो, तोच आपला आधार ठरतो. त्यामुळे त्या आधाराला मार्गदर्शकाला गुरू म्हणजे मोठा ही संज्ञा योजण्यात आलेली आहे. गुरू मार्ग दाखवतो, पुढचा प्रवास आपला आपणच करण्याचं मानसिक बळ देतो, तो प्रवास निष्कंटक होईल याची काळजीही घेतो. प्रवास मात्र शिष्यानंच करायचा असतो. इथे भारतीय अध्यात्माची सुरुवात होते आणि गुरू-शिष्याची जोडी अस्तित्वात येते. या पृथ्वीवर मानवानं ज्या ज्या ठिकाणी आपली वसती आणि संस्कृती निर्माण केली त्या त्या ठिकाणी अशी ही गुरू-शिष्य जोडी असणारच. पण काळाच्या ओघात त्या सगळ्या प्राचीन संस्कृती लयाला गेल्यात. त्यांच्यात गुरू-शिष्याच्या नात्याची काय व्याख्या करण्यात आली होती, हे कळायला काही मार्ग नाही. पाश्चात्त्य तत्त्वज्ञान शाखेची जगभरात सर्वात नावाजलेली त्रयी म्हणजे ग्रीक संस्कृतीतील सॉक्रेटिस, त्याचा विद्यार्थी प्लेटो आणि प्लेटोचा विद्यार्थी ॲरिस्टॉटल. त्यातल्या सॉक्रेटिसचा जन्म सुमारे इ. स. पू. ४७० मध्ये झाला आणि इ. स. पू. ३९९ मध्ये त्याला फाशीची शिक्षा देण्यात आली. प्लेटोच्या माध्यमातून तो आपल्याला समजतो. त्यानं तर्कशुद्ध चौकशी आणि आत्म-परीक्षणाला महत्त्व दिलं.

लोकांकडून प्रश्न विचारून त्यांना सत्य आणि ज्ञान शोधायला लावण्याची पद्धत त्यानं अवलंबली होती, असं प्लेटोच्या नोंदींवरून कळतं. भारताच्या प्राचीन इतिहासात मात्र कोण्या मार्गदर्शकाला फाशी किंवा देहान्त शासनाची शिक्षा दिल्याची नोंद नाही हे विशेष.

(पान ६ वर)

# वाढले जरी वय, सोडू नका लय!

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

**राँग देशून :** २० ऑगस्ट १९३६ साली याचा चीनमध्ये जन्म झाला. म्हणजे सध्याचे वय ८९. वयाच्या २४ व्या वर्षी एका नाटकाच्या ग्रुपमध्ये अभिनयाचे काम करीत राहिला. त्यानंतर २५ वर्षांनी बीजिंगमधील ड्रामा अकॅडेमीमध्ये आधुनिक पॅन्टोमाईममध्ये गाणी, विनोद आणि नृत्य यांचा समावेश असलेले सादरीकरण करू लागला. यात सामान्यत: लिंगभेद करणारे कलाकार आणि स्थानिक विनोद यांचे मिश्रण करून एखाद्या सुप्रसिद्ध परीकथा, दंतकथा किंवा लोककथेवर आधारित कथेसह सादरीकरण केले जाते. १९८७ मध्ये चीनच्या सांस्कृतिक मंत्रालयातर्फे त्याला जर्मनी येथील आंतरराष्ट्रीय कार्यक्रमात पाठवण्यात आले. पुढे १९८९ मध्ये वाँगच्या पॅन्टोमाईमचा समावेश चीनच्या विश्वकोशात करण्यात आला. आयुष्यात कधीही शरीराकडे विशेष लक्ष न दिलेल्या वाँगने वयाची पन्नाशी गाठल्यानंतर व्यायामाला सुरुवात केली. वयाच्या ५७ व्या वर्षी फ्रान्समधील आठव्या आंतरराष्ट्रीय थिएटर उत्सवात त्याला आमंत्रित करण्यात आले.

७० व्या वर्षी बाईक चालवायला शिकला. २०१५ मध्ये वयाच्या ७९ व्या वर्षी तो त्याच्या सुप्रसिद्ध जागतिक स्तरावरील अनेक चित्रपटात जगप्रसिद्ध झाला आणि वयाच्या ८० व्या वर्षी त्याला व्यायामाच्या वेडाने एवढे झपाटले की, त्याचे शरीरसौष्ठव पाहून २०१७ मध्ये रीबॉक कंपनीने त्याला आपला ब्रँड ॲम्बेसेडर बनवले. २०२१ मध्ये वयाच्या ८५ व्या वर्षी तो विमान चालवायला शिकला व त्याने स्वत:चे विमान विकत घेतले. आज ८९ व्या वर्षीसुद्धा हा माणूस पूर्ण तीन तास व्यायाम करतो. एवढेच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील फॅशन-शो मध्ये तो तरुणांना लाजवेल असा आकर्षक कॅटवॉक करतो. त्यांच्या या यशाचे रहस्य काय, असे विचारले असता त्यांनी सांगितले की, तुम्ही जसा विचार कराल तसे व्हाल. मी ठरवले वय वाढत असले, तरी तरुण करतात तसा व्यायाम करायचा. व्यायाम प्रकारात ते सर्व प्रकारचे व्यायाम करतात. आरोग्य चांगले राखण्यासाठी आहारावर नियंत्रण ठेवायचे. शिस्तबद्ध आयुष्य जगायचे. दारू आणि इतर व्यसनांपासून दूर राहायचे. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. चीनमध्ये सगळ्यात लोकप्रिय आजोबा म्हणून त्यांना ओळखतात.

**हरिएट थॉम्पसन :** हिने वयाच्या ९२ व्या वर्षी ४२ किलोमीटर सात तासात धावून बोस्टन मॅराथॉन स्पर्धा जिंकली. ती कुणी धावक नव्हती




तर पियानो वादक होती. तिच्या नवऱ्याच्या मृत्यूनंतर ती निराश झाली होती. तिच्या पायात काही इन्फेक्शन झाल्यामुळे नीट चालताही येत नव्हते. तिला आधी कॅन्सर झाला होता; त्यातून ती वाचली. निराशेने भारलेल्या काळात तिच्या सायकॉलॉजिस्टने तिला समजावले. जरी तुला स्वत:साठी सगळी परिस्थिती प्रतिकूल असली, तरी तू दुसऱ्यांना मदत करू शकते.

प्रेरणा देऊ शकते. चालता येत नाही तर धावायचा विचार कर. त्या कौन्सेलिंगमधून प्रेरणा घेऊन रॉक-एन-रोल या सॅन डियागोमधील मॅरेथॉन स्पर्धेत तिने फक्त भागच घेतला नाही तर ती स्पर्धा जिंकली व त्यातून मिळालेली ९० हजार डॉलरची रक्कम रक्ताचा कर्क रुग्णांची सेवा करणाऱ्या संस्थेला दान केली.


मला अशा संस्थेला मदत करायचीच आहे. मी म्हातारी असले, पायाला दुखापत झाली असली तरीही धावेन, असा तिने निर्धार केला. या प्रयासात तिने जी मेहनत घेतली त्यात तिचा पाय पूर्ण बरा झाला व तिने स्पर्धा जिंकली.

**प्रोफेसर लिओ हुर्विक :** यांचा जन्म पोलंड



मध्ये १९१७ साली झाला. त्या काळात पोलंड रशियाचा भाग होता. प्रथम विश्वयुद्धाच्या काळात ज्यू असल्यामुळे त्यांचे खूप हाल झालेत. १९३९ मध्ये हिटलरने पुन्हा पोलंडवर आक्रमण केल्यामुळे त्यांनी अमेरिकेत आश्रय घेतला. या दरम्यान त्यांनी एव्हलीन जेन्सेनशी लग्न केले व तिच्याकडून इकॉनॉमिक्सचे शिक्षण घेतले. पुढे त्यात रुची वाढल्यामुळे हॉर्वर्ड आणि शिकागो विद्यापीठात इकॉनॉमिक्सचे उच्च शिक्षण घेतले. पुढे क्रम क्रमाने त्यांची प्रगती होत गेली. अभ्यासातील सातत्यामुळे वयाच्या ९०व्या वर्षी त्यांना इकॉनॉमिक्समधील सर्वोच्च नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**अमिताभ बच्चन :** आज वयाची ८३ वर्षे पूर्ण करूनही भारतीय सिनेमासृष्टीत अजूनही अत्यंत व्यस्त असलेले मेगास्टार अमिताभ बच्चन हे म्हातारपणातही किती तरुण राहता येतं त्याचे मूर्तिमंत प्रतीक आहेत. वागणे, बोलणे, उच्चार यातील त्यांची स्पष्टता वाखाणण्याजोगी आहे. त्यांनी आतापर्यंत २०० पेक्षा जास्त चित्रपटात काम केलंय. त्यांना सहा



वेळा राष्ट्रीय फिल्म पुरस्कार, १६ फिल्मफेअर व इतरही अनेक पुरस्कार मिळाले आहेत. भारतीय दूरदर्शन व सिनेजगतात त्यांचे स्थान सर्वोच्च आहे. भारतीय शासनातर्फे त्यांना पद्मश्री, पद्मभूषण, लेजन ऑफ ओनर व फिल्म जगतातील सर्वोच्च दादासाहेब फाळके पुरस्कार मिळालेला आहे. नेहमी नवीन गोष्टी शिकण्याची तयारी, अतिशय शिस्तबद्ध जीवन हे त्यांच्या यशाचे गमक आहे.

**शिकायचे काय?**

वृद्धत्व आले म्हणजे आपण निकामी झालो असा विचार न करता पूर्ण उत्साहाने आपल्या ध्येयाप्रती समर्पित राहून नवनवीन गोष्टी आत्मसात व नवीन शिखरे पादाक्रांत करायची आहेत, अशी मानसिकता असावी. म्हातारपण म्हणजे दुसरे बालपण! म्हातारपण येणे ही एक सत्य स्थिती आहे आणि त्याला आनंदाने सामोरे जाण्यासाठी आपण सर्वांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून नवीन आव्हाने स्वीकारण्याची तयारी ठेवावी.

**काही वेगळे, पण महत्त्वाचे...**

१) पुरुषाने त्याच्या मुला-मुलींची लग्ने पार पाडल्यानंतर, कुटुंबातील इतर सदस्यांच्या आर्थिक स्थैर्याची सुयोग्य काळजी घेतल्यानंतरसुद्धा त्याचे कुटुंबातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ स्थान संपुष्टात येते. नंतर त्याला कुटुंबावर एक ओझं म्हणून वागवलं जातं. एक विक्षिप्त, कटकट्या म्हातारा म्हणूनच त्याच्याकडे पाहिलं जातं. पूर्वी घेतलेल्या कठोर निर्णयाची चिरफाड या काळात करीत त्याला कोणत्या ना कोणत्या कारणासाठी तरी दोषीच ठरवले जाते. त्या चुका जरी कितीही जुन्या असल्या, तरी त्यामुळे झालेल्या जखमा नेहमी ओल्याच असतात. अशा परिस्थितीत कौटुंबिक वातावरणातील समस्या सोडविण्याचा प्रयत्न करताना समाजसेवेत झोकून द्यावे व आपले मानसिक आरोग्य जपावे.

२) संसारी आयुष्यात कदाचित पूर्वायुष्यामध्ये कितीही कर्तृत्व गाजवलेले असो, पुरुषाची पुण्याई म्हाताऱ्या वयात कामी येत नाही.

३) वयस्कर स्त्रीकडे मात्र मुलांकडून व सुनांकडून सहानुभूतीने पाहिले जाते. कारण तिच्याकडून करून घेण्यासारख्या गोष्टी अजूनही असतात. त्यामुळे वयस्कर स्त्री मात्र पूर्वपुण्याईचे व्याज खाऊ शकते. मुलगा दूर जाऊ नये म्हणून वयस्क स्त्री सुनेशी जमवून घेते.

४) ज्यांची भरपूर शेती, संपत्ती किंवा शासकीय पेन्शन असेल, त्यांची अवस्था थोडी बरी असते. ज्यांनी आपल्या पश्चात मुलांच्यात भांडणे नकोत म्हणून वाटणी केलेली असेल तर मात्र त्यांचे हाल असू शकतात.

५) मनस्ताप टाळण्यासाठी वृद्धांनी इतरांकडून अपेक्षा ठेवणे टाळावे. आपण जन्मभर विद्यार्थीच असतो हे लक्षात ठेवावे. मुलांच्या किंवा नातवांच्या विविध निर्णयांबद्दल वृद्धांनी दिलेले काही सल्ले कितीही योग्य असतील तरीही मुलांना आवडतील, याची खात्री नसते. काहींना ती उगाच केलेली 'ढवळाढवळ' वाटू शकते.

६) जास्त पगार व विदेशातील प्रलोभनांमुळे मुले परदेशात तर वृद्ध पालक भारतात अशी परिस्थिती आढळते. तेव्हा मुले भारतात परत येतील अशी आशा ठेवून स्वत:ला त्रास देऊ नये. योग्य ती तजवीज करावी.

७) जवळचे लोक हळूहळू कमी होतील. तुमच्या व आईवडिलांच्या पिढीतील बऱ्याच जणांनी हे जग सोडलेले असेल. समवयस्क असलेल्या तुमच्या आप्तांना व मित्रांना स्वत:कडे बघणेसुद्धा जड जाऊ लागेल. तरुण पिढी त्यांच्या जीवनात व्यग्र-व्यस्त असेल. तुमच्या जीवनाचा जोडीदार कदाचित हे जग तुमच्या अपेक्षेपूर्वीच सोडून गेलेला असेल. नंतर काय उरते तर एक नको वाटणारा एकटेपणा. अशा परिस्थितीत कसे जगायचे? एकटेपणाला सामोरे जाऊन उर्वरित जीवनातील आनंद मिळविण्यासाठी अध्यात्म व योगशास्त्र हाच उत्तम उपाय आहे. सुखी वृद्धापकाळासाठी मानसिक तयारी केली पाहिजे.

८) आधी कौतुक करणारे लोक म्हातारपणी तुमच्यापासून लांबच राहतील. तेव्हा आजूबाजूला जे काही चालले आहे त्याचे कुठलाही मत्सर न दाखवता, काहीही तक्रार न करता कौतुक करणे, त्याला पसंती दर्शवणे, हेच उतार वयात उत्तम.

९) वाढत्या वयात हाडे कमकुवत होणे, हृदय व रक्तवाहिन्यांचे आजार, मेंदूसंबंधी विविध विकार, कर्करोग व इतर अनेक आजार होण्याची शक्यता असते. पण सकारात्मक मानसिकता ठेवून नियमित व्यायाम, संतुलित आहार, पुरेशी झोप, आसने, प्राणायाम, ध्यान, नामस्मरण, आध्यात्मिक साधना यात सातत्य ठेवल्यास वृद्धापकाळ आनंदी करता येतो.

१०) वृद्धावस्थेत आता काय करणार, असा विचार न करता, समाजजागृती व देशोपयोगी ध्येय ठेवून कार्यमग्न राहिल्यास मानसिक व शारीरिक आरोग्य उत्तम राहते. अनुभवाचा व वेळेचा देशासाठी पूर्ण उपयोग करा. सद्य:स्थितीत प्रत्येक जण आणि प्रत्येक क्षण महत्त्वाचा आहे. बालपणात आपली काळजी घ्यायला आपली आई होती, पण या टप्प्यावर असे कोणी असण्याची शाश्वती नाही. असे कोणी असले तरी ते आपल्या आईसारखी काळजी घेतील अथवा नाही, याची शंकाच असते.

११) शेवटच्या काळात तुम्हाला त्रास देणारे, फसवणारे लोक भेटतीलच. तुम्ही कष्टाने जमवलेले पैसे तुमच्याकडून हिसकावून घ्यायला काय करावे, याचाच विचार करत असतील. खोटे फोन करतील, मेसेजेस, ई-मेल पाठवतील, विविध प्रलोभने दाखवतील, सावध राहा, काळजी घ्या.

१२) आपल्याला जे आवडते ते करण्यासाठी आता थांबायचे नाही. कुठलीही कृती पुढे ढकलू नका. हे नंतर करेन... ते नंतर सांगीन असे करू नका. नंतरने अंतर वाढते व चांगल्या गोष्टी, चांगले क्षण हातातून निसटून जातात. आजची गोष्ट उद्यावर ढकलणे आपल्याला झेपणारे नाही. कारण प्रत्येक क्षण प्रत्येक श्वास महत्त्वाचा आहे. शरीराचे वय वाढले तरी मनाने कणखर राहून भविष्याप्रती आशेने राहणे चांगले. सर्वजण आरोग्यसंपन्न राहोत, हीच सदिच्छा! (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



## पंढरीची आता । ओढ लागे ।।

गोंदला मी टीळा । भाळी चंदनाचा ।।
ध्यास विठ्ठलाचा । मना लागे ।।१।।

शुभ्र ललाटीची । माया लुप्त झाली ।।
काया गंधाळली । हरिनामे ।।२।।

माळ तुळशीची । रूळता गळ्यात ।।
चैतन्य रोमात । डोलू लागे ।।३।।

अंतरीची साद । चेतली कृपेने ।।
पूर्व संचिताने । धन्य झालो ।।४।।

टाळ-मृदुंगाचा । गजर ऐकता ।।
पंढरीची आता । ओढ लागे ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## निसर्ग चक्र

उन्हाळ्यात पावसाळा का पावसाळ्यात उन्हाळा
हे निसर्गाचे चक्र काही उलगडत नाही गड्या,
उन्हाळ्यात गरम भजी का पावसाळ्यात थंड आईस्क्रीम
केव्हां काय खाऊ ही तर वेगळीच मज्जा!
पावसाच्या सरीवर सरी का उन्हाच्या गरम लाटा
सारंच भन्नाट, जाऊ द्या हो,
कशाला करायचा जिवाचा आटापिटा
जे आहे ते छानच आहे कधी जगून पहावे
दिवस बेधुंद असेही! जेव्हा निसर्ग होतो फिदा
आणि जगण्याला देतो बेफाम अदा,
तापल्या भुईला जराशी मुभा शांत,
शीतल व थोडासा ओलावा सज्ज करायला
तिचा पाठीचा कणा काही क्षण विसाव्याचे तिनेही जगावे!
करायला साऱ्यांचे आयुष्य सुंदर सुखकारी पुन्हा पुन्हा.

अवनी सप्रे

## चला करूया वृक्षारोपण

झाडे लावा झाडे जगवा ब्रिद हे पाळूया मनोमन घरी
दारी पथी उद्यानी मिळून करूया वृक्षारोपण...
वृक्ष देतसे शीतल छाया जे थांबविती धरेची धूप फल
मुलादी धन धान्याची लयलूट करिती खूप...
झाडे लाविता अन् जगविता होईल संतुलित पर्यावरण
वाढूनी हवेतील गारवा होईल हद्पार तापमान...
झाडे प्राणवायूचे बिढार देती पशुपक्ष्यांस थारा
करण्या पुढीलांचे रक्षण वृक्षारोपण आज करा....
वसुंधरा वनश्रीने नटता धावत येईल राजा वरुण बीज
अंकुरे तिच्या कुशीत प्रफुल्लित होईल जीवनमान...

प्रशांत हनवाडीकर



## गोंदण

कोणे एके काळी
स्वाती काळे (कोलारकर)

पावसाच्या पहिल्या सरी झाडाझाडोऱ्यावर पडल्या आहेत. सकाळची नितळ किरणे दुपारी पांगुळलेली दिसत आहेत. पक्षीही सुस्तावले आहेत. त्यांची कष्टाची घरटी बांधून तयार आहेत. शेतातल्या मातीच्या ढेकळांमधले मोराचे लहानगे किडे गोल गोल गिरक्या मारत आहेत. वळवाच्या एका सरीनंतर ते मातीत गुडुप होऊन जातील. आकाशात अचानक काळ्या ढगांनी गर्दी केली आहे. पडवीवरच्या कौलावर मोराने पिसारा फुलवला आहे. अंगणातल्या खाटेवर आयाबायांनी बसकण मारली आहे. गोंदण बाई पालखट मारून बसली आहे. सुई जोरात लागली म्हणून पोरगी रडून गोंधळ घालते आहे. आजीबाईने तिचा हात प्रेमाने घट्ट धरून ठेवलाय. आषाढात पाऊस बघून थुई-थुई नाचणारा मोर मुलीच्या नितळ हातावर उमटतो आहे. साधारण जून-जुलै महिन्यातलं दुपारच्या वेळेचं महाराष्ट्रातल्या खेडेगावांमधले हे दृश्य. पारंपरिक गोंदण प्रकार आता जवळपास नष्ट झालेला आहे. तरी अजूनही आपल्या प्राचीन संस्कृतीचे भग्न पावलेले अवशेष आजही आदिवासी बायकांनी ल्यायलेले दिसतात.

दुर्गाबाई भागवत यांना एकदा नाशिक-धुळ्याच्या वेशीवर मोर गोंदलेली आजी भेटली होती. ती म्हणाली की, न गोंदलेल्या बाईला स्वर्गात प्रवेश नाही मिळत! फांदीवर बसलेला मोर, उडणारा मोर, नाचरा मोर ही गोंदण चिन्हे अतिशय भाग्याची समजली जातात. गोंदण चिन्हांच्या असंख्य कलाकृती आहेत. पण बिहार आणि उत्तर प्रदेशमध्ये दो गोंदना, सीता की रसोई, पंच पांडव जास्त लोकप्रिय आहेत. या सर्व गोंदण चिन्हांना समजून घेतलं तर आपल्याला प्राचीन भारतीय स्त्रीचे भावविश्व समजून घेण्यात मदत होते. 'दो गोंदना'मध्ये एक तळहातावर आणि एक पाठी किंवा पायावर दोन अशा दोन चिमुकल्या जुळ्या खुणा असतात. झाडे, फुले, पक्षी, प्राणी अशी जोडी असू शकते.

पहिलं चिन्ह लग्नानंतर सौभाग्यचिन्ह म्हणून काढण्यात येतं तर दुसरं जुळं चिन्ह मुलीच्या मांडव परतणीच्या वेळी काढण्यात येतं. मुलगी आता सौभाग्यवती झाली आहे, पण तिच्या जन्मदात्या आई-वडिलांनाही तिने विसरू नये, ही यामागची भाबडी माया. 'सीता की रसोई' हा देखील शतकानुशतके स्त्रियांच्या हातावर विशेष करून उत्तर भारतीय स्त्रियांच्या उजव्या हातावर गोंदविण्यात येणारा प्रकार आहे. अशी एक कथा आहे की, सीतेचे लग्न झाल्यावर तिच्याकडे पाच ऋषी जेवायला येतात. ती अतिशय रुचकर स्वयंपाक करून त्यांना जेवायला वाढते. त्यामुळे तिला 'अन्नपूर्णा' असेही म्हणतात. सीतेचा आदर्श ठेवणाऱ्या स्त्रियांच्या उजव्या हातावर 'सीता की रसोई' हे गोंदणचिन्ह असतं. 'पंच पांडव' या गोंदण चिन्हामागे अनादी काळापासून जनामनात वसलेले महाभारत आहे. द्रौपदीने पाच पांडवांशी लग्न केले. तिचे संबंध सर्वांशीच अत्यंत जिव्हाळ्याचे होते. तिला भारतीय संस्कृतीतल्या महान पंचपतिव्रतांपैकी एक समजले जाते.

'पाच टिंब' म्हणजे पाच पांडवांचे गोंदण बायका हातावर हौशीने गोंदवून घेतात. महाराष्ट्रात भिल्लांकडे आणि इतरही बऱ्याच जाती-जमातींमध्ये पतीचे नाव गोंदवून घेण्याची पद्धत आहे. आंबा मोर गोंदणात मोर आंब्याच्या डहाळीवर बसलेला दिसतो. बिछुडो गोंदणात हाताच्या मागच्या बाजूला विंचू गोंदवतात. आंबा मोर किंवा विंचू हे प्रजननाचे प्रतीक आहे. तीन आणि सात टिंबांची रचना असली की समजायचं मधमाशीचे पोवळे आहे. पशू, पक्षी, प्राणी हातापायांवर गोंदवून आदिम मानव निसर्गाशी जवळीक साधू बघतो आणि ही निसर्गचिन्हे त्याला प्रजनन क्षमतेच्या दृष्टीने फार जवळची वाटतात. सह्याद्रीच्या कड्याकोपऱ्यात राहणाऱ्या आदिम जमातींना अनेक संकटांशी सामना करावा लागला. पायात बाभळीचे बोचरे काटे असले, तरी रानावनात कंदमुळे जमा करण्यासाठी भटकावे लागते. पायाला दुखापत होऊ नये म्हणून हे भिल्ल पाय गोंदवतात. पाच गोंदवलेले टिंब म्हणजे त्यांचा गजकरण देव. स्मशानात राहणारा हा गजदेव मनुष्याच्या पायांना हत्तीचे बळ देतो. कधी पायावर 'घोडादेव'चे चिन्ह असते. हा घोडादेव घोड्याची चपळता देतो.

शेतीची अवजारेही गोंदवण्यात येतात. प्राचीन संस्कृतीच्या पायवाटेवरचा प्रवास असा थक्क करणारा आहे. छत्तीसगडला एकदा बस्तरच्या हाट बाजारात गेले असताना 'गुदावनो' करणाऱ्या अनेक छत्तीसगढी भिल्ल बायका रंगीबेरंगी कपडे नेसून, सुंदर दागिने घालून आणि अंगभर गोंदण ल्येवून बाभळीचा काटा हाती घेऊन बेलवृक्षाच्या रसात बुडवून बायाबापड्यांना गोंदवीत होत्या. या बायकांना गांधारी का म्हणतात, याचे संशोधनच करायला हवे. 'जर गोंदण केलं नाही तर कसं कळणार की कोणत्या कुटुंबातली ही



गोंदण



बाई आहे? सासू-सासरे तर आत घेणार नाहीत त्या बाईला.' गोंदण्याचं महत्त्व त्या मला सांगत होत्या. दुसरी बाई म्हणाली की, वाईट नजरेपासून वाचण्यासाठीसुद्धा गोंदण फार गरजेचे आहे.

गोंदण्याचं आणखीन एक कारण असावं. गोंदण करणाऱ्या बायका म्हणतात, 'मोधु लहू लागे' गोंदणाशिवाय चेहरा रिकामा दिसतो; 'गटो भुनो लागे' तुमचे गाल गोंदणाशिवाय डुकरासारखे दिसतात. गोंदण म्हणजे कायमचा दागिना. 'मरी जाये, ती जाये.'

गोंदण भारतीय संस्कृतीचे प्राचीन अवशेष आहे. गोंदण्याची सुरुवात कशी झाली, याच्याही सुरस कथा प्रत्येक आदिम जमातीत आहे. एक भिल्लकथा आहे की, शिवाने सर्व देवांना मेजवानीसाठी आमंत्रण दिलं. एका रांगेत सर्व देव बसले आणि त्यांच्या समोरच्या रांगेत देवता बसल्या. मेजवानी झाली. सर्वांनी यथेच्छ ताव मारला. घरी जायची वेळ आली, पण भिल्लदेव त्याच्या बायकोला ओळखू शकला नाही आणि चुकीने त्याने पार्वतीच्या गळ्याभोवती हात टाकला. ही चूक शिवाच्या लक्षात आली आणि तो हसला. पार्वतीला मात्र प्रचंड राग आला आणि तिने फर्मान काढले की, बायका गोंदण करतील, ज्यामुळे पुरुष त्याच्या बायकोला कुठेही गर्दीत ओळखेल आणि परस्त्रीला हात लावणार नाही. अजून एक मजेशीर गोष्ट आहे. यमदेवाला प्रश्न पडला की, स्वर्गात येणारा माणूस ओळखायचा कसा? त्याची सून येणार होती म्हणून त्याने तिच्या शरीराला खूण करून येण्यास सांगितले. गोंदण केल्यावर ती फारच आकर्षक दिसू लागली. यम राजाला ओळख पटल्याने खूप आनंद झाला आणि त्याने मुलाला आणि सुनेला पृथ्वीवर गोंदण कला शिकविण्यासाठी पाठवले.

पुरातत्त्व शास्त्रानुसार, प्रागैतिहासिक भारतामध्ये सुमारे १० हजार वर्षांपूर्वी शैलचित्रांमध्ये गोंदण प्रकार आढळतो. सिंधू संस्कृतीत (३३००१३०० इ.स. पूर्व) सुद्धा शरीर गोंदवल्याचे पुरावे आढळले आहेत. शरीराचे पुरावे मिळणे तर अशक्य आहे, पण मूर्ती आणि मुद्रांच्या पुराव्यावरून हा निष्कर्ष काढता येतो.

शिवतांडव स्तोत्रानुसार शिवाने पार्वतीवर गोंदण केले होते. तेलगू रामायणातदेखील जेव्हा हनुमान सीतेकडे जातो, तेव्हा तिची ओळख पटविण्यासाठी सीता सांगते की, माझ्या गालावर रामाने गोंदण केले होते. स्वरक्षणासाठी, सामाजिक प्रतिष्ठेसाठी, स्वत:ची ओळख पटविण्यासाठी, प्रजनन क्षमतेसाठी, कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी आणि सौंदर्यासाठी अतिप्राचीन काळापासून गोंदणाचा उपयोग होत होता, हेच या कथांमधून निश्चित होते. देशभरात गोंदणाचे असंख्य प्रकार आहेत. कछ, भिल्ल, बइगा, डोंग्रीया कोंढ, तोडा, नागा केवढ्यातरी जमाती आहेत, ज्यांचा सांस्कृतिक इतिहास गोंदणाने भारतमातेच्या हृदयावर लिहिला आहे. प्रत्येक गोंदणाची स्वत:ची गोष्ट आहे. स्वत:चा वेगळा इतिहास आहे. स्वत:च्या संस्कृतीची मूल्ये आहेत. पण सर्वात नावीन्यपूर्ण गोंदण आहे ते रामनामी धारकांचं. रामनामी कथाही जगावेगळी आहे.

दलित समाजाच्या सवर्णांविरुद्धच्या क्रांतीची ही कथा आहे. दर्शनराम एके दिवशी नेहमीप्रमाणेच काळी शाई आणि तीन नव्या सुया घेऊन बाजारात गिऱ्हाईकाची वाट पाहत उभा होता. त्याचं लक्ष मेहेररामकडे गेलं. घामाने ओले झालेल्या धोतराआड आपली गरिबी झाकत मेहेरराम उभा होता. दर्शनरामने त्याच्या कपाळावर वीसदा सुया टोचल्या आणि र अक्षर त्याच्या कपाळावर नेहमीसाठी उमटलं. काट्याचा बोचरेपणा सहन करीत त्याने 'राम' हे अक्षर पूर्ण लिहिलं. त्याला वाटलं त्याचा नवीन जन्म झाला. पुढच्या सहा महिन्यात त्याने संपूर्ण शरीरभर रामनामाचं गोंदण केलं आणि रामनामी पंथात तो सामील झाला. आता त्याने कोणत्याही जातीची किंवा धर्माची झूल पांघरली नव्हती. त्याची दलित पृष्ठभूमी, त्यामुळे होणारी अवहेलना या गोंदणामुळे पुसली गेली, असं त्याला वाटलं. त्याचे शरीर रामाचे मंदिर झाले.

१९११ मध्ये पीरदा खेडेगावात परशुराम नावाच्या रामनामीने हजारो लोकांना बोलावले आणि तीन दिवस रामचरितमानसवर चर्चा केली, त्याची पारायणे केलीत. रामचरितमानसमध्ये स्त्रियांवर अन्याय झाला आहे आणि श्रीमंतीला उच्च स्थान दिले आहे, ही गोष्ट त्यांना पटली नव्हती. त्यामुळे रामचरितमानसचा काही भाग पुन्हा नव्याने लिहिणे आवश्यक आहे, असे रामनामींचे मत होते.

रामनामींची पहिली क्रांती रामचरितमानसाचा काही भाग वगळून नव्याने लिहिणे ही होती. सामाजिक न्यायासाठीची लढाई अशी रामाच्या गोंदणापासून सुरू झाली. हल्ली गोंदण प्रकाराची फॅशन झाली आहे. त्याला 'टॅटू' असं म्हणतात. पूर्वीच्या गोंदणाला फार खोल अर्थ असायचा. कोणतातरी प्राचीन संदर्भ असायचा. सामाजिक आणि धार्मिक रितीभातींचा धागा गोंदणामुळे पुढच्या पिढीला मिळायचा. मातीतून वर आलेल्या संस्कृतीची ती उन्नत अभिव्यक्ती होती. याचा अर्थ असा नाही की, जुने ते सगळेच चांगले आणि नवीन ते वाईटच. काळाचे संदर्भ बदलते असतात.

भूतकाळाला वर्तमानकाळाची परिमाणे नाही लावू शकत किंवा वर्तमानकाळाची मोजमापे भविष्यात वापरू नाही शकणार. त्यामुळे गोंदण चांगलं आणि हल्लीचा टॅटू वाईट, असे नाही. फक्त प्राचीन गोंदण आदिकला आषाढसरींमुळे आठवली, एवढेच. बाकी 'कालाय तस्मै नमः' हेच खरं.

# वडाच्या घनगर्द सावलीचा पदर उलगडतांना...



ऋतूरंग.....

किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

**आज बरगद का पेड लगाकर जाऊ तो बात होगी, आने वाले नस्ल की कल छावसे मुलाकात होगी! कधी तरी मीच लिहून ठेवलेला हा शेर वृत्त मात्र गझलेचे तंत्र मंत्र ह्यात बसत नसला तरी माझा मला आवडतो. तस बरगद म्हणजे वडाचे झाडही आवडते. आता वड कोणाला माहीत नाही? असा प्रश्न आज तुम्हाला पडला असेल, उद्या वड कोणाला माहीत आहे? असा प्रश्न उरेल हे ही नक्की. जेष्ठ महिन्याची पौर्णिमा म्हणजे आकाशात चमकणारा प्रखर चंद्र आणि जमिनीवर विसावलेली वडाची शांत सावली ह्यांचा समन्वय कोलाज होय. मे- जूनच्या वळवाच्या सरींनी धुतलेलं आभाळ कधी नितळ निळ्या निळाईन मनाचा ठाव घेत तर कधी आकाशाच्या त्या निळसर महासागरात पांढुरके पांढुरके ढग स्वच्छंदीपणे विहार करताना दिसतात. संध्याकाळची लालसर छटा आणि हवेत भरलेली चिंब ओल आणि त्यातच उभ्या वडाचं प्राचीन रूप खुलून येतं. वड फक्त स्वत: जगतो आणि श्वास घेतो असं कधीच होत नाही तो प्राणीपक्ष्यांना आसरा देतो, माणसाला घनगर्द सावली देतो आणि स्त्रियांच्या श्रद्धेचा, सांस्कृतिक नात्यांचा आधार ठरतो.**

ग्रीष्माच्या दाहक उन्हाने संपूर्ण सृष्टी पोळून निघत असताना जेष्ठांमध्ये झाडावरची पालवी परीपक्व पानांमध्ये परिवर्तित होऊन पोपटी रंगातून काळवट हिरव्या रंगांमध्ये बदललेली असते. चैत्र आणि वैशाखाच्या काळात अंगावर फुलांची घेतलेली शाल बहुतांश झाडे झुगारून देतात. नाही, म्हणायला गुलमोहराच्या झाडाखाली त्याच्या कळ्या पाकळ्या अजूनही ताजेपणाच्या खुणा जपून असतात. झाडावरून येणारे पक्षांचे कलरव, कोकिळेचा आणि इतर पक्ष्यांचे आवाज हरवून गेल्याची जाणीव होते.

खरे तर वसंतातील प्रणयोत्सुक पक्षी ज्येष्ठ महिन्याच्या कालावधीत आपले घरटे पूर्ण करून सृजनाच्या तयारीत असतात हे आपण समजून घेत नाही. माणूस असो की, पक्षी आपल्या नव्या पिढीने डोळे उघडावे ते आपल्या हक्काच्या घरात असाच विचार सृष्टीतील सजीव करतात असे मला वाटते. पण, माणसाने पाहता पाहता एकेकाळी आपल्या घरात आवडीने न्याहाळलेले चिमणीचे खोपे आपल्या घरातून हद्दपार करून टाकलेत. भर दुपारच्या वेळी एखाद्या खोप्यातून चिमणीचे पिल्लू खाली पडल्यावर जसे आपण त्याला पाणी पाजून त्याच्या घरट्यात व्यवस्थित ठेवायचो आणि त्या गोष्टीची चर्चा आजी-आजोबा पासून शाळेतील मित्रांपर्यंत करायचो, त्यातून संवेदनशील असल्याची शाबासकी मिळवायचो, ती शाबासकी आपण आपल्या नवीन पिढीसाठी शिल्लक ठेवली नाही. चिमणीचे पिल्लू मरू नये म्हणून डोळ्यात पाणी आणणारी त्या वेळची संवेदनशीलता आपल्या घरातील नष्ट झालेल्या खोप्या सोबत कधी नष्ट झाली ते आपल्याला कळलेच नाही. आम्ही लहानपणी ज्येष्ठातल्या पावसानंतर उगवून आलेल्या एखाद्या झुडुपाखाली एखादी वेळी पांढूरकी निळसर अंडी दिसायची, ती टिटवीची असावीत किंवा सापाची असावी यावर बऱ्यापैकी मंथन चालायचे. एका म्हाताऱ्याने टिटवीचे अंडे खाल्ल्यावर तो म्हातारा आयुष्यभर झोपला नाही या कथेपासून नागिनीची अंडे कुणाकडून तरी फूटल्यावर नागिन सूड घेण्यासाठी त्या माणसाच्या मागे येते अशा कथेपर्यंत चर्चा चालायच्या. तो काळ आठवला की अजूनही आपल्या हातून फुटलेले अंडे टिटवीचे नसून नागिनीचे होते असे वाटले की आपोआप सोफ्यावर पाय वर करून बसावे वाटते. न जानो ती नागिन वळवळीत आली तर? जेष्ठामध्ये हळूहळू आकाशामध्ये ढग जमा व्हायला लागतात. उकाडा प्रमाणापेक्षा जास्त होतो हे वेगळे सांगायला नको. या उकाड्याच्या काळात खरे म्हणजे घराबाहेर खाट टाकून आकाशातील ढगांची गर्दीने न्याहाळणे, काळे आणि पांढऱ्या ढगातून झरझर चालणारा चंद्र नेमका कोठे चालला असावा? अशा अनेक बालसुलभ प्रश्नासह एकेकाळी ज्येष्ठातील हा उकाडा अनेकांनी हसत हसत सहन केला आहे. काळ बदलला आणि पंखे, कुलर, ए-सी इत्यादीमध्ये तो नूर हरवला.

चंद्र किंवा सूर्य काळ्या पांढऱ्या ढगाच्या आड लपला म्हणजे त्या ढगाची किनार रुपेरी होणे आणि तो चंदेरी सोनेरी दिसणे, यातच क्षितिज कधी भगवे तर कधी काळवट सोनेरी अशा विविध रंगात माखून जाणे या सर्व क्षणचित्रांचे पडसाद मनावर उमटल्यावर निर्माण होणारा आल्हाद शब्दात सांगता येत नाही. ज्येष्ठातल्या काळसर ढगांच्या गडगडाटासह दूरवर चमकणारी वीज जेवढी सुंदर दिसते त्यापेक्षा ती जवळपास तिच्या प्रचंड शक्तीसह पडल्यावर भयावह असते.

ग्रामीण भागात आजही विजा चमकत असल्या की विळा किंवा लोखंडाची एखादी वस्तू अंगणात फेकतात. जेणेकरून ती वीज त्या धातूकडे आकर्षित होऊन घरावर आणि गोठ्यावर न पडता आपले नुकसान टळेल. कुठून आले असेल आपल्या पूर्वजामध्ये वीजे मध्ये असलेल्या विद्युत प्रभाराला वळते करण्याचे हे विज्ञान? असा प्रश्न माझ्या मनात अनेक दिवसापासून रुंजी घालत राहिलाय. ज्येष्ठ येतो तो ढगांच्या आड सूर्याला लपवत, त्यामुळे अनेकदा दिवसासुद्धा संध्या प्रकाशासारखा उजेड पसरलेला असतो. नेमका पाऊस पडत नाही, नेमके ऊनही पडत नाही. आणि हवा कुंद होऊन मंद वेगाने वाहते. अशावेळी या कोंदट आणि दमट सावलीपेक्षा वैशाखाचे रणरणते ऊन बरे होते असे वाटू लागते. वैशाखात आटू लागलेले जलसाठे जेष्ठात अनेकदा कोरडे झालेले असतात.

अनेक गावांमध्ये पाण्याच्या टँकर शिवाय पाणी दिसत नाही, पाण्याचे हे दुर्भिक्ष फार जीवघेणे असते. आम्रवृक्षाचा फुलांचा-फळांचा बहर निघून गेलेला असतो, नाही म्हणायला काही आंब्यावर असलेली फळे या काळातच येतात हे एक निसर्गाचे देण बरं का? कारण हा उशिराने येणारा आंबा लोणचे घालण्यासाठी कामी येतो. लोणचे करण्याची गंमत काही औरच असते, सुरुवातीला आंबा कापण्यासाठी गावात फिरणाऱ्या सरदार लोकांकडे एक मोठी पावशी असे, ती गल्लीत दहा- बारा घरामागे एखादी असायची.

मग त्याच्याकडून पावशी आणणे, आंबे कापणे त्यात त्यातील मोजक्या कोयीसुद्धा टाकणे असा एक सहविचारी कार्यक्रम महिलावर्ग राबवत असे. सर्वांनी एकत्र येऊन लोणचे घालायचे आणि एखाद्या घरातील लोणचे खराब झाले तर त्याला नजर लागली असे सांगून आपल्याच टोळीतल्या एखाद्या महिलेची तिच्या माघारी निर्भत्सना करायची हा प्रकार फार गमतीचा वाटत असे.

आजच्या काळात मॉलमध्ये मिळणाऱ्या लोणच्याच्या बाटल्या विविध कंपन्या, विविध चवी आणि वेगवेगळ्या प्रकारचे असतात. मात्र, गावरान लोणच्याचा गोडवा त्यात सापडत नाही. जेष्ठांमध्ये ज्यांचे अनन्यसाधारण महत्व सांगितले जाते असा एक वृक्ष म्हणजे वड, पौराणिक कथा मधून सत्यवान आणि सावित्री ह्या पात्रासह भेटलेला हा वृक्ष त्यांच्या पारंब्याच्या दाढीमुळे मला लहानपणापासूनच तप करणाऱ्या ऋषीसारखा दिसत असे. आता त्यावर आजीने सांगितलेल्या गोष्टीतला यम त्याच्या रेड्यासह राहतो की गावकरी सांगतात तसा कोणी मुंज्या त्यांच्या हडळ आणि चेटकीण ह्या परिवाराला घेऊन राहतो ह्या बाबत मनात गोंधळ असला तरी त्या झाडाखाली एकट्याने जाऊन बसावे, असे आठव्या वर्गात जाईपर्यंत वाटले नाही हे ही खरं. पुढे कधीतरी बऱ्यापैकी विचार करू लागल्यावर वडाचे झाड खरं तर ऑक्सिजन मोठया प्रमाणात देते म्हणून प्राणदायी, कदाचित सत्यवानास कडक उन्हात काम करतांना तसेच घडीत ढगाळ आणि रणरण उन्ह अश्या दमट आणि कोंदट वातावरणात मेहनत केल्याने मृच्छा आली असावी, त्याच्या धर्मपत्नीने म्हणजे सावित्रीने त्याला सावलीत वडाखाली नेले असावे, वडाच्या थंडगार सावलीत ऑक्सिजनच्या मोठ्या पुरवठ्यामुळे तो शुद्धीवर आला असावा, सावित्रीने आपला नवरा वाचला म्हणून देवाची करुणा भाकली आणि ती परंपरा सुरू तिने झाली असावी, अर्थात असा दावा नाही माझा, तर्क आहे.

तेंव्हापासून ह्या पुरूष प्रधान संस्कृतीमध्ये आपले सांसारिक दुःख विसरून स्त्रिया पुन्हा नव्याने हाच नवरा जन्मोजन्मी मिळो असा आशीर्वाद मागतात वडाला दोरा बांधून, उपवास करून.... खरे तर सावित्रीने उपवास केला नाही किंवा वडाला दोरा बांधला नाही. तिने जीवन मरण याबाबत यमाशी तात्विक चर्चा केली आणि या चर्चेत यमाने तिचे श्रेष्ठ मान्य केले आणि तिच्या पतीला जीवदान दिले असा अर्थ जरी निघाला तरी स्त्रियांना नटून थटून वडाची पूजा करणे, उपवास करणे यातच आनंद मिळतो असे आजच्या काळातील चित्र दिसते. जेष्ठातल्या या पौर्णिमेच्या दिवशी संत कबीराचा जन्म झाला होता. त्यामुळे सुद्धा ज्येष्ठ पौर्णिमेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जेष्ठामध्ये दिवस मोठे असतात त्यातही वर्षभरातला सर्वात मोठा दिवस याच कालावधीत येतो.

सात जूनपासून पावसाळा सुरू होतो हे अगदी लहानपणापासून लक्षात राहिले अर्थात बदललेल्या ऋतूंच्या रूपामध्ये सात जूनला पाऊस पडेल न पडेल ते सांगता येत नाही. मात्र, लहानपणापासून दिसत आलेला आणि मृग नक्षत्राच्या अगदी सुरुवातीला दिसणारा मिरगाचा किडा आजही घरामध्ये कुठून येतो? ते कोडे उलगडत नाही. ऐन मृगामध्ये दिसणारा हा किडा संपूर्ण वर्षभर कुठे लपून बसलेला असतो तेही कळत नाही? मात्र आजच्या काळात गाजर गवत फोफावल्याने घरातील लाईटवर चावरे आणि अतिशय घाणेरडा वास सोडणारे लाईटवर जमा होणारे किडे दिसल्यावर हिट स्प्रे मारताना घरात मिरग दिसला की त्यावर कुंकू टाकून त्याची पूजा करणारी पिढी आठवते. तीच पिढी ज्येष्ठ महिन्यात गंगा नदी भगीरथाच्या प्रयत्नातून पृथ्वीवर आली म्हणून गंगादशाहार हा उत्सव साजरा करायची. लोणार येथे गंगादशाहार या काळात लोणारच्या धारेवर आंघोळ करणे म्हणजे गंगेत स्नान करणे हा समज असल्याने एकदा त्या प्रचंड गर्दीत माझ्या आजीने मला ते गंगा स्नान घडवून आणले होते. तो उत्सव अजूनही आठवले की, मन ओलेचिंब होते. (पान ६ वर)



पान १ वरून

## सुरक्षित विमान प्रवासावर प्रश्नचिन्ह!

पक्ष्याची धडक वगैरे कारणांची चर्चा सुरू असली तरी घातपाताची शक्यतादेखील पूर्णपणे बाद ठरविता येत नाही. कारण, बोइंग ७८७ ड्रीमलायनर हे एक विशालकाय विमान आहे. अत्यंत सुरक्षित आणि विश्वासपात्र अशी या विमानाची ओळख आहे. इंजिनातील किरकोळ बिघाड किंवा तांत्रिक गडबडीतही हे विमान सुरक्षित राहते, असा दावा केला जातो. त्यामुळेच कित्येक हजार किलोमीटरच्या लांबच्या प्रवासासाठी सगळ्या महत्त्वाच्या विमान कंपन्या हे विमान वापरतात.

जागतिक आकडेवारीनुसार, विमान अपघाताच्या संभाव्य कारणांचे प्रमाण हे मानवी त्रुटी ७० टक्के, तांत्रिक बिघाड २० टक्के, प्रतिकूल हवामान ११ ते १५ टक्के, देखभालीतील दोष १० टक्के, पक्ष्यांची धडक २ टक्के. तसेच, सर्व विमान अपघातांपैकी ८० टक्के अपघात टेकऑफ आणि लँडिंगच्या दरम्यान घडतात. या पार्श्वभूमीवर पाहिल्यास, एआय१७१ विमानाचे टेकऑफनंतर लगेचच कोसळणे ही बाब गंभीर संशोधनाची गरज दर्शवते. या भयानक अपघाताने ३७ वर्षांपूर्वी अहमदाबाद विमानतळावरील भीषण अपघाताची आठवण करून दिली. १९ ऑक्टोबर १९८८ रोजी अहमदाबाद विमानतळावर झालेल्या विमान अपघातात १३५ जणांचा मृत्यू झाला होता. हा अपघात इंडियन एअरलाइन्सच्या इतिहासातील सर्वात प्राणघातक अपघात होता आणि भारताच्या इतिहासातील चौथा प्राणघातक विमान अपघात मानला जातो. भारतात यापूर्वीही अनेक अपघात झाले. प्रत्येक अपघातानंतर चौकशी समित्या नेमल्या जातात. त्याचा अहवाल सादर होतो. सुधारणांसाठी शिफारसी केल्या जातात. परंतु या चुकांमधून शिकून पुढे जाण्याचा आणि सुरक्षा उपाययोजना प्रभावीपणे लागू करण्याचा प्रयत्न अपेक्षित गतीने होताना दिसत नाही. अनेकदा तांत्रिक बिघाड, मानवी चुका, देखभालीतील हलगर्जीपणा अथवा पायाभूत सुविधांची कमतरता ही अपघाताची कारणे असल्याचे समोर आणले जाते. या कारणांवर कायमस्वरूपी उपाययोजना का केली जात नाही. विमान कंपन्या, नियामक संस्था आणि सरकारने याकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे.

वैमानिकांना योग्य प्रशिक्षण, विमानांची नियमित आणि कठोर तपासणी, एअर ट्रॅफिक कंट्रोल यंत्रणेतील सुधारणा, आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ प्रतिसाद देण्याची क्षमता वाढविणे आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षा मानकांचे पालन करणे, या बाबींचा कटाक्षाने समावेश होणे आवश्यक आहे. केवळ तांत्रिक बाजूच नव्हे तर नैतिक आणि सामाजिक जबाबदारीची भावनाही महत्त्वाची आहे. या अपघातातून धडा घेऊन भविष्यात असे अपघात टाळण्यासाठी आणि विमान प्रवासाला खर्या अर्थाने सुरक्षित बनविण्यासाठी ठोस पावले उचलणेही गरजेचे आहे. ब्लॅक बॉक्सच्या डेटावरून पुढील काही दिवसांत या अपघातामागील नेमके कारण उघड होईल. ब्लॅक बॉक्समध्ये 'मायडे' कॉलचे तपशील, अचानक मिळालेला इशारा, तसेच टेकऑफनंतरच्या निर्णायक क्षणांत बचावासाठी केलेले प्रयत्न हे सर्व अचूकपणे नोंदलेले असतात. या घटनेत विमान अवघ्या ६२५ फूट उंचीवर असताना कोसळले आहे. त्यामुळे फ्लाइट डेटा रेकॉर्डरमधून इंजिनची कामगिरी, विमान नियंत्रण प्रणाली कोणत्या स्थितीत होती, तसेच इशारा प्रणाली कशी होती अशा अनेक तांत्रिक बाबी समोर येतील. कॉकपीट व्हॉईस रेकॉर्डरमधून आकस्मिक परिस्थितीची चेकलिस्ट, वैमानिकांमधील संवाद, यांत्रिक बिघाडावर चर्चा ! हे सर्व स्पष्ट होऊ शकते. पण या दुर्घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

अनेकांनी प्रवासाआधी विमाने सुरक्षित आहेत का याबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. मात्र नागरी विमान वाहतुकीची जागतिक आकडेवारी स्पष्टपणे दाखवते की, विमान प्रवास हा अजूनही सर्वात सुरक्षित प्रवासाचा प्रकार आहे. हजारो किलोमीटर प्रवासात मृत्यूचा धोका अत्यंत नगण्य असतो. याचा अर्थ असा नाही की काळजी घ्यायची गरज नाही.

पान १ वरून

## चिनाब सेतू काश्मीरचा नवा आकर्षणबिंदू

विकासाच्या मार्गावर तीव्र गतीने वाटचाल करणार आहे. या भागात भारतीय रेल्वे आता आणखी एका उंचीवर पोहोचणार आहे.

काश्मीरमध्ये चिनाब नदीवर जगातील सर्वात उंच सिंगल आर्च रेल्वेपुलाचे उद्घाटन करण्यात आले आहे. जम्मू-काश्मीरमधील रियासी जिह्यातील कौरी गावाजवळ चिनाब नदीवरील हा रेल्वे पूल देशातील प्रसिद्ध अभियांत्रिकी कंपनी अफकॉन्स इंडियाने बांधला आहे. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जगातल्या सर्वात उंच असलेल्या चिनाब रेल्वे पूलावर तिरंगा फडकवला. या रेल्वे पूलाची निर्मिती ही भारताच्या विकासातील एक महत्वाचा क्षण मानला जात आहे. चिनाब नदीवर या पूलाचे बांधकाम हे सर्वात मोठे आव्हान मानले जात होते. मात्र, हे आव्हान पूर्ण करत काही महिन्यांपूर्वी या पूलावरून रेल्वेची पहिली यशस्वी चाचणी पार पडली होती. २२ वर्षांच्या अथक परिश्रमानंतर हे स्वप्न साकार झाले आहे. हा पूल पॅरिसच्या आयफेल टॉवरपेक्षा ३५ मीटर जास्त उंच आहे. उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला हा रेल्वे मार्ग २७२ किमीचा आहे. या रेल्वे मार्गावर ३६ बोगदे आहेत, ज्यांची लांबी ११९ किमी आहे. रेल्वे मार्गावर ९४३ रेल्वे पूल आहेत. कटरा रेल्वे स्थानकावरून वंदे भारत एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवण्यापूर्वी पंतप्रधान मोदींनी शालेय मुलांशी संवाद साधला. त्यांनी ट्रेनमध्ये असलेल्या रेल्वे कर्मचार्यांशीही संवाद साधला. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी जम्मू आणि श्रीनगर रेल्वे मार्गावर बनलेल्या चिनाब ब्रिजला एक इंजिनीअरिंग मार्बल म्हटले आहे.

चिनाब रेल्वेपुलामुळे अमरनाथ यात्रेला जाणाऱ्या भाविकांचा प्रवास अधिक सोपा होणार आहे. या ऐतिहासिक पुलाच्या उद्घाटनामुळे पवित्र अमरनाथ गुहेत जाणाऱ्या यात्रेकरूंनाही एक भेट मिळणार आहे. ३ जुलैपासून सुरू होणाऱ्या अमरनाथ यात्रेसाठी ट्रेनमुळे यात्रेकरुंना कटरा आणि श्रीनगर दरम्यान जलद, सुरक्षित आणि सुरळीत प्रवास करण्यास मदत होईल. रामबन-बनिहाल परिसरात मुसळधार पावसामुळे जम्मू-श्रीनगर महामार्ग बऱ्याच वेळा बंद पडतो. अशावेळी प्रवाशांना ट्रेनने प्रवास करणे सोपे होईल. काश्मीर खोऱ्याला जाणारा हा पहिला थेट रेल्वेमार्ग ठरला आहे. चिनाब रेल्वे पुलाचे आयुष्य सुमारे १२५ वर्षे असेल असे मानले जाते. जोरदार वादळे, भूकंप आणि स्फोटकांचा त्यावर कोणताही परिणाम होणार नाही.

जगातील या सर्वात उंच रेल्वे पुलावर ताशी १०० किमी वेगाने गाड्या धावू शकतील. बांधकामादरम्यान चिनाब नदीच्या दोन्ही बाजूंना ३,००० फूट उंचीपर्यंत काम करणाऱ्या उच्च-क्षमतेच्या केबल क्रेन तैनात करण्यात आल्या होत्या. हा पूल १० ते ४० अंश सेल्सिअस तापमानात कोणत्याही समस्येशिवाय सामान्य रेल्वे ऑपरेशन करण्यास सक्षम आहे. पहिल्यांदाच भारतीय रेल्वेमध्ये जगातील सर्वोत्तम अभियांत्रिकी वापरली आहे.

कथा

मो. बा. देशपांडे

'प्राची कुठे निघालीस? आज कॉलेजला सुट्टी आहे ना!'' ''आई, कॉलेजला आज सुट्टी असली तरी आमचे एक्स्ट्रा क्लासेस चालताहेत. त्यानंतर गॅदरिंगची प्रॅक्टिस; मग लगेच माझी ट्युशनची वेळ होते. मी परस्पर तिकडे जाईल... घरी यायला रात्रीचे दहा होतील.'' ''अगं, आणि हे काय खांदे उघडे असलेला असा हा टॉप घालून जाणं बरं दिसतं का?'' ''आई, मी काय ढोपरापर्यंत ब्लाऊज घालून काकूबाई दिसायला हवीय काय? हल्ली हाच ट्रेंड आहे.'' प्राची मान उडवून निघून गेली. सुलभाताई किचनकडे वळल्या.




आतल्या खोलीत माधवराव दरवाजाआडून सारे संभाषण ऐकत होते. प्राची गेल्यावर ते बाहेर आले. काही बोलले नाही. काहीसे विचारमग्न दिसत होते. सुलभाताईंचा चेहरा कासावीस झाला होता. ''हल्ली काय काय बातम्या ऐकायला मिळताहेत. वेळ सांगून येते का? पण म्हणून तरुण मुलींना काय घरात बसवून ठेवणार? घराबाहेर निघाल्या की धोका सुरू! काय करावे काही कळतच नाही.'' प्राचीला घरी यायला दहाचे साडे-दहा झाले.

प्राची सांगत होती... ''आई, अगं आज काय झालं सांगू? माझी मैत्रीण स्नेहल आहे ना; तिला एका तरुणाने तुझ्या वडिलांशी ओळख आहे असं सांगितलं अन् म्हणाला त्यांनी तुला बोलावलंय लवकर गाडीवर बस!'' स्नेहल म्हणाली, ''तर मग पासवर्ड सांगा.'' असं म्हणताच तो मुकाट्याने निघून गेला. ''म्हणजे काय...?'' सुलभाताई असमंजस चेहरा करून विचारत होत्या. ''ठरलंय तसं त्यांच्या घरी, फेक मेसेजपासून दिशाभूल टाळण्यासाठी. आम्ही अमुक क्रमांक किंवा शब्द असलेला पासवर्ड निरोप्याला देऊ. तो त्याने बरोबर सांगितला तर व्यक्ती जेन्युईन आहे असं समजावे.'' आज संध्याकाळी सायंभ्रमण करताना माधवरावांनी कट्ट्यावर सगळे जमले असताना नेमका तोच विषय काढला. आता कॅब संस्कृतीत मुली एकट्या अनोळखी ड्रायव्हरसोबत बंद गाडीतून प्रवास करतात. जाळे टाकणारे गळ लावून बसलेले असतात. आणखी किती निर्भया? हा प्रश्न डोक्याचा पार भुगा करून टाकतोय! तुम्ही प्रश्न विचारत राहा. आम्ही आपले काम करतो! बरं या प्रश्नाला उत्तर काय? कुणी अधिक कठोर शिक्षा करा, अशी मागणी करून नेतेगिरी करतात. सद्यस्थितीत एवढा इतकाच पुरेसा आणि ठोस उपाय आहे काय? याचे मूळ ज्यात आहे यावर विचार कुणीच का करत नाही? ''माधवराव मला सांगा, वचक बसेल.. रोकथाम होईल. वारंवार निर्भया प्रकरणांची पुनरावृत्ती का होतेय? कायमस्वरूपी प्रश्न निकालात निघेल असा काय उपाय आहे?'' मधुकाका बोलू लागले. ''हे बघा, या प्रश्नावर मुळापासून विचार झालेला दिसत नाही. तरुण किंवा तरुणी कुणा एकाला दोष देऊन हा प्रश्न मिटणारा नाहीये. यासाठी विचार करा..

वारंवार असं का होतंय? विसर का पडतो? घटनेची पुनरावृत्ती का होते? मी सांगतो ते नीट ऐका, कायदे कठोर करणे हा एक उपाय झाला. याशिवाय या प्रश्नाला अनेक आयाम आहेत. दर २० वर्षांनी नवी पिढी येते. वय वर्षे १६ ते ३० या वयात संप्रेरकाचे शरीरात थैमान असते. कामवश झालेला असंस्कारी युवक बेभान होतो. त्यावेळी त्याला कसल्याच कायद्याचे स्मरण होत नाही. तो आधीच्या घटना आठवत नाही. डोळ्यापुढे पुढील परिणाम दिसत नाहीत. तरुणवयात हार्मोन्स स्वस्थ बसू देत नाहीत. २० वर्षांनी पुन्हा नवीन पिढी आली की पुन्हा तेच हार्मोन्स. असे हे दुष्टचक्र आहे.'' ''अगदी खरं आहे ते!'' सारे एकसुरात बोलले.

''हे बघा, मी यावर सखोल चिंतन केलं आहे. समाजाचा हा एक विद्रूप चेहरा असून तो बदलायला हवाय. आपली शिक्षण पद्धती सदोष आहे. शाळेत नैतिक शिक्षणावर भर दिलेला दिसत नाही. नैतिक शिक्षणात बॅड टच म्हणजे काय? प्रायव्हेट पार्टचा अर्थ काय? हे सर्व अभ्यासक्रमात समाविष्ट व्हायला हवे. दर २० वर्षांनी येणाऱ्या नव्या पिढीकडे ते नव्याने पोहोचायला हवे.'' ''घटना घडल्यावर जनतेला क्षणिक उबाल येतो. कुणी चौकात कॅन्डल मार्च काढून श्रद्धांजली देतात. पांढरपेशे लेखणी सरसावून वृत्तपत्राला जळजळीत पत्रे पाठवतात. कायद्याचा वचक उरला नाहीये. कायदे अधिक कडक करा, असं वक्तव्य करतात. बलात्कारासाठी कोणत्या देशात कोणती शिक्षा याची विस्तृत माहिती देतात. शासन हेल्पलाईन नंबरची तरतूद करते. कुणी मुलींना मार्शल आर्ट शिकणे जरूरी आहे असं म्हणतात. चार दिवस तो एकच विषय सर्वांना पुरून उरतो. नुकतीच एक जाहिरात बघितली, त्यात आई बाहेर जाणाऱ्या मुलीला 'सोबत ठेवली का सुरी' 'तिखटाची पुडी सोबत घेतली का?' असे विचारत असते. पण हे काही ठोस उपाय नाहीत. कुणी तरुणीवर ठपका ठेवत त्यांच्या उत्तान वेशभूषेला दोषी ठरवतात. बस इतकंच. पुन्हा येरे माझ्या मागल्या...!

''होय. पण यावर उपाय काय?'' राघवदादा काठी जमिनीवर टेकवत म्हणाले. ''वय वर्षे ८ ते १४ या वयात वाचनाची आवड निर्माण होऊ शकते. पूर्वी संस्कारित पुस्तके वाचण्याची पद्धत होती. त्याची जागा आता विविध ट्युशन्स आणि समर कॅम्प-विंटर कॅम्पनी घेतली आहे. त्या जुन्या पद्धतीचे पुनरुज्जीवन व्हायला हवे. वाचनाने विचार-विश्व समृद्ध होते. जगाची ओळख पटते. स्वतःचे स्वतंत्र विचार तयार होतात, नाही तर नवा ट्रेंड बघून त्याला बळी पडायला होतं. केवळ टीव्हीच्या बातम्या नव्हे, तर समग्र वृत्तपत्र वाचन नव्या पिढीने करायला हवे!'' ''त्याने काय होणार?'' रामभाऊ भुवया उंचावून विचारात होते. ''वृत्तपत्रात सर्वच भल्याबुऱ्या बातम्या एकत्रित छापलेल्या असतात. त्यामुळे चांगले आणि वाईट याची सर्वार्थाने ओळख होते. ही प्रक्रिया आपोआप होणारी असल्याने त्यासाठी काही वेगळे प्रयत्न करावे लागत नाहीत. नवीन तंत्रज्ञान जरूर आत्मसात करावे. जगात आपण मागे राहता कामा नये, पण यासाठी अंकुश ठेवणाऱ्या त्या संस्कारांना विसरण्याची मुळीच गरज नाही.'' ''होय, पण हे झाले विचार.

आता कृतीची गरज आहे!'' माधवराव ठामपणे म्हणाले. ''म्हणजे नेमकं काय करायचं?'' बंडूभाऊ तर्जनी ओठाजवळ नेत उद्गारले. ''आपण भारतीय सदाचार शिक्षण वर्ग चालू करायचे. निरपेक्षपणे नेटाने ही मोहीम राबवायला हवीय. आपण निवृत्त लोकांनी केवळ कट्ट्यावर साधक-बाधक चर्चा करून हे असेल प्रश्न सुटणारे नाहीयेत.

प्रत्येक शाळेत जाऊन विद्यार्थ्यांना प्रबोधन करायचं. शालेय शिक्षकांना हा विषय नैतिक शिक्षणांतर्गत शिकवणे बंधनकारक करायचे. शिक्षण मंडळाला आणि विधिमंडळात उच्च स्तरावर हा प्रश्न मांडायला हवा. (पान ६ वर)

संत

प्रकाश एदलाबादकर



महाराष्ट्राच्याच नव्हे, तर भारताच्या सांस्कृतिक इतिहासाच्या प्रवाहात विश्ववात्सल्य आणि कारुण्य यांचा स्फटिक निर्झर ओघवता करणाऱ्या संतप्रवर श्रीज्ञानेश्वर महाराजांचे अक्षर वाङ्मय आजही आपल्या सारख्यांना दीपस्तंभासमान आहे. माउलीच्या जन्मापासून आजपर्यंत महाराष्ट्राच्या लोकमातांमधून कितीतरी पाणी वाहून गेलेले आहे. दगडांच्या आणि

# मोठ्यांच्या सिद्धांतांचा घेतला पुरा पडताळा

बकुळ फुलांच्या या महाराष्ट्रात आजपर्यंत कितीतरी समाजसेवक, विचारवंत, सेवाव्रती, सारस्वतकार, सत्ताधारी आले आणि गेले. कितीतरी नवीन बाबी उदयाला आल्या आणि लयालाही गेल्या. परंतु श्रीज्ञानेश्वर नावाच्या, बाराव्या शतकातील महामानवाची नाममुद्रा अवघ्या मराठी जनमानसावर एखाद्या तप्त मुद्रेसारखी सुप्रतिष्ठित झालेली आहे. हिंदू धर्म हा गतानुगतिक, अपरिवर्तनीय आणि सनातन आहे, अशी सातत्याने टीका करणाऱ्या मंडळींनी हे लक्षात घेतले पाहिजे की, गेल्या हजारो वर्षांत हिंदू धर्मात कितीतरी रचनात्मक परिवर्तने झालेली आहेत, पुढेही होतील. विश्वबंधुत्व, समता, करुणा, सर्वांभूती प्रेम, कर्मकांडाचे स्तोम कमी करणे, मानवजातीतील सुसंवाद वाढणे यासाठी महाराष्ट्रातील संतांची वाणी, लेखणी आणि करणी आजपर्यंत साह्यभूत ठरली आहे आणि पुढेही ठरेल. या सर्वांत ज्ञानदेवांचे मोठेपण यातच आहे की, बदलत्या काळाची पावले, त्यांचा पदरव आणि त्यातून ध्वनित होणारे, प्रतीत होणारे नवकाळाचे स्पंदन त्यांनी सर्वप्रथम जाणले.

धर्माच्या सश्रद्ध लोकाभिमुखतेची जाण ज्ञानदेवांना सर्वप्रथम आली. समाजाच्या सर्वच थरातील व्यक्ती एकत्र येतील तर, अवघे विश्व मांगल्याने भरून टाकण्याची शक्ती त्यातून प्रस्फुटित होईल, हे द्रष्टेपण त्यांच्याजवळ होते. प्रत्येक युगातील प्रश्न नवे असतात. काही प्रश्न यदृच्छेने निर्माण होतात तर काही मानवनिर्मित असतात. त्या प्रश्नांना सामोरे जाण्याचे सामर्थ्य या समाजात उत्पन्न व्हावे यासाठी प्रबोधन आवश्यक आहे, याची ज्ञानदेवांना व्याकुळ जाणीव होती. परंतु प्रज्ञावंत प्रबोधक आणि अज्ञ सामान्यजन यांच्यात प्रचंड अंतर होते. ते अंतर माउलीने तोडले. सामान्य माणसाच्या हृदयात अढळ स्थान मिळविले. हरिपाठाचे निमित्ताने भक्तसंवाद, ज्ञानेश्वरीच्या निमित्ताने लोकसंवाद, चांगदेव पासष्टीच्या निमित्ताने मित्रसंवाद आणि अमृतानुभवाच्या निमित्ताने आत्मसंवाद साधणाऱ्या या लोकोत्तर विभूतीने हे सर्व कसे साधले असेल, हा विचार जेव्हा जेव्हा मनात येतो तेव्हा तेव्हा हात जोडून नतमस्तक होण्यापलीकडे आपण काय करू शकतो ? समाजामध्ये ज्यांना एखादा नवीन विचार ज्यांना पेरायचा असेल, त्यांनी प्रत्यक्ष लोकसंपर्क साधला पाहिजे. लोकात मिसळले पाहिजे. समाजपुरुषाचा भाव, त्याच्या श्रद्धा, विश्वास, चालीरीती आपल्या मानल्या पाहिजेत. सामान्य लोकांपुढे पढीक पांडित्य, तर्ककठोर विचार, कोरडा बुद्धिवाद टिकत नसतो. उलट अशी माणसे समाजापासून दुरावतात. सामान्य माणसासाठी ज्ञानाची कवाडे कायमची बंद करून टाकणारे तत्कालीन धर्ममार्तंड आणि आजचे तर्ककठोर बुद्धिवादी विचारवंत यांचे समाजापासूनचे अंतर तुटायला हवे. विचारवंतांनी सांगितलेले विचार श्रद्धावंतांना पटायला हवे.

समाजाला हे बळ सर्वप्रथम ज्ञानदेवांनी दिले म्हणून ते क्रांतिकारी! '**हृदया हृदय एक जाले। ये हृदयीचे ते हृदयी घातले। द्वैत न मोडता ऐसे केले। आपणा ऐसे अर्जुना।। दीपें दीप लाविला। तैसा परिश्वन्गु तो जाला। द्वैत मोडितां केला। आपणपें पार्थु।।**' आपली उपनिषदे म्हणजे विचारांची गगनस्पर्शी शिखरे आहेत. या उपनिषदांचे सार म्हणजेच भगवद्गीता! सकल हिंदू समाजाला भगवंताने दिलेले पाथेय. या ग्रंथराज गीतेच्या आधारे समाजाचे प्रबोधन केल्यास ते व्यक्ती-व्यक्तीपर्यंत पोचेल, अशी कल्पना ज्या क्षणी त्या ज्ञानियांचा राजाच्या मनात आली असेल, तो क्षण मानवजातीच्या कल्याणाच्या सूत्रपाताचा मुहूर्त असावा. ज्ञानेश्वरी ही गीतेवरील टीका आहे. माउलीने ज्ञानेश्वरीच्या निमित्ताने ही एक स्वतंत्र ग्रंथनिर्मितीच केलेली आहे. काही दिवसांपूर्वी एक जुने कवितांचे पुस्तक सहजच चाळत होतो. आम्हाला ११ व्या वर्गात अभ्यासाला असलेली एक कविता या संग्रहात होती. ती वाचत असताना शाळेच्या आठवणीत मन रमून गेले. शालेय वयात कविता वाचायची म्हणजे परीक्षेत प्रश्न सोडवण्यासाठी. जास्तीत जास्त त्या कवितेचे रसग्रहण करायला वाचायची. त्या कवितेचा आशय, त्यातील प्रतीके, कवितेचा परिणाम या गोष्टींचा विचार करण्याचे ते वयही नसते. परंतु तीच कविता किंवा कविताच कशाला कोणतीही कलाकृती वाढत्या वयात वेगळाच आशय घेऊन समोर येते. डोळ्यांसमोर होती कवी बी यांची '**तेजाचे तारे तुटले' ही कविता! 'तेजाचे तारे तुटले ।** मग मळेंची सगळे पिकले लागती दुहीच्या आगी राष्ट्राच्या संसाराला अति महामूर पूर येतो ढोंग्यांच्या पावित्र्याला खडबडाट उडवी जेव्हा कोरड्या विधींचा मेळा चरकात मान्यवर पिळती सामान्य मुकी जनता ती लटक्याला **मोले येती कौटिल्य स्वैर बोकाळे।** तेजाचे तारे तुटले' कविता वाचता वाचता लक्षात आले की, आज तरी काय वेगळी परिस्थिती आहे? ढोंग्यांच्या पावित्र्याला खरेच पूर नाही का आला आजही? सामान्य मुक्या जनतेचे हाल आजही तेच आहेत, जे कवी बींच्या काळी होते. कविता वाचता वाचता एका कडव्याने मला प्रचंड अस्वस्थ केले. या सर्व अंधाधुंदीच्या विरोधात पहिली क्रांती कुणी केली असेल तर ती ज्ञानेश्वरांनी, असे कवीचे सांगणे आहे.

एरवी आपण ज्यांना करुणासागर किंवा शांतिब्रह्म म्हणतो त्या ज्ञानदेवांना कवीने चक्क बंडखोर म्हटलेले आहे. तत्कालीन समाजव्यवस्थेच्या विरोधात माउलींनी बंड केले, क्रांती केली. प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात ज्या ज्या काळात ज्यांनी ज्यांनी म्हणून बंड केले, क्रांती केली त्या सर्वात ज्ञानेश्वर हे पहिल्या क्रम ांकाचे बंडवाले आहेत, असे कवी बी यांचे म्हणणे आहे. कवी बी लिहितात... 'त्या बड्या बंडवाल्यात ज्ञानेश्वर माने पहिला मोठ्यांच्या सिद्धांतांचा घेतला पुरा पडताळा डांगोरा फोलकटांचा पिटविला अलम दुनियेला झुंजोनी देवा दैत्या अमृतामधीं न्हाणी जनता उजळिला मराठी माथा सत्तेचे प्रत्यय आले। तेजाचे तारे तुटले' ज्ञानदेवांच्या काळात कर्मकांडाचे स्तोम प्रचंड बोकाळले होते. बोपदेव, हेमाद्री यांच्या ग्रंथांनी, विशेषतः 'चतुर्वर्ग चिंतामणी'सारख्या ग्रंथांनी समाजात विषमतेचे विष पसरलेले होते. वर्ण-वर्गांमधील भेदभाव पराकोटीला पोचलेला होता. सर्वसामान्य प्रापंचिक जनता यापायी त्रासून गेली होती. केवळ जनताच नव्हे तर प्रत्यक्ष ज्ञानदेव आणि त्यांची भावंडे यांनाही या व्यवस्थेचे चटके सहन करावे लागले. विठ्ठलपंत आणि रुक्मिणी यांचे देहविसर्जन, या भावंडांच्या अन्नात माती कालवणे, त्यांना वाळीत टाकणे, मौंजीची विनंती नाकारणे, या मुलांना संन्याशाची पोरे म्हणून हिणविणे हा सर्व छळ त्यांनी सहन केला. त्या विरुद्धची चीड आणि संताप माउलीच्या मनात नसेलच कशावरून? तो होताच. कारण त्यांच्या अन्नात माती कालवल्यामुळे ते संतापून झोपडीत येऊन बसले आणि मुक्ताईने त्यांची समजूत घातल्याचा प्रसंग सर्वांना ठाऊकच आहे. याच प्रसंगात बंडाची उर्मी म्हणा किंवा क्रांतीची ज्योत म्हणा, माउलींच्या मनात पेटली असावी. मुक्ताईच्या ताटीच्या अभंगांनी माउलीला एक नवा संदेश दिला, अनुभव दिला.

आपण साधू झालो म्हणून दुसऱ्यांना कमी लेखू नका. उलट त्यांनाही आपल्यासारखे करा. '**योगी पावन मनाचा। साहे अपराध जनाचा विश्व रागे झाले वह्नी। संती सुखे व्हावे पाणी शब्दशस्त्रे झाले क्लेश। संती मानावा उपदेश विश्वपट ब्रह्म दोरा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा तुम्ही तरुनि विश्व तारा ।** ताटी उघडा ज्ञानेश्वरा' कर्मकांड आणि मिथ्या व्यवहार यामुळे ज्यांनी तुझा छळ केला त्यांनाच तुला उपदेश करायचा आहे. तूही तरून जा आणि त्यांनाही तारून ने हेच ते बंडखोरीचे बीज. समाजाला धर्मग्लानी आलेली आहे. शब्दशूरांचे अकर्मण्यत्व वाढलेले आहे. कर्तव्यकर्माचा विसर पडून समाज कर्मकांड शरण झाला आहे. समाजात सकाम भक्तीचे प्राबल्य वाढलेले आहे. ढोंग आणि पाखण्ड यांची चलती आहे. हे सर्व माउलीच्या लक्षात आले होते. राष्ट्रीय चारित्र्याचा लोप होत असून सर्व समाज व्यक्तिकेंद्री झाला आहे, समाजमनाला योग्य वळण लावणारे नेतृत्व नाही, हे त्या द्रष्ट्या संतांच्या लक्षात आले. उत्तर भारतात त्यावेळी फोफावलेले परकीयांचे आक्रमण आज ना उद्या दक्षिणेत आल्यावाचून राहणार नाही, हे त्या क्रांतदर्शी व्यक्तिमत्त्वाने हेरले असले पाहिजे आणि म्हणूनच सामान्य जनतेला या कर्मकांडापासून दूर नेऊन शुद्ध अध्यात्माची शिकवण दिली पाहिजे, हे ज्ञानदेवांनी ताडले. मने तयार झाली की, मनगटे आपोआपच तयार होतात. या सर्व परिस्थितीवर मात करण्याचा संकल्प म्हणजे क्रांती. क्रांती म्हणजे काही लाठ्या, काठ्या, तलवारी, बंदुका, रक्ताचे पाट नव्हे. माउलीने क्रांती केली ती वैचारिक क्रांती! बंड केले ते बुरसटलेल्या विचारांविरुद्ध, निरर्थक कर्मकांडाविरुद्ध!! समाजचारित्र्याची जर उत्तम जडणघडण करायची असेल तर एक अविनाशी व अक्षय विचारधन समाजाला दिले पाहिजे, हे माउलीस जाणवले होते. हे प्रबोधन केवळ गीतेच्याच आधारे होऊ शकते, ही त्यांना जाणीव होती.

(पान ६ वर)

आतापर्यंत प्रत्यक्ष युद्धात महिलांचा सहभाग कमीच होता. वरिष्ठ स्तरावर अधिकारी म्हणून महिला काम करत होत्या; परंतु प्रत्यक्ष सीमारेषांवर भारतीय चौक्यांचे रक्षण करताना शत्रुराष्ट्राच्या सैनिकांना त्यांच्या चौक्या सोडून पळायला भाग पाडल्याचे दृश्य 'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने जगाला दिसले. महिलांना संरक्षण दलात सहभागी करून घेण्याचा निर्णय किती सार्थ होता, हे 'ऑपरेशन सिंदूर'ने दाखवून दिले आहे.

नोंद

प्रा. मुक्ता पुरंदरे

# शौर्याला सलाम!



भारतात पूर्वी लष्करात महिलांचा समावेश नव्हता; परंतु शरद पवार यांनी संरक्षण दलाची दारे महिलांसाठी खुली केली. त्यावेळी अनेकांनी नाके मुरडली. लष्कर म्हणजे भाकऱ्या भाजण्याचे काम नव्हे, अशी टीकाही झाली; परंतु पवार आपल्या निर्णयावर ठाम राहिले आणि महिलांनी आपण किती उच्च कोटीची कामगिरी करू शकतो, हे 'ऑपरेशन सिंदूर'मधून दाखवून दिले. १९९२ मध्ये महिलांच्या पहिल्या तुकडीची शॉर्ट सर्व्हिस कमिशनसाठी पाच वर्षांसाठी भरती करण्यात आली. त्यानंतर या सेवेचा कालावधी १० वर्षांपर्यंत वाढविण्यात आला. २००६ मध्ये शॉर्ट सर्व्हिस कमिशन १४ वर्षे करण्यात आले. भारतीय सैन्य आता महिलांना सशस्त्र दलात नियुक्तीसाठी निश्चित केलेल्या धोरणांची अंमलबजावणी करून प्रोत्साहन देते. यासाठी आर्मी मेडिकल कॉर्प्स, आर्मी डेंटल कॉर्प्स आणि मिलिटरी नर्सिंग सर्व्हिसेसमध्ये महिलांसाठी कायमस्वरूपी कमिशन मंजूर करण्यात आले आहे. आता महिला अधिकाऱ्यांना ११ शस्त्रास्त्रे आणि सेवांमध्ये कायमस्वरूपी कमिशन मिळते. कायमस्वरूपी कमिशननंतर महिला अधिकाऱ्यांना भारतीय सैन्याच्या सर्वात महत्त्वाच्या भागांपैकी एक असलेल्या तोफखान्याचा भाग बनण्यास सुरुवात झाली आहे.

सध्या भारतीय सशस्त्र दलांमध्ये नियुक्त्यांमध्ये लिंगाच्या आधारावर कोणताही भेदभाव नाही. शस्त्रे आणि सेवांसाठी पुरुष आणि महिला सैनिकांच्या तैनातीत कोणताही फरक नाही. सर्वांना सैन्याच्या गरजेनुसार तैनात केले जाते. या कणखर निर्णयाची परिणती आता देशाला, जगाला बघायला मिळत आहे. भारतीय सैन्यात महिला अधिकाऱ्यांना कायमस्वरूपी कमिशन देण्यासाठी २३ नोव्हेंबर २०२१ रोजी लिंग तटस्थ करीअर प्रगती धोरण सुरू करण्यात आले. याद्वारे महिलांना शस्त्रास्त्रे आणि इतर सेवांमध्ये समान संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अर्थात हे सहजासहजी घडलेले नाही. महिलांना संधी दिल्याचे श्रेय घेत असलेल्या नेत्यांच्या सरकारच्या काळातच महिलांना कायमस्वरूपी कमिशनसाठी सर्वोच्च न्यायालयात लढा द्यावा लागला. 'एनडीए'मधील महिला अधिकाऱ्यांची एक तुकडी दोनच दिवसांपूर्वी बाहेर पडली. 'एनडीए' प्रवेशासाठीही महिलांना सर्वोच्च न्यायालयात दाद मागावी लागली होती. 'ऑपरेशन सिंदूर'च्या काळात दररोज पत्रकार परिषदेत माहिती देणाऱ्या दोन महिला अधिकाऱ्यांचे चेहरे दिसत होते; परंतु त्याच वेळी सीमेचे प्रत्यक्ष रक्षण करणाऱ्यांमध्येही सीमा सुरक्षा दलाच्या रणरागिणी बंदुकीसह अन्य शस्त्रास्त्रे घेऊन सज्ज होत्या, हे कुणालाच माहीत नव्हते. पाकिस्तानचा हल्ला परतवून लावूनच केवळ त्या थांबल्या नाहीत, तर त्यांनी पाकिस्तानी सैनिकांना पळता भुई थोडी केली. आता 'ऑपरेशन सिंदूर'शी संबंधित अनेक कथा समोर येत आहेत. पाकिस्तानने ८, ९ आणि १० मे रोजी भारतीय चौक्या आणि नागरी क्षेत्रांवर जोरदार गोळीबार केला. या दरम्यान भारतीय सीमा सुरक्षा दलाच्या सात महिला सैनिकांनी काश्मीरमधील अखनूर सेक्टरमध्ये त्यांच्या पदांचा कार्यभार स्वीकारला. असिस्टंट कमांडंट नेहा भंडारी यांच्या नेतृत्वाखाली सहा शूर सैनिकांनी तीन दिवस आणि तीन रात्री दोन महत्त्वाच्या सीमा चौक्यांचे रक्षण केले. पाकिस्तानकडून झालेल्या प्रचंड गोळीबार आणि तोफगोळ्यांना न जुमानता या महिला केवळ धैर्याने लढल्या नाहीत, तर शत्रूला माघार घेण्यास भाग पाडले. 'बीएसएफ'च्या या शूर मुलींनी पुरुष सैनिकांसोबत खांद्याला खांदा लावून शत्रूचा सामना केला. भंडारी यांनी त्यांच्या कंपनीची कमान स्वीकारली आणि घुसखोरी रोखलीच नाही, तर पाकिस्तानी चौक्यांवर हल्लाही केला. नेहा म्हणाली, 'आम्हाला पुरुषांसारखेच कठीण प्रशिक्षण देण्यात आले आहे. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये आम्ही एक इंचही मागे न हटण्याचा निर्णय घेतला.' तिच्या धाडसाचे 'बीएसएफ'चे उपमहानिरीक्षक एस. एस. मंद यांनी कौतुक केले. सक्रिय युद्ध परिस्थितीत महिला सैनिकांनी इतकी मोठी भूमिका बजावण्याची ही पहिलीच वेळ होती. त्यातून पुरुष सैनिकांच्या बरोबरीची त्यांची क्षमता सिद्ध झाली.

'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान अखनूर सेक्टरमध्ये आंतरराष्ट्रीय सीमेवर तैनात असलेल्या या महिला सैनिकांनी सिद्ध केले की, त्या कोणापेक्षाही कमी नाहीत. फक्त तीन वर्षांपूर्वी 'बीएसएफ'मध्ये सामील झालेल्या नेहा भंडारी यांनी या संधीला 'आयुष्यात एकदाच मिळणारी संधी' मानले. तिच्या नेतृत्वाखाली मनजित कौर, मलकीत कौर (पंजाब), स्वप्ना रथ, शंपा बसक (पश्चिम बंगाल), सुमी जेस (झारखंड) आणि ज्योती बानियान (ओडिशा) या सहा महिला सैनिकांनी मिळून अखनूरच्या दोन चौक्या वाचवल्या. यापैकी चार महिला २०२३ मध्ये भरती झाल्या होत्या, तर मनजित आणि मलकीत यांना १७ वर्षांचा अनुभव होता. सियालकोट सेक्टरमध्ये पाकिस्तानकडून जोरदार गोळीबार होऊनही या शूर सैनिकांनी हार मानली नाही. त्यांनी सपाट मार्ग आणि प्रादेशिक शस्त्रांचा वापर करून पाकिस्तानी चौक्यांचे मोठे नुकसान केले. त्यानंतर शत्रूला त्यांच्या पुढच्या चौक्या सोडून पळून जावे लागले.

'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान पुरुष अधिकाऱ्यांनी या महिलांना युद्धातून माघार घेण्याचा पर्याय दिला; परंतु नेहा आणि तिच्या टीमने नकार दिला. नेहाचे पालक 'सीआरपीएफ'मध्ये सेवा बजावत आहेत. तिचे आजोबाही लष्करात होते. ती म्हणाली की, आम्ही आमच्या वरिष्ठांसमोर आग्रह धरला की, आम्ही मागे हटणार नाही. त्यांनी आम्हाला आमची सर्वोत्तम सेवा देण्यास प्रोत्साहित केले. 'बीएसएफ'चे डीआयजी वरिंदर दत्ता म्हणाले, की, नेहाने केवळ बीएसएफ जवानांचेच नव्हे, तर सैन्याच्या अतिरिक्त तुकड्यांचेही नेतृत्व केले. तिने शस्त्रे आणि तोफांचा वापर करण्याचे निर्णय स्वतंत्रपणे घेतले. एका महिला अधिकाऱ्याने सक्रिय युद्धात पहिल्यांदाच अशी काम गिरी केली. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये ७० हून अधिक पाकिस्तानी चौक्या उद्ध्वस्त करण्यात आल्या. 'बीएसएफ'ने सांबा, कथुआ आणि जम्मू सेक्टरमध्ये ७० हून अधिक पाकिस्तानी चौक्या आणि तीन दहशतवादी लाँचपॅड उद्ध्वस्त केले. या यशाचे स्मरण करण्यासाठी 'बीएसएफ'ने सांबा सेक्टरमधील एका चौकीला 'सिंदूर' असे नाव देण्याचा प्रस्ताव मांडला आहे. या ऑपरेशनमध्ये हुतात्मा झालेल्या सैनिकांची नावे आणखी दोन चौक्यांना नावे दिली जातील. 'ऑपरेशन सिंदूर' ही महिला देशाच्या सुरक्षेत समान भूमिका बजावू शकतात, हे दाखवण्याची संधी होती. नेहा भंडारी आणि त्यांच्या टीमने हे सिद्ध केले की, महिलादेखील सक्रिय युद्धभूमीवर पुरुषांसारख्याच धैर्याने आणि दृढ निश्चयाने लढू शकतात. ही कारवाई लष्करी सेवेतील महिलांसाठी एक नवी प्रेरणा बनली आहे. त्यांच्या शौर्यामुळे सीमेवरील सुरक्षा आणखी मजबूत झाली आणि हा देशासाठी अभिमानाचा क्षण बनला. 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान सीमा सुरक्षा दलाच्या महिला जवानांनी असाधारण धैर्य आणि शौर्य दाखवले. तसेच, पाकिस्तानी हल्ल्यांना योग्य उत्तर दिले. महिला जवानांना पुरुष कर्मचाऱ्यांइतकेच खडतर प्रशिक्षण घ्यावे लागले. 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान त्यांनी त्याच भावनेने सीमांचे रक्षण केले. त्यांनी पाकिस्तानी चौक्यांना लक्ष्य केले आणि आपल्या स्थानापासून एक इंचही मागे हटल्या नाहीत.

सीमेवर असलेल्या चौक्यांवर ठाण मांडून पाकिस्तानी सैन्याचा आणि दहशतवाद्यांचा हल्ला परतवून लावला. सीमा सुरक्षा दलाच्या महिला जवानांनी केवळ शत्रूचाच धाडसाने सामना केला नाही, तर देशाप्रती असलेल्या जबाबदाऱ्यांची पूर्ण जाणीव असल्याने दाखवून देत देशालाही आश्वस्त केले. कथुआ, सांबा आणि जम्मू सेक्टरमधील सीमा चौक्यांवर शत्रूंचा सामना करणाऱ्या भारतीय सीमा सुरक्षा दलाच्या या तरुणी केवळ देशाच्या सीमांचे रक्षण करत नाहीत, तर धैर्य आणि दृढनिश्चयाचे जिवंत उदाहरण ठरतात. ही कारवाई संरक्षणात महिलांच्या वाढत्या भूमिकेतील एक मैलाचा दगड मानली जात आहे.

उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे

भ्र. ९४०३७४९९३२

रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य (भाग ५१)

# दिव्यत्वाची जेथ प्रचिती...

अंथरुणावर पडल्या- पडल्या माझ्या डोळ्यांसमोर साकार झाले ते पश्चिम बंगालचे विशाल आकाश आणि त्या आकाशाच्या विस्तीर्ण पटावर चमकू लागले अनंत तारे. कोणी घोष, कोणी मुखर्जी, कोणी चटर्जी, कोणी बॅनर्जी, कोणी उपाध्याय, कोणी बंदोपाध्याय, कोणी दत्त, कोणी चक्रवर्ती, कोणी रॉय... प्रत्येकाचे तेज वेगळे होते पण त्या सगळ्या तार्यांमध्ये उठून दिसणारा तारा होता रवींद्रनाथ टागोर या नावाचा आणि त्या तार्याने पश्चिम बंगालचे आकाश उजळून निघाले होते. त्याच्या उगवतीच्या रंगात पूर्व दिशा न्हाऊन निघाली होती. सुरुवातीला छोटा असणारा हा बालरवी पाहता पाहता विशाल झाला आणि अवघे गगन त्याने व्यापले.

जे न देखे रवी ते देखे कवी असे म्हटले जात असताना हा रवी त्याला जणू अपवाद ठरला आणि त्याची सर्वस्पर्शी प्रतिभा जीवनातील सर्व क्षेत्रांना स्पर्श करती झाली. या रवी किरणांचा स्पर्श झाल्यानंतर बागेतील कळ्या उमलू लागल्या. या कळ्या होत्या कवितेच्या, नाटकाच्या, कथांच्या, कादंबरीच्या, शिक्षणाच्या, चित्रकलेच्या, नृत्यकलेच्या, गानकलेच्या, संगीतकलेच्या, अध्ययनाच्या अध्यापनाच्या... अशा सगळ्या कळ्या विकसित होऊ लागल्या आणि त्यांचे सुरेख कमलपुष्पात रूपांतर झाले अशी जादू होती तुमच्या प्रतिभेच्या स्पर्शात! तुम्ही झालात प्रकाश आणि शिकवले आम्हाला प्रकाशाकडे पाहणे. रोपटे प्रकाशाकडे पाहते आणि त्याचा वृक्ष होतो. त्याला कळी येते ती प्रकाशाकडे पाहते आणि कळीचे फुल होते. फुल प्रकाशाकडे पाहते आणि त्याचे फळ होते. अशाच कुतूहलाने तुम्ही जीवनातील सर्व गोष्टींकडे पाहिले. अगदी आयुष्याच्या अखेरपर्यंत जीवनाकडे कुतूहलाने पाहणारे तुमच्यातील बालक जिवंत होते.

असे म्हणतात की तुम्हाला केवळ चार ते पाच तासांची निद्रा पुरेशी होत असे. रात्री झोपताना आकाशातील तारकांचे निरीक्षण आणि सकाळी उठल्यानंतर उगवतीचा सूर्य, उमरलेली फुलं, पक्ष्यांचे थवे पहायला तेवढ्याच उत्साहाने आपला चेहरा देखील फुलासारखा उमललेला असायचा. हेच बघायला आपणआपण मुलांना शिकवलं...

तुमच्या शिक्षणात हे चैतन्य, हा आनंद भरून राहिला होता. मन, बुद्धी आणि मेंदू यांची शिकताना एकरूपता होती... व्यवहाराबरोबरच सौंदर्याची जाणीव होती. विश्व भवत्येकनिडम म्हणजे एक घरटे व्हावे, सर्व धर्म, भाषा, प्रांत एकत्र नांदावे अशी आपली भावना होती... त्यातूनच उमलली शांतीनिकेतन, श्रीनिकेतन आणि विश्वभारतीची कमलपुष्पे. या कमलपुष्पातील मकरंद सेवन करण्यासाठी देशोदेशीचे भ्रमर येऊ लागले शांतिनिकेतनात, श्रीनिकेतनात आणि विश्वभारतीत. तुम्ही लिहिलीत गीते आणि ती गीते झालीत अजरामर गीतांजली! तुमच्या कथा आणि कादंबऱ्यांचे चित्रपट झाले. कसं शिकावं आणि कसं शिकवावं याचा आदर्श तुम्ही घालून दिला आणि झालात गुरुपासून गुरुदेव. बंगालमध्ये बंगाली बोलली जात होती ती एक भाषा म्हणून... पण त्या भाषेला तुम्ही दिले रंग रूप गीत... तुम्ही दिले सौंदर्य, तुम्ही दिला आकार, तुमच्याच लेखणीतून बंगालीचे सौंदर्य झाले साकार... तुमच्याच लेखणीतून जन्मले साहित्याचे नानाविध प्रकार...! तुम्ही फिरलात विविध प्रांत आणि विविध देश केला परिधान भारतीय संस्कृतीचा वेश झालात तुम्ही भारतीय संस्कृतीचा दूत. आणि पोचवली भारतीय संस्कृती सातासमुद्रापार...

तुम्ही केला एक आगळा वेगळा व्यापार ! इथे जे जे चांगले होते ते ते तुम्ही मुक्तहस्ते परदेशी इतरांना वाटले...आणि तुम्हाला तिथे जे जे चांगले दिसले ते ते घेऊन आला इथे आमच्यासाठी... खरंतर घेण्यासाठी आमचीच ओंजळ अपुरी पडली... तुमच्या काळात सर्वत्र राज्य होते इंग्रजांचे, प्राबल्य होते इंग्रजीचे इंग्रजी शिष्टाचारांचे. पण तुम्ही नाकारले इंग्रजाळलेले जिणे आणि दाखवला प्रकाश विश्वाला भारतीय संस्कृतीचा!

पदवीदान समारंभ असो की, अन्य कोणताही समारंभ, व्यासपीठावरून तुम्ही बोलला फक्त बंगालीत आणि केले अधोरेखित मायबोलीचे महत्त्व...! बंगालची भाषा आणि बंगाली माती धन्य झाली तुमच्यामुळेच! महिला दिन साजरा करतो आज आम्ही पण शंभर वर्षांपूर्वी तुम्ही तुमच्या कथा-कवितांतून केली प्रतिमा उजळ महिलांची. दाखवला त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा प्रकाश जगाला...दाखवली त्यांची विविध रूपे. समाजाचा विरोध असतानाही खुले केले महिलांनाही व्यासपीठ, रंगमंच...



जन -गण - मन लिहिताना ही भारतमाताच फक्त होती तुमच्या डोळ्यासमोर...नाकारले तुम्ही विदेशी राजपुत्रांचे गुणगान करणे... तुम्ही होता निर्भय आणि जगला ताठ मानेने. जपानने जेव्हा केले होते चीनवर आक्रमण तेव्हा जपानमध्येच होता तुम्ही त्यांचा हा साम्राज्यवाद नाही आवडत तुम्हाला आणि उघड बोललात तुम्ही जपान मध्येच आणि जपान्यांवर.. पण तुमचे निर्भय जगणे आम्हाला कधी कळलेच नाही. तुमचे जगणे होते सत्य शिव आणि सुंदराची आराधना. तुमच्या जगण्यामध्ये होती निर्भयाची उपासना...!

मोक्ष - स्वर्ग कदाचित परलोकात असेलही... कुणास ठाऊक...पण तुम्हाला या धरेवरच फुलवायचा होता स्वातंत्र्याचा स्वर्ग आणि त्यासाठीच अर्पण केलेस तुम्ही अवघे आयुष्य. राहिलात तुम्ही अखेरच्या श्वासापर्यंत कार्यरत आणि मावळतीलाही फिके झाले नाहीत तुमचे रंग... तुम्ही होता इहलोकीच्या सौंदर्याचे पुजारी आणि मानवतेची सेवा करणारे परमेश्वराचे दूत. उमटली आहेत काळाच्या मार्गावर तुमची दिव्य पदचिन्हे आणि पडला आहे तुमच्या कार्याचा दिव्य प्रकाश...

प्रश्न फक्त एवढाच आहे की तुमच्या या सत्कर्मांच्या खुणा आज पुसट होत चालल्या आहेत का? हे तेजोनिधी तुझ्या तेजाचा थोडासा का होईना पण दे अंश आम्हाला आणि दे शक्ती तू दाखवलेल्या मार्गावरून चालण्याची!

# ग्रहसंकेत

(रविवार, १५ जून ते शनिवार, २१ जून २०२५)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, १५ जून-** रवि मिथुन (०६ः ४४ मि.) पुण्यकाल सकाळी ६.४४ ते दुपारी १३ः ८ पर्यंत, फादर्स डे, मल्लखांब दिन ✻ **सोमवार, १६ जून-** भवानगिरी महाराज संजीवन समाधी शिरभावी (ता. सांगोला), पंचक दुपारी १.०९ नंतर, श्री तुळजाभवानी- भवानी शंकर मंदिर वर्धापन दिन कळस (इंदापूर) ✻ **मंगळवार, १७ जून-** राजमाता जिजाऊ स्मृतिदिन, गोपाळ गणेश आगरकर पुण्यतिथी, रामदासबाबा भालेराव महाराज पुण्यतिथी पेठ (आंबेगाव) ✻ **बुधवार, १८ जून-** कालाष्टमी, संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान देहू (जि.पुणे), राणी लक्ष्मीबाई पुण्यदिन, सरसेनापती संताजी घोरपडे पुण्यदिन ✻ **गुरुवार, १९ जून-** संत ज्ञानेश्वर माऊली पालखी प्रस्थान आळंदी ✻ **शुक्रवार, २० जून-** श्री दाविद महाराज पुण्यतिथी माधवनगर (सांगली), अमृत रात्री ९.४४ पर्यंत पंचक ✻ **शनिवार, २१ जून-** योग दिन, दक्षिणायनारंभ, योगिनी स्मार्त एकादशी, संत निवृत्तीनाथ यात्रा त्र्यंबकेश्वर, जागतिक संगीत दिन, सौर वर्षा ऋतू प्रारंभ, संजिवा स्वामी पुण्यतिथी नाझरे (सांगोला)

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** १५ (१२ पर्यंत) जून, १६ (११ नंतर), १९, २० जून ✻ **डोहाळ जेवण-** १५ जून ( दुपारी १२ पर्यंत) ✻ **बारसे-** १६ जून (११ नंतर), २० जून (१० नंतर) ✻ जावळ- १५ जून (१२ पर्यंत), २० जून ✻ **गृहप्रवेश-** १९ (१२ पर्यंत), २० जून (१० नंतर)

### मेष :- संघर्षातून प्रगती

राशी स्वामी मंगळाचा गुरूवारी व्ययातील शनिशी षडष्टक योग होत आहे. विद्या, संततीसाठी अधिक खर्च करावा लागेल. कोर्ट प्रकरणे टाळावीत. संघर्षातून प्रगती होईल. रशीतील शुक्रामुळे काही प्रमाणात सौख्य लाभेल. शिक्षणातून नव्या स्पर्धा लाभतील. लाभ घ्यावा. नव्या विचारांना विचाराने चालना मिळेल. मोठी गुंतवणूक सध्या नको. शुभ ता. १५, १८, २०

### वृषभ:- स्वमताग्रह टाळावा

सुखस्थ मंगळाचा लाभातील शनिशी होणारा षडष्टक योग प्रतिकुल आहे. विनाकारण धावपळ करावी लागेल. आर्थिक येणे वसूलीसाठी अधिक प्रयत्न करावे लागतील. रवि धनात येत असल्याने समस्यातून मार्ग निघेल. नव्या कामांना गती देता येईल. अडचणीतून मार्ग निघेल. अपेक्षीत संधी लाभतील. स्वमताग्रह टाळावा. शुभ ता. १९, २०

### मिथुन:- अडचणीतून मार्ग निघेल

तृत्तीयेश रवि राशीत गुरूच्या जोडीला येत आहे. फार चिंता करू नका. कार्यक्षेत्रात स्वतः अधिक लक्ष घालावे. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी. कमिशनवर चालणाऱ्या व्यवसायात मनासारखी प्रगती होईल. उपजत कला- गुणांचा विकास होत जाईल. सुख स्वास्थ लाभेल. संतती संबंधात शुभ घटना घडतील. मार्ग निघत जाईल. शुभ ता. १६, २०

### कर्क:- अपेक्षित संधी लाभतील

गुरूवारी धनस्थ मंगळाचा भाग्यस्थ शनिशी षडष्टक योग होत आहे. आर्थिकबाबतीत जपून असावे. अनावश्यक खर्च टाळावा. कला क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. नव्या कामांना गती मिळेल. सरकारी कामासाठी अधिक पाठपुरावा करावा लागेल. अपेक्षित संधी लाभतील. मोजकेच व विचाराने बोलावे. पुढे समस्या येणार नाहीत. अंगच्या हुशारीचा लाभ होईल. शुभ ता. १८

### सिंह:-सामंजस्याने रहावे

राशीतील मंगळाचा अष्टमातील शनिशी होणारा षडष्टक योग प्रकृतीबाबत त्रासदायक राहिल. राशीस्वामी रवि लाभात गुरूच्या जोडीला येत आहे. आर्थिक बाबतीत समाधानकारक घटना घडतील. अपेक्षित संधी लाभतील. कलेत प्रगती होत जाईल. उष्णतेपासून त्रास संभवतो. वादाचे प्रसंग टाळावेत. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. प्रगतीच्या संधी लाभतील. शुभ ता. १५, २०

### कन्या:- घाईने निर्णय नकोत

सप्तमातील शनि व्ययातील मंगळाशी षडष्टक योग करीत आहे. त्यामुळे कौटुंबिक जीवनात आर्थिक कारणांवरून अस्वास्था राहिल. नोकरी, व्यवसायात विचाराने रहावे. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. नवीन गुंतवणूक विचाराने करावी. अपेक्षित संधीसाठी प्रतिक्षा करावी लागेल. विचाराने रहावे. विवाह विषयक कार्ये लांबणीवर पडतील. अनावश्यक खर्च टाळावा. शुभ ता.१६

### तुला:- हितशत्रूंशी संघर्ष

षष्ठातील शनिचा लाभातील मंगळाशी होणारा षडष्टक योग हितशत्रूंशी संघर्ष करावयास लावणार आहे. सप्ताहारंभी रवि भाग्यात येत आहे. त्यामुळे फार चिंता कशाची करू नका. समस्यांतून मार्ग निघत जाईल. जनसंपर्क वाढणार आहे. अपेक्षित संधी लाभतील. प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. संतती संबंधात विलंबाने शुभ घटना घडतील. शुभ ता. १६, १८

### वृश्चिक:- कामे विचाराने करावीत

कर्मस्थ मंगळाचा पंचमस्थ शनिशी होणारा षडष्टक योग कार्यक्षेत्रात समस्या वाढविणार आहे. अडचणीतून मार्ग काढावा लागेल. नोकरी, व्यवसायात विचाराने रहावे. कौटंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. वादाचे प्रसंग टाळावेत. महत्त्वाची कामे विचाराने करावीत. दैनंदिन कामात अधिक लक्ष घालावे. स्थावर प्रश्न लांबणीवर पडतील. दूरचे प्रवास वर्ज्य करावेत. शुभ ता. १५, १९

### धनु:- अस्वास्थ वाढेल

सुखस्थ शनिचा भाग्यस्थ मंगळाशी होणारा षडष्टक योग कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे अस्वास्थ वाढविणार आहे. स्पर्धांमध्ये यश मिळेल. स्थावर प्रश्न सामंजस्याने मिटवावेत. कला- गुणांचा विकास होत जाईल. अपेक्षित संधीसाठी प्रतिक्षा करावी लागेल. जुने येणे वसूल करण्याचा प्रयत्न करावा. नव्या योजना तुर्त लांबणीवर टाकाव्यात. विचाराने रहावे. शुभ ता. २०

### मकर:- चिकाटीने प्रगती

अष्टमातील मंगळाचा शनिशी गुरूवारी षडष्टक योग होत आहे. त्यामुळे शारीरिक तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. स्पर्धांमध्ये यश मिळेल. सुखस्थ शुक्रामुळे काहीप्रमाणात सौख्य लाभेल. नव्या संधीसाठी प्रतीक्षा करावी लागेल. नव्या कामांत अधिक लक्ष घालावे. आर्थिक प्रगती चिकाटीने होईल. अडचणीतून मार्ग काढावा लागेल. दगदग टाळावी. शुभ ता. १८, २०

### कुंभ:- कला गुणांचा विकास

धनस्थ शनिचा सप्तमातील मंगळाशी होणारा षडष्टक योग कौटुंबिक जीवनात अस्वास्थ वाढविणारा आहे. आर्थिक प्रगती विलंबाने होईल. उपजत कला-गुणांचा विकास होईल. प्रशासन, ज्ञानदान, बॅंक, विमा अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. भागीदारीच्या व्यवसायात सामंजस्याने रहावे. वाद टाळावेत. शुभ ता. १८, २०

### मीन:- दगदग टाळावी

राशीतील शनि गुरूवारी षष्ठातील मंगळाशी षडष्टक योग करणार आहे. त्यामुळे प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. महत्त्वाची कामे चिकाटीने होतील. उष्णतेपासून त्रास संभवतो. धनस्थ शुक्रामुळे खाद्य पदार्थ, कला, सौंद्य, अलंकार अशा व्यवसायात प्रगती घडेल. नव्या कामांत अधिक लक्ष घालावे. अडचणीतून मार्ग काढावा लागेल. दगदग टाळावी. शुभ ता. १६, २०

!! शुभ भवतु !!

दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

# रतनगड ते कळसुबाई

महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर कळसुबाई, रतनगड आणि हरिश्चंद्रगड सह्याद्रीतील एकाच डोंगररांगेत आहेत. रतनगडाची उंची ४२५० फूट असून भंडारदरा परिसरातील भंडारदरा धरण, रतनगड, आजोबाचा डोंगर ही गिर्यारोहकांची आवडती ठिकाणे आहेत. नाशिक आणि नगर जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या या डोंगररांगेतील अनेक अद्वितीय किल्ले, दुर्गप्रेमी लोकांना सतत साद घालतात. रतनगडावर जायचे असल्यास कसारा व इगतपुरी हे रेल्वे स्टेशन जवळचे आहे. रतनगड मुंबईवरून साधारण १५० कि.मी. तर पुण्याहून २२० कि.मी. अंतरावर आहे.

सह्याद्रीचे प्रत्येक ऋतूतील सौंदर्य वेगळे असल्यामुळे एक किल्ला एकदा पाहून कधीही समाधान होत नाही, पण प्रत्येक किल्ला एकदा तरी नक्की पाहावा, असा वैशिष्ट्यपूर्ण आहे. भंडारदरा धरणाशेजारी शेंडी गाव आहे. तेथून रतनवाडीला जाण्यास बोट मिळते. रतनवाडीत एकूण तीन वाड्या आहेत. त्यातील तीर्थाच्या वाडीत अमृतेश्वर महादेवाचे हेमाडपंथी रमणीय मंदिर आहे. मंदिराच्या परिसरात कोरीव शिल्पकलेचे काही अवशेष शिल्लक आहेत. खांबांवर व छतावर अतिशय सुंदर कोरीव काम आहे. छतावरील समुद्रमंथनाचे शिल्प लक्षवेधी आहे. पूर्वी मंदिरांच्या कोरीव कामात पुराणातील विशेष प्रसंगांची शिल्पे कोरण्याची पद्धत होती. हे मंदिर झांज राजाने १०व्या- ११व्या शतकात प्रवरेच्या उगमस्थळी बांधले आहे. मंदिराच्या गर्भगृहाला दोन्ही बाजूंनी दरवाजे आहेत. मंदिरापासून थोड्या अंतरावर एक पुष्करणी आहे. 'विष्णुतीर्थ' नावाने प्रसिद्ध असलेल्या या पुष्करणीत अनेक कोनाडे आहेत. कोनाड्यात गणपती, देवी व श्री विष्णूंच्या शस्त्रे धारण केलेल्या मूर्ती विराजमान आहेत. रतनवाडीतून शिडीच्या वाटेने रतनगड चढण्यास सुरुवात केली की काही अंतर झाडीतून चढत राहावे लागते. एका टप्प्यावर १५ मीटर उंचीचा एक सरळसोट कडा आहे. तो चढून जाण्यास लोखंडी शिडी लावली आहे. शिडी पार करून समोर चालत गेलात की गणपतीची कोरीव मूर्ती असलेला गणेश दरवाजा लागतो. गडावर तीन गुहा आहेत. त्यामुळे राहण्याची सोय होऊ शकते.



दरवाजातून उजवीकडे रत्नादेवीची गुहा आहे व डावीकडे गडाचा दुसरा हनुमान दरवाजा दिसतो. दुसऱ्या दरवाजावर हनुमान, सूर्य, मगर, वेताळ, गणपती, रिद्धी-सिद्धी, मत्स्यावतार यांच्या रेखीव मूर्ती व कोरीव काम दिसते. गुहेत गडाची देवता रत्नादेवी विराजमान आहे, कळसुबाई, रत्नाबाई व कात्राबाई या तीन बहिणी होत्या आणि यांचे वास्तव्य या तीन डोंगरांवर होते म्हणून हे डोंगर त्यांच्या नावाने प्रसिद्ध झाले, अशी लोकआख्यायिका आहे. प्रवरा नदीवर बांध घालून भंडारदरा जलाशय निर्माण झाला आहे. नदीचा अवखळपणा रंधा धबधब्याने मात्र जपून ठेवला आहे. गडाच्या कातळमाथ्यावर संपूर्ण प्रदक्षिणा घालता येते. गडाच्या माथ्यावर जाण्याआधी विस्तीर्ण गवताळ पठार आहे. गडाच्या पश्चिम दिशेला कात्राबाईच्या डोंगराचे रौद्र कातळकडे दिसतात. उजवीकडे आजोबाचा विशाल डोंगर लक्ष वेधून घेतो. येथून जवळच एक टेहळणी बुरूज आहे; तो 'राणीचा हुडा' या नावाने प्रसिद्ध आहे. जवळच एक पाण्याचे टाके आहे. इथे एक नंदी व शिवलिंगाचे दर्शन घडते. गडावर कातळकड्यात एक नेढं आहे. आरपार असलेले हे छिद्र नैसर्गिक आहे. गडावरून भंडारदरा जलाशय, अलंग-कुलंग-मदन, भीमाशंकर परिसर दृष्टीस पडतो. संपूर्ण गड फिरल्यावर गडाच्या कोकण दरवाजा व त्रिंबक दरवाज्याकडे जावे. सह्यकडे म्हणजे निसर्गाचे रौद्र, भीषण व दुर्गम रूप! जंगलातून सरळ चालणे व सह्याद्रीच्या उंचीवर वसलेले किल्ले चढणे यात बराच फरक आहे.

सह्याद्रीच्या उंचीवर गेल्यावर मजबुतीने पाय रोवून गडपायथा गाठणे, हेही एक दिव्यच आहे. हे दिव्य मी पावसाळ्यात रतनगड उतरताना पहिल्यांदा केलं. आम्ही रतनगड रतनवाडी गावातून चढलो व गडाच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या साम्रत गावात उतरायचे ठरले. रतनगडावरून साम्रत गावात उतरायला दगडात कोरलेल्या सरळसोट पायऱ्या आहेत. सरळसोट म्हणजे उतार नसलेल्या उभ्या खोदीव पायऱ्या. इतर ऋतूत कदाचित त्या पायऱ्या उतरून गडाखाली पोहोचणे सोपे वाटत असावे, पण पावसाळ्यात संपूर्ण पायऱ्या ओल्या व अखंडित पावसाचे पाणी वाहून शेवाळल्या होत्या.

एक एक पायरी डोळ्यात तेल घालून, थोडक्या सुरक्षित भागावर पाय ठेवत उतरत होतो. कड्याकडे तोंड करून, उलटे उतरणे सोपे असते त्यामुळे भीषण दरीशी नजरभेट होत नाही हे माहिती होते, त्यामुळे कड्याकडे बघत एक एक पाय खाली पडत होता. दगडावर चालणे व मातीवर चालणे यातला फरक प्रथमच रतनगड उतरताना लक्षात आला. वाटलं, म्हणूनच माणसाचा मातीशी इतका घट्ट ऋणानुबंध असावा. मातीच्या मायेचा ओलावा माणसाला आयुष्यरूपी कड्यावर यशस्वी चढाई करण्यास बळ देतो व आयुष्याच्या उतारामध्ये साथ देण्याचे आश्वासन हा मातीचा ओलावाच देतो. गड उतरून येईपर्यंत अंधार पडायला सुरुवात झाली, दूर गाव दिसत होते. पाऊस सुरूच होता व आम्ही संपूर्ण भिजलो होतो.

गावात गेल्यावर मात्र जो अनुभव आला तो जाणिवा समृद्ध करणारा ठरला. आमच्या वाटाड्याने हाक मारल्यावर गावातील काही लोकं बोलायला आली व आमची मदत करण्यास तयार झाली. गावातील एका घरात आमच्यासाठी पिठलं-भाकरी असा स्वयंपाक करण्यात आला. त्या रात्री गावातीलच एका घरात मुक्काम केला. आम्ही गावात पोहोचल्याबरोबर दारातून बाहेर डोकावणारे अनोळखी चेहरे, दुसऱ्या दिवशी निरोप घेताना मात्र जिव्हाळ्याचे वाटत होते. रतनगड शिवाजी महाराजांचा आवडता किल्ला होता. स्वराज्य स्थापनेच्या कार्यात या दुर्गम दुर्गांची महाराजांना भक्कम साथ होती.

१७६३ साली महादेव कोळी याने किल्ला ताब्यात घेतल्याची नोंद आहे. अलंग, मदन, कुलंग, राजूर व कोकणातील काही भाग रतनगडाच्या आधिपत्याखाली होता. इंग्रजांनी रतनगड १८२० मध्ये ताब्यात घेतला. पुढे इंग्रज अधिकाऱ्याचा गडावरील मुक्काम हलल्याबरोबर पूर्वीचे किल्लेदार गोविंदराव यांनी किल्ला पुन्हा आपल्या ताब्यात घेतला. पेशवेकालीन इतिहासात रतनवाडीतील अमृतेश्वर महादेव मंदिराचा एका पत्रात उल्लेख आढळतो. त्या पत्रात नानासाहेब पेशव्यांनी महादेवाच्या पूजेसाठी गुरवांना सनद पाठविली, असा उल्लेख आहे. या गडावरील लढाई, चकमक असा काही उल्लेख इतिहासात नाही किंवा इतर काही ऐतिहासिक नोंदीही नाहीत. असे वाटते की रतनगड, हरिश्चंद्रगड तसेच याच्या आसपासचा प्रदेश इतका दुर्गम आहे की, यावर नजर रोखणे शत्रूला जमलेच नसावे. सह्याद्रीच्या रांगड्या रूपाची प्रचीती देणाऱ्या भंडारदरा परिसरातील रौद्र भीषण सुळक्यावर स्थापित गडांना भेट देणे, ही सुवर्णसंधी गिर्यारोहक मात्र सोडत नाहीत. तुम्हीही अभेद्य रतनगडावर जाण्याची संधी मिळाल्यास नक्की जावे.

रतनगडाहून कळसुबाईकडे दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही साम्रत गावातून गाडीने बारी गावाकडे निघालो. बारी हे महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर कळसुबाईच्या पायथ्याशी असलेले गाव. साम्रत ते बारी हे सुमारे ३० ते ३२ कि.मी. अंतर आहे. तुम्हाला नुसते कळसुबाई शिखर करायचे असल्यास इगतपुरी रेल्वे स्टेशनवरून बारीला जाण्यासाठी एसटीची बससेवा आहे. कळसुबाईची उंची समुद्रसपाटीपासून ५४०० फूट आहे. बारी हे गाव कोळी महादेव या आदिवासी जमातीचे आहे. कळसुबाईला जाण्यासाठी बारी गावातून बाहेर पडल्यावर एक ओढा लागतो; तो ओलांडून डोंगर चढायला सुरुवात करायची. कळसुबाई चढण्यास अनेक वाटा आहेत, पण आम्ही मुख्य वाटेने चढण्यास सुरुवात केली. या वाटेवर अवघड कडे पार करण्यास लोखंडी शिड्या लावल्या आहेत.

आज पावसाने जरा विश्रांती घेतली होती त्यामुळे आजूबाजूचा परिसर व्यवस्थित पाहता येत होता. मुख्य वाटेवरून चढताना वाटेत एक मंदिर लागतं. मंदिराच्या पाठीमागून चढत जाताना आपल्याला तीन लोखंडी शिड्या पार कराव्या लागतात. बराच वेळ चढत गेल्यावर आपण एका विहिरीजवळ पोहोचतो. या विहिरीपासून समोर कळसुबाई शिखराचा शेवटचा टप्पा चढण्यास सुरुवात होते. येथे थोडी कठीण चढाई असल्यामुळे काळजीपूर्वक पाय टाकावे. येथे सुरक्षित चढाईसाठी साखळीदेखील लावली आहे. शेवटची लोखंडी शिडी चढून आपण कळसुबाईच्या माथ्यावर पोहोचतो. माथ्यावर कळसुबाईचे मंदिर आहे. या मंदिराबद्दल अशी आख्यायिका आहे की, कळसुबाई ही या गावातील सून होती व तिला औषधी वनस्पतींबद्दल बरीच माहिती होती. त्या काळात तिने आजारी लोकांची खूप सेवा केली. तिच्या मृत्यूनंतर तिची ओळख म्हणून लोकांनी या शिखराला 'कळसुबाई' असे नाव दिले. शिखरावरील कळसुबाई मंदिर म्हणजे लोकांनी कळसुबाईला वाहिलेली आदरांजली आहे, असेही म्हणता येईल.

मंदिरात दर्शन घेऊन महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखरावर असल्याचा आनंद लुटावा व सभोवतालचा परिसर डोळे भरून पाहून घ्यावा. कळसुबाई शिखरावरून अलंग, मदन, कुलंग, रतनगड, आजोबा हे सर्व किल्ले व आजूबाजूचा विस्तीर्ण परिसर पाहून मन आनंदित होते. कळसुबाई शिखर सर केल्याचा आनंद काही वेगळाच आहे. कारण आपल्या पिढीतील प्रत्येक व्यक्तीचा कळसुबाई शिखराशी शालेय जीवनात परिचय झाला आहे. रिकाम्या जागा व जोड्या लावा या आवडीच्या प्रश्नांमध्ये महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर कोणते? हा प्रश्न हमखास सर्वांनी अचूक सोडविला असणार. त्यामुळे प्रत्यक्ष कळसुबाई शिखर गाठणे हा आनंद अवर्णनीयच! काहीतरी विशेष साहस केल्याचे समाधान मनामध्ये आत्मविश्वास निर्माण करते. महाराष्ट्रातील हे मानाचे शिखर सर करण्याचा आनंद प्रत्येकाने नक्की घ्यावा.

पान २ वरून

## गुरवे नमः

उलट गुरू-शिष्याची एक प्रदीर्घ परंपराच इथे सुखेनैव नांदताना दिसते. त्या नात्याचे विविधांगी पैलू स्पष्ट करणारे गुरुगीतेसारखे ग्रंथ निर्माण झालेतच; शिवाय उपनिषद काळापासून या नात्याचं मर्म उलगडून दाखवणारं एक अतिशय महत्त्वाचं सूत्रदेखील सांगण्यात आलं आहे. आम्ही दोघांनी मिळवलेले ज्ञान तेजस्वी होवो. आम्हा दोघांत कोणत्याही प्रकारचा विद्वेष नसावा. भावनिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक अशा तीनही पातळ्यांवर आम्हा दोघांनाही शांती अनुभवता यावी. एकुणात त्रिविध शांतीच्या शोधात गुरूच्या मार्गदर्शनात शिष्याचा हा ज्ञानप्रवास सुरू राहतो. इतर कोणत्याही नात्यात नसते अशी एक अपेक्षा या नात्याकडून करण्यात आलेली आहे. सर्वत्र जय मिळावा अशी (सर्वसाधारण) इच्छा असली, तरी शिष्याकडून पराभवच व्हावा, अशी इच्छा गुरूच्या मनात असावी. म्हणजे गुरूनं शिष्याला असं काही ज्ञान द्यावं आणि पारंगत करावं की, ज्यामुळे त्याला साक्षात आपल्या गुरूचाच पराभव करता येईल. गुरूंच्या ठिकाणी ही मनीषा असणं हे त्या शिष्याविषयी वाटणाऱ्या आपुलकीची परमावधी आहे. गुरूंच्या मनातल्या या भावनेची जाणीव शिष्याला असणं आणि गुरूंची ती इच्छा पूर्ण करण्यासाठी शिष्यानं आपलं सर्वस्व पणाला लावण्याइतकं उत्तम शिष्याच्या उन्नतीकरिता अन्य काही नाही. यात स्पर्धा, अहमहमिका, चढाओढ किंवा स्वतःला वरचढ सिद्ध करण्याचा किंचितही प्रयत्न नसून शिष्याकडून झालेल्या पराभवातच गुरूंचं श्रेष्ठत्व प्रकाशित होत असतं. आपल्यापेक्षा आपला शिष्य सरस व्हावा हा गुरूंचा उद्देशच भारतीय संस्कृती निरंतर प्रज्वलित ठेवण्यास कारणीभूत ठरला आहे. म्हणूनच अगदी बालपणापासून आपल्यावर 'गुरवे नमः' हा संस्कार केला जातो. या आपल्या भारतीय संस्काराचं कसोशीनं पालन करणं, हे आपलं नैतिक कर्तव्य आहे.

पान ४ वरून

## वडाच्या घनगर्द सावलीचा पदर ...

गावागावातून पंढरीच्या विठुरायाला भेटायला निघालेल्या दिंडी वारीची सुरुवात याच काळात सुरू झालेली असते. पाऊस पडावा म्हणून अभावाने का होईना पण एखाद्या खेड्यात धोंडी धोंडी पाणी दे असे गाणे गात बेडकाची पालखी अंगणात उभी राहाते, लहानपणापासून ह्या धोंडीची साद कोणता ढग ऐकायचा ते माहीत नाही पण कोणत्यातरी ढगांना ते मेलेलं आणि उलट टांगलेल बेडूक पाहून गहिवरून येत असावं आणि उन्हामुळे तडकून गेलेल्या जमिनीची तहान भागविण्यासाठी तो अनेक ढगांना सोबत घेऊन ते सर्व आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून देत असावेत. त्यांच्या अश्रूंच्या थेंबाने बघता बघता जमिनीच्या भेगा भरून येतात, गवताचे हिरवे कोंब नवलाईने त्या ढगांना न्याहाळण्यासाठी जमिनीच्या बाहेर येतात, सृष्टी हिरवीगार होते वारा प्रसन्नतेने वाहू लागतो... ढग मात्र वाट पाहत असतात एखाद्या तळ्यातून डराव डराव ह्या आवाजातून आम्ही सुखरूप आहोत असं सांगणाऱ्या बेडकाच्या आवाजाची...जो त्यांना आषाढ-श्रावणात ऐकायला मिळतो.

पान ४ वरून

## निर्भया...

गावोगावचे प्रतिनिधी गोळा करून प्रत्येक गावात सदाचार शिक्षणाची शाखा उघडायची. इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना प्रश्नोत्तरांमार्फत सज्ज करायचे. या विषयावर मी पुस्तक लिहून त्याचा प्रसार आणि प्रचार करणार! या पुस्तकात योग्य वयात मुलामुलींचे विवाह कसे होतील, याकडे पालकांनी लक्ष पुरवण्यावर भर देण्यात येणार आहे. आपण सारे एकदिलाने सहकार्य करा. हा एक ज्वलंत सामाजिक प्रश्न आहे. यापुढे निर्भयाची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी प्रयत्न करणारी हे एक सामाजिक संघटन असेल.शासनाने असे करायला हवे, तसे करायला हवे, असा दुरून सल्ला देणे फार फार सोप्पय! पण याची सुरुवात माझ्यापासून का होऊ नये? असा कृतिशील विचार फार कमी लोक करतात आणि आज त्याचीच तर गरज आहे. काम सोपे नाही, पण अशक्यसुद्धा नाही.'' बंडूभाऊ उत्साहाने म्हणाले, ''माधवराव, गुड आयडिया. तुम्हाला लिखाणाचे अंग आहेच. तुम्ही सदाचार शिक्षणावर पुस्तक लिहायला सुरुवात करा. आम्ही इतर कामे योजनाबद्धरीतीने वाटून घेऊ. संस्काराचा अंकुश असलेला तरुण असले घृणीत कृत्य करायला कदापि धजणार' नाही. तुम आगे बढो.. हम तुम्हारे साथ है!'' माधवराव घरी आले. त्यांनी लगेच हा विचार सुलभाताईंना ऐकवला. त्यांनी अनुमोदन दिलं... ''होय. मी पण महिला मंडळात एक फळी तयार करते. गावोगावच्या समविचारी मंडळीत वीण विनू या. आम्ही साप्ताहिक बैठक घेऊन प्रगतीचा आढावा घेत जाऊ.'' आतून प्राची बाहेर येत म्हणाली, ''आई-बाबा, तुमचा विचार सद्यस्थितीत योग्यच आहे. मी पण माझ्या मैत्रिणींमध्ये एक विचार प्रवर्तक टीम तयार करते. ही काळाची गरज आहे.'' प्राचीचे हे विचार ऐकून आई-बाबा दोघांनाही समाधान वाटले. एका जिव्हाळ्याच्या सामाजिक बांधिलकीशी कटिबद्ध झाल्याच्या निर्णयाने आणि सारे योग्य दिशेने नियोजन झाल्याचे एक आगळेच समाधान सगळ्यांच्या चेहऱ्यावर होते.

पान ५ वरून

## मोठ्यांच्या सिद्धांतांचा घेतला पुरा पडताळा

पूर्वसुरींच्या ग्रंथांचा आणि विचारांचा त्यांनी धांडोळा घेतला होता. ऐन युद्धापूर्वी कुरुक्षेत्रावर भगवंताने अर्जुनाला १८ अध्यायांची गीता सांगितली, कशाला? त्यामागे बीज विचार काय होता, हे समजायला अर्जुनाच्या तोंडी असलेला १८व्या अध्यायातील एक श्लोक पुरेसा आहे. तो असा... 'नष्टो मोहः स्मृतीर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत । स्थितोस्मि गतसन्देहः करिष्ये वचनं तव ।।' माझा मोह नष्ट झाला आणि माझे खरे स्वरूप मला कळले आणि मी संशयरहित झालो, या अर्जुनाच्या उद्गारांनी आकलन होते की, कशासाठी गीता सांगितली. आपल्यालाही सर्वप्रसंगी हेच आचरावे लागते. कारण प्रपंचात अनेकदा आपला अर्जुन होतो. अर्जुनाने गीता नुसती ऐकली नाही, ती श्रवण केली होती. अर्जुन हा श्रेष्ठ श्रोता होता. म्हणूनच, जे अर्जुनाच्या पंक्तीला बसायला योग्य आहेत, अशांनी अवधान द्यावे, असे माउली म्हणते. श्रोत्यांनी सतत सावधचित्त असावे यासाठी योगिराज ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत अनेकदा श्रोत्यांची, अत्यंत हळुवार शब्दात विनवणी केलेली आहे. आपण कोण आहोत, आपले कर्तव्य काय याची जाणीव करून दिली; आणि म्हणूनच ज्ञानदेव म्हणतात 'कुळजातीवर्ण हे अवघेचि अकारण' ज्ञानेश्वरी म्हणजे परमार्थाची आणि आत्मोन्नतीची दिशा सर्वसामान्य समाजाला दाखविणारा दीपस्तंभ आहे. भागवत संप्रदायाची सर्वसमावेशक वृत्ती आणि निस्सीम भक्ती या जीवननिष्ठा या ग्रंथात जागोजागी दिसतात. ज्ञानदेवांनी भक्ती मार्गाचा पुरस्कार केला, सामान्य जनतेची मने तयार केली. त्यांच्या मनातील अध्यात्म विचारांना एक नवी दिशा दिली. समतेचा विचार प्रथम जर कुणी मांडला असेल, तर तो ज्ञानदेवांनीच. त्या काळची गरज ओळखून अन्य संतांनी आणि सत्पुरुषांची तो पुढे नेला. सामाजिक परिवर्तनासाठी, नवसमाजाच्या निर्मितीसाठी या संतांनी आपली लेखणी, वाणी आणि करणी झिजविली. या सर्वात पायाभूत आणि महत्त्वाचे कार्य कुणाचे असेल, तर ते निःसंशयपणे ज्ञानदेवांचे आहे.

# मेरे दिलमे आज क्या हैं ?

## सकारात्मकतेचे तत्वज्ञान २७१

सकारात्मकतेचे तत्त्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

मान सांगे जनात (चारचौघात), अपमान सांगे मनात अशा शिकवणीत रचली गेलेली जुन्या पिढी. खुलेपणा दुर्मिळ का असतो? जगाला सवय आहे मिटलेल्या ओठांचे कौतुक करण्याची त्याच्या/तिच्या सारखं तोच/तीच सहन करू जाणे! अगदी अश्रूही डोळ्यातल्या डोळ्यात विरवायची संस्कारी पिढी. आपली मोडतोड/जखमा खुल्या केल्या तर बभ्रा होण्याची भीती, कारण इतरेजनांचा अदृश्य दंडुका कायम उगारलेला. मग सगळं आत गिळायचं. काय काय आणि किती साठवून ठेवलं असतं एखाद्याने यावर विश्वास बसत नाही मग. अमुचा प्याला दुःखाचावाले केशवसुत आमचे आदर्श.


वेदना दडविण्यात माणसे तज्ञ होत जातात. कधी त्या हास्याआड लपतात, कधी अनुकंपेच्या मुखवट्याच्या मागे असतात. हे पांघरलेले हास्य एखाद्या चिलखतासारखे परिधान केलेले असते. मग इतरेजन काठावर थबकतात. खरंतर त्यांनी विचारपूस करावी, आतल्या वादळांना गोंजारावे असंही आतून वाटत असले तरीही हिंमत होत नाही.

सहजी नजरेस न पडणारे व्रण माणसे प्रत्ययी घेऊन हिंडत असतात. काही कातडीवर तर काही खोलवर लपलेले, दडवलेले. हे अंतर्गत व्रण फक्त शांत, निर्जन क्षणी जाणिवेत उतरतात. याच शांत क्षणी जगाची वाढ होत असते आणि आपलं सत्य आपल्या भेटीसाठी आलेलं असतं. या काळीजखुणा केवळ जखमांचे स्मरणरंजन नसते , ते प्रतीक असते आपल्या तग धरून राहण्याचे. भेटलेल्या प्रत्येक वादळाला त्या व्रणांनी साक्षीभावाने कुरवाळले असते.

काही कहाण्या, काही निशाण्या आतमध्ये सुरक्षित आणि व्यवस्थित रचून ठेवलेल्या असतात. त्यातील काही शब्द तर अजून उच्चारलेलेही नसतात. माणसे शिकत असतात आपल्या जगण्याला आवाज देण्याची प्रक्रिया. व्रण पडल्याने कोणी मोडत नाही. त्या वेदनांनी कोणी दुर्बळ होत नाही, उलट खरे ठरतो. स्वतःच्या तुकड्यांचा सन्मान करायचा असतो. भलेही ते सूर्यप्रकाशात झळाळते असोत वा अंधारात डगमगणारे असोत. फक्त एकच- आपल्या जखमा आपली परिभाषा ठरू शकत नाही. मग इतिहासाचे गाठोडे कितीही वजनदार असो.

निर्भय आहे, शूर आहे असं मिरविण्यासाठी स्वतःच्या कथा सांगायच्या नसतात. भीतीच्या पाठलागाचा कंटाळा आला म्हणून, तिच्या कचाट्यातून सुटावे असं असोशीने वाटतं तेव्हा सगळं तोंड उघडावे. खुल्लमखुल्ला सगळं सांगितल्यावरही इतरेजन पूर्वीइतकंच प्रेम करतील कां या जोखडातून मुक्ती मिळावी म्हणून सांगून टाकावे. पण एक धडा महत्वाचा असतो. मुकी ओझी वर्षानुवर्षे खांद्यावर घेऊन हिंडणे फारसे कौतुकास्पद नसते. गप्प राहण्यासारखा वेदनादायी तुरुंग दुसरा नाही. स्वतःला बंदिस्त करून ठेवणे यापेक्षा बोलण्याला आवाज मिळाला की धरली जाणारी खपली अधिक मौल्यवान असते. (अम्मा- माता अमृतानंदमयी यांच्या नुसत्या कुशीत घेण्याच्या कृतीने आबालवृद्ध ढसाढसा रडताना पाहिले की कोणत्या नैसर्गिक स्पर्शाला/प्रेमाला आपण पारखे होऊन निव्वळ मुखवटे पांघरून हिंडत असतो हे अनुभवायला मिळते.) खरं तर प्रत्येकाने सांगावी आपली कहाणी- जे सांगणं तितकंसं सोप्पं नसलं तरीही.

अंतःकरणातला गुदमर मोकळा व्हावा म्हणून तरी. परवा भाऊ तोरसेकर म्हणाले, आपण बोलतो, पण सांगत नाही. एखाद्या माणसांनी गच्च भरलेल्या खोलीत आपणच एकट्याचं अदृश्य ओझं घेऊन बसण्यात काय सुख असतं? आपणच केवळ जखमी असतो कां? त्या दाखविण्याची भीती इतकी प्रबळ असते की तोंड करकचून आवळले जाते. समोरच्यांना जणू वेदनाच नाहीत किंवा आपल्या जाणून घेण्याची कुवत त्यांच्यात नाही. त्यांना वेळ नाही असंही वाटत राहतं कां? त्या मुखवट्यांचा, त्या बतावणीचा कंटाळा येत असेल का? विशेषतः तो मुखवटा आपल्या चेहेऱ्याच्या मापाचा नसला तरी-ही. हे दडवलेले भाग वेदनादायी असतात. आपण आपल्या ठसठसणाऱ्या वेदना जेव्हा उघड करतो, आपले लढे सादर करतो तेव्हा ते सहानुभूतीसाठी खचितच नसते. उलट कोणालातरी स्वतःचे चित्र माझ्या शब्दांमध्ये दिसेल आणि पहिल्यांदाच त्याला जाणवेल. तो एकटा नाहीए. तेव्हा जसे आहात तसे दिसा, काहीही दडवायची गरज नाहीए. मग उगाचच बिलगलेली लाज त्या उजेडात कसनुशी होत स्वतःचे तोंड लपवायला जागा शोधते. ते उघड केलेलं सत्य बाकीच्यांना जवळ आणतं. मग अश्रू निर्धोकपणे ओघळतात, शरीराला आराम मिळतो आणि कुलूपबंद शांतता मुक्त होते.



**तुम हो एक अकेले तो रुक मत जाओ चल निकलो**
**रस्ते में कोई साथी तुम्हारा मिल जायेगा**

या अनुरोध मधल्या ओळी ओठांवर येतात. हॅट्स ऑफ टू आनंद बक्षी आणि मन्नादा!

याला रिपल इफेक्ट म्हणतात- तरंगांचे पसरणे !!

जणू एका योग्य क्षणाच्या प्रतीक्षेतील माणसं मग परवानगी न मागता त्यांच्या व्यथा सांगू लागतात. असे संवाद जीवनरेषा (लाईफलाईन) बनतात आणि प्रामाणिक कथन साजरं केलं जातं तिथे! चव्हाट्यावर परीक्षा घेतलेल्या क्षणांची वाच्यताही इतरांना अधीर करते, मी टू म्हणण्यासाठी. पश्चात्ताप, वैफल्य, अपयश बंद दरवाज्याआड ठेवलेल्या लोकांसाठी आपण चावी पुरवितो. आयुष्य परिपूर्ण असतं ही वदंता खोटी ठरविण्यासाठी कोणा एकाला पुढे पाऊल मात्र टाकावं लागतं. सगळी क्लिष्ट, गुंतागुंतीची, डोळ्यांना न पाहवणारी दृश्ये समोर मांडावी लागतात.

आपल्याला कशाची भीती वाटते, काय नक्की दुखावण्यास कारणीभूत होते, कशाचा पश्चात्ताप होतो हे एकदा खुलं केलं की लज्जा नामक भावनेचे वस्त्रहरण होते. मानव असणं म्हणजे गुन्हा नाही. मी नेहमी संगम मधल्या माझ्या आवडत्या ओळी उधृत करीत असतो- ये धरती हैं इंसानोंकी , कुछ और नहीं इन्सान हैं हम आपल्यातलं अपूर्णत्व हा दोष नसून ते जीवनातील सत्य आहे. मग सगळी गुपिते, अवघड वाटणारे अडचणींचे डोंगर प्रकाशात आले की त्यांच्या आकाराचे भय सरते.

शांतता भयाण असते. नात्यांना भेगा पडतात, क्लेशांनी आयुष्य उसवते, अबोल वेदनांच्या भाराखाली खूप काही मोडतोड होते. अव्यक्त आशा, स्वप्ने कोमेजतात. आपण तो संदेश द्यायला हवा- जखमा भरून निघायला एक धाडसी शब्द पुरेसा असतो.

आपण अदृश्य व्रण घेऊन ना सांगितलेल्या कथांचे संरक्षण करीत फिरत असतो. पण एकदा ओठ उघडायचे ठरविले की वेदनांचे शहाणीवेत रूपांतर होते, जखमा ताकद बनतात आणि गप्प राहणे स्व-प्रेमात बदलते. प्रत्येक उगवत्या सूर्याबरोबर आपण अधिक समग्र बनत जा-तो, शक्तिमान बनत जातो आणि पूर्वीपेक्षा अभेद्य!

स्वतःला खुलं केलं की आतल्याआत नव्याने टाके घातले जातात. त्या भेगांमधून नवा, लख्ख प्रकाश आसपास प्रवेश करतो. करुणेतून नवे बंध उगवतात. सगळी उत्तरे मिळाली, सगळ्या सैल गाठी करकचून बांधल्या जातातच असे होत नाही सहसा, पण हा मी आहे, आणि मी अजून आहे हे सगळ्यांना दिसतं. प्रामाणिकपणा माणसाला मऊ/नाजूक/ठिसूळ करतो, असा समज आहे, प्रत्यक्षात त्याच्या उलट घडत असतं. सामाईक लढ्यांमध्ये उसळी मारत पुन्हा उठण्याची शक्ती असते. आपलं अपूर्णत्व एकदा दिसलं की कोणाचा अस्वीकार, कोणाचा न्यायनिवाडा व्यर्थ ठरतो. आपल्याला जाणवलं असतं, आपण एकटे नाही.

जितकं आपण सांगू , तितके भयाचे पंख शक्तिविहीन होतात. गुपितांचे सामर्थ्य लयाला जाते. वपुंच्या भाषेत शल्यकर्माच्या आधीची भीती पळून जाईल उलट आपण आपल्या जोडणीच्या खुणा अधिक अभिमानाने दाखवू हा आहे माझ्या तग धरून राहण्याचा प्रवास.

अशा ये हृदयीचे देवाण घेवाणीत एक पावित्र्य असते. कुणाच्या खांद्यावर हा प्रश्न मग पडत नाही कारण सगळेच ओझ्याखाली दबलेले असतात. त्या क्षणी आपोआप सीमारेषा गळून पडतात, अंतर आक्रसते आणि जगातील एकाकीपण काहीसे उणावते.

आपण शांत आणि घाबरलेलो असताना नेमके कसे होतो, हे विसरायला हवे. जमलं तर स्वतःच्या वादळांशी झुंज घेणाऱ्यांसाठी बंदर होता आलं पाहिजे. मोडक्या-तोडक्या, शिणलेल्या पण आशावादी असलेल्या, हरवलेल्या पण न हरलेल्या सर्वांसाठी दीपस्तंभ होता आले तर?

मला वाटतं- आपण एक दिलासा व्हावं, होय सगळे महत्वाचे आहेत, प्रत्येकाच्या कहाण्या असाधारण आहेत, सगळ्याच झुंजी देखण्या आहेत, प्रत्येकाला प्रेम मिळण्याचा हक्क आहे. जसे आहात तसे! असा संदेश द्यावा. आपला विश्वास असावा- बोलून टाकलं दिलखुलास की आपोआप जग थोडं सुरक्षित होतं, प्रेमळ बनतं. व्रण अस्पष्ट होतात, आपण रित्या केलेल्या अवकाशात माणसं त्यांची त्यांची ओझी टाकून हलकी होऊ शकतात.

खूप वर्षांनी दीर्घश्वास घेऊ शकतात. ही एकप्रकारची शांततामय क्रांती असते. जखमा भरून येणं हा एकाकी प्रवास नसतो, तर ही सर्वोच्च शिकवण आहे. आपल्याला इतरांची गरज असते. आपण एकटेच झुंजतो, घसरतो, कोलमडतो असं नसतं. सारं काही ठीक नसणंही एका अर्थाने ठीकच असतं. मदत मागण्यात, नव्याने सुरुवात करण्यात काही गैर नसते. तेव्हा सांगत राहू या... जे झाकून ठेवावे असं शिकवलंय, त्याला बिनधास्तपणे उजेडात आणत राहू या. आपण बोलण्याचे धाडस दाखविले की समोरचा ऐकण्याचे धाडस दाखवित असतो. या प्रक्रियेत काहीतरी बदल उगवत असतात.

आयुष्याचे अंधारलेले अध्याय आपल्याला नष्ट करण्यासाठी नसतात,आपल्यातील अभेद्य प्रकाश उजळून टाकण्यासाठी असतात. त्या प्रकाशात आत्मा तावून-सुलाखून निघतो. तेथेच शक्ती जन्मते आणि चैतन्यलहरी शाश्वताकडे झेपावतात. आपले लढे, आपल्या झुंजी न ओशाळता कथन कराव्यात. प्रामाणिक शब्द निःस्तब्धतेच्या भिंती उद्धवस्त करीत असतात, इतरांना आपली पाठीवरील ओझी उतरविण्यास प्रवृत्त करतात आणि मग आपण सगळेजण मुक्त होतो. गोष्टी मनात साठवून ठेवण्यापेक्षा वेळीच त्या बोलून मोकळं झालेलं केव्हाही चांगलं. कारण फुटलेल्या धरणाचं संकट हे दरवाजे उघडल्यावर येणाऱ्या पुरापेक्षा जास्त धोकादायक असतं. संवेदनांचे वजन पेलवेन-ासे झाले की एखाद्या कमकुवत क्षणी माणूस मोकळा होतो. विशेषतः नात्यांमध्ये अहं असला की व्यक्त होताना अडथळे येतात आणि भावनिक अंतर वाढायला लागते. एखाद्या नात्यात- विशेषतः पती-पत्नीच्या, समोरची व्यक्ती रडते-भेकते, पदर पसरते पण अहंकारी जोडीदार माफ करायला वेळ लावतो. मग नातेवाईक तुटून जातात. हा एक प्रकारचा लाल झेंडा असतो. आपलेच वर्तन दुखावणारे असते आणि त्याचवेळी अप्रत्यक्षपणे नकारात्मक भावनेचे प्रदर्शन मात्र केले जाते. याला एक प्रकारची भावनिक अपरिपक्वता मानले जाते. नंतर आठवले की असे क्षण हृदय पिळवटून काढतात.

आपण जेव्हा इतरांना काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा ते आपण आतवर कसंबसं हाताळलेलं असते, जगलेले असते, सहन केलेले असते. त्रास देणाऱ्या घटना, वैताग आणणारे प्रसंग स्वतःपुरते ठेवलेले असतात. ते सांगण्याआधी स्वतः समजून घेण्याचा डाव खेळलेला असतो. तासनतास त्यावर विचार केलेला असतो, आसपास कोणी नाही हे पाहून स्वतःपाशी मनसोक्त रडून घेतलेलं असतं आणि नंतरच कथनासाठी सज्ज झालेलो असतो. सगळ्यात अवघड परीक्षा एकट्याने दिलेली असते आणि मगच बोलण्याचा निर्णय घेतलेला असतो. आता याउप्पर कोणी त्यावर उतारा सुचवावा, मलम लावावा असं वाटत नसतं. ती वेदना कोणी स्वतःवर ओढवून घ्यावी अशी अपेक्षा तर मुळीच नसते. जे बोलायचे आहे, ते आधीच स्वतःला सांगून झालंय. हा माझा हाताळण्याचा मार्ग आहे. नवं शिकण्याची ही माझी पद्धत आहे. स्वतःच्या लढती शांतपणे स्वतःबरोबर घेऊन हिंडायची आता सवय झाल्याने त्या उच्चरवात कशा मांडायच्या याचा आता सराव राहिलेला नाहीए. आणि बोलण्याच्या वेळी त्या खुल्या दुखापती उरलेल्या नसतात, तर ते असतात धडे स्वतः अनुभवून शिकलेले असं बिनधास्तपणे बोलता आलं पाहिजे.

**हे सोपे नसते-** कधी हात थरथरतो, कधी आवाज फुटत नाही, हृदय धडधडते. कधी वाटतं अगोचरपणे खूप काही बोलून तर गेलो नाही नं? पण आठवतात- मूक संदेश, थँक्यू म्हणणारे पाणावलेले डोळे, पाठीवरची एखादी भिजलेली थाप! मुख्य म्हणजे परत आहेर म्हणून साठलेल्या असंख्य कथा. आणि समोर चेहेऱ्यांवर अभिप्रेत असलेलं दिसलं की निष्काम कर्माचे जणू फळ मिळते. हे सामाईक आहे, यावर शिक्का मोर्तब होते. म्हणून खुलेपणाने व्यक्त व्हावे. तिथे शांततेचे ओझे कमी होते. एकमेकांना देण्यासाठी यापरती अधिक चांगली भेटवस्तू ती कोणती?

---

# भारतीय मल्लविद्या

प्रबंधांची बीजे
श्रीरंग हिर्लेकर

मल्लयुद्धाची एक प्राचीन आणि सुव्यवस्थित परंपरा आपल्याकडे आहे. ग्रीकांच्याही पूर्वी महाभारत आणि त्याही आधी रामायणात यासंबंधी अनेक उल्लेख आले आहेत. रामाच्या एका मंत्र्याच्या मुलाचे नाव 'मल्ल' असे होते तर 'मल्लदेश' नावाच्या एका प्रदेशाचे नाव श्रीमद्भागवतात आले आहे. रामायणातील जाम्बुवंत, हनुमान, वाली, सुग्रीव यांचा आणि महाभारतात जरासंध, भीम, किचक, दुर्योधन, बलराम, चाणूर, मुष्टिक इत्यादींचा प्रमुख मल्ल म्हणून निर्देश करता येतो. विष्णू सहस्रनामातही 'चाणूरान्ध्रनिषूदन' असे नाम आले आहे; ते कंस वधसमयी कृष्णाने जे चाणूर आणि आंध्रप्रदेशातील इतर अनेक राक्षस मल्लांशी द्वंद्व करून त्यांचा वध केला त्यावरून. पुराणात चक्रवर्ती भरत, बाहुबली, मार्कंड्येयांचे मेघनाद आणि जयनाद नावांचे दोन शिष्यही, पण मल्लांची नावे येऊन जातात.

**भारतीयांची बलोपासना :** आखाडा, कुस्ती आणि पहिलवान हे शब्द जरी आज मराठीत रूढ असले, तरी ते मूळ पर्शियन आहेत. 'म' म्हणजे आनंद आणि 'ल' म्हणज लीला, क्रीडा किंवा हालचाल. 'साऊंड माईंड इन ए साऊंड बॉडी' हे वचन आपल्याला माहीत आहे, पण दुर्दैवाने मुण्डकोपनिषदातील 'नायमात्मा बलहिनेन लभ्यः' किंवा 'बलम् उपास्य' ही वचने आपण विसरलो. आपल्याकडील ४ वेद, ३ उपवेद (आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद), ६ शास्त्रे, १४ विद्या, १८ पुराणे आणि ६४ कला या सर्वांचा परिणाम आपल्या क्रीडा आणि सर्वच जीवनावर झालेला आहे. आपल्याकडील प्रत्येक विषय हा उच्चकोटीपर्यंत पोहोचविण्यात आपले विचारवंत यशस्वी होण्याचे कारण म्हणजे आपली विचारपद्धती. आपले क्रीडा जीवन समृद्ध आणि सौष्ठवाप्रत पोहोचले होते. आपल्याकडे संगीत, शिल्पकला, आयुर्वेद यातून आपली शारीरिक शिक्षण पद्धती उभी आहे.

समर्थ रामदासांची बलोपासना, छांदोग्य उपनिषदातील ''युवा स्यात्, साधु युवा, अध्यायकः आशिष्टः द्रढिष्ठः बलिष्ठः। तस्येयं पृथीवी वित्तस्य पूर्णास्यात् सैको मानुष आनंदः।'' अशा आनंदाच्या व्याख्येतून व्यक्त होणारा मानुष आनंद फक्त भारतीय शारीरिक क्रीडा विज्ञान अथवा शिक्षणानेच प्रतिपादन केला आहे. क्रीडा स्पर्धा ही शब्दांची पाश्चिमात्य युती आपल्याला मान्य नाही. 'क्रीडा' या शब्दात सात्त्विक आनंद आहे तर 'स्पर्धा' शब्द राजस आणि कधी तर तामस आनंद दर्शवितो. ऑलिम्पिक स्पर्धांचा उद्देश जरी संपूर्ण जगातील लोकांचे संबंध खेळीमेळीचे व्हावेत असा असला, तरी त्यांचा मूळ हेतू केव्हाच हरवला आहे.

**आवश्यकता :** आदिकाळापासून 'जीवो जीवस्य जीवनम्' किंवा थोडक्यात 'बळी तो कान पिळी' अशा वातावरणात 'सर्व्हिव्हल ऑफ द फिटेस्ट' या वचनाप्रमाणे अनेक हिंस्र आणि बलवान पशूंशी सामना करत मानवाला आपले अस्तित्व टिकवावे लागले. तो टिकू शकला. कारण तुलनेने क्षीण शारीरिक शक्तीला त्याने आपल्या बुद्धीची जोड दिली. दगडांच्या शस्त्रांपासून सुरुवात करीत लांबूनच फेकून मारण्याची शस्त्रे त्याने विकसित केली. 'गरज ही शोधाची जननी' या म्हणीप्रमाणे तो सुधारणा करीत गेला. पशू दूर असले तर फेकून मारण्याचे शस्त्र उपयोगाचे, पण कधी चालून आला तर अंगचे बळच कामाचे. म्हणजे थोडी तरी बलोपासना करायलाच हवी. हत्ती आणि सिंहांशी पण माणूस भिडू लागला. त्याला एकटे राहण्यापेक्षा समूहात राहण्याचे महत्त्व पटू लागले. मात्र, पुढे या समूहाचे नेतृत्व कोणी करावे तर ते बलशाली व्यक्तीने. म्हणजे पुन्हा बल संपादन करणे आलेच. त्यासाठी योग्य आहार, शरीर कमावणे हे सर्व तो अनुभवातून शिकला आणि बलोपासनेचे शास्त्र निर्माण झाले.

**बलोपासना :** यात शारीरिक बल कमावणे, विविध शस्त्रास्त्रे चालवणे, द्वंद्व युद्ध करणे हे सर्व आले. काहीही करून आपले वर्चस्व सिद्ध करत अस्तित्व टिकवणे. मानवी समूहाची स्थलांतरे सुरू झाली. सभ्यतेचे मापदंड तयार होऊ लागले. तुलनेने बुद्धिवान होते ते आर्य आणि कमी ते अनार्य अशा व्याख्या तयार झाल्या. आता पशूंपेक्षा माणसाम ाणसातच अस्तित्वासाठी सामने होऊ लागले. आपले व त्याचे बल यात विविध प्रयोग सुरू झाले. नियुद्ध, बाहुयुद्ध, मल्लयुद्ध आणि प्राणयुद्ध हे मुख्य प्रकार. मल्लांचेही चार प्रकार म्हणजे गजमल्ल, वृषभमल्ल, सिंहमल्ल आणि मृगमल्ल असे ठरले. यातूनच पुढे कुस्तीचे चार प्रकार अस्तित्वात आले. या नावात कालसंगती नाही. कारण तसे बघता जाम्बुवंत सर्वात आधीचा. त्याच्या जमातीचे मल्ल या प्रकारे कुस्ती करीत इतकाच अर्थ घ्यायचा. नेत्रयुद्ध आणि वाक्युद्ध पण चालायचे. नेत्रयुद्ध म्हणजे एकटक भेदक नजरेने पाहायचे आणि वाक्युद्ध म्हणजे मोठमोठ्या आरोळ्या ठोकून, सामर्थ्याच्या वल्गना करून प्रतिपक्षाला गारद करायचे.



**१) जरासंधी कुस्ती :** अनार्य म्हणजे राक्षसी प्रकार. येथे शारीरिक शक्तीला प्राधान्य होते. कपटही केल्या जाई. कसलाही विधिनिषेध न पाळता प्रतिपक्षी मल्लाला बुकलणे, मारणे, चावणे, हातपाय, बोटे तोडणे, कान व नखे उपटणे, दात पाडणे, उचलून फेकणे, रक्तबंबाळ होऊन पडल्यावरही मर्मी हल्ला करून ठार करणे हे सर्वमान्य असे.

**२) जाम्बुवंती :** हा राक्षसी कुस्तीचाच प्रकार, पण यात कपट नसे. शक्तीच्या जोरावर प्रतिपक्षाला जेरीस आणून ठार करणे अथवा पळवून लावणे. जंगलात हरीण, शहरात दोन बैल किंवा बोकड शिंग लढवतात व शेवटी एक जण पळून गेला किंवा दोन कुत्र्यांच्या लढाईत एकाने आकाशाकडे पोट करून शरणागती स्वीकारली की युद्ध थांबते तसे.

**३) भीमसेनी :** यातही बलालाच अधिक प्राधान्य असले, तरी आता विविध डावपेच वापरणे सुरू झाले. अधिक बलवान तो चटकन् जिंकायचा. पण बरोबरीचा असेल तर शक्तीऐवजी डावपेचांनी विजयी व्हायचा. भीम-जरासंध युद्ध अहोरात्र ७२ तास चालले. भीमाचे बकासुर, हिडिंब राक्षसांशी जरासंधी पद्धतीने आणि विराट नगरीत कीचकाशी भीमसेनी पद्धतीने युद्ध झाले.

**४) हनुमंती :** हा प्रकार म्हणजे आर्य-अनार्य कुस्तीचा सुरेख संगम. यातही बलाचे महत्त्व होतेच; पण आता युक्तीला प्राधान्य मिळाले. प्रतिमल्लाला हूल दाखवणे, चकवणे, तो अंगावर धावून आला की, ऐनवेळेस आपण बाजूला सरकणे, चपळतेने त्याचे आघात चुकवणे, आपण मात्र संधी साधून त्याच्या मर्मस्थानी घात करणे, त्याला पकडून गुदगुल्या करणे, शारीरिक हालचाली भरभर करणे या सर्वांना महत्त्व आले आणि कुस्तीचे एक सभ्य शास्त्र उदयास आले.

**आखाडा :** वसिष्ठांनी आखाडाभूमीचे आकार प्रकार सांगितले. ''दैर्ध्ये रुदामिता दंडा विस्तारे नवदंडिका। सगरैकतला मृद्वी श्रमभूमी प्रशस्तते ।।'' रुद्र किती तर ११. दंड म्हणजे ४ हात. म्हणून ४४ हात लांब व ३६ हात रुंद आखाडा असावा. देवमान, मनुष्यमान आणि राक्षसमान अशी आखाड्याची विविध मोजमापे सांगितली गेली. तेथील माती कशी असावी, कशी नसावी हेही ठरले. लाल, काळ्या किंवा पिवळ्या मातीचे गुण लक्षात घेऊन तशी निवड करण्यात येऊ लागली.

**बलसंपादन :** आता आयुर्वेद आणि शरीरशास्त्रही पुढे सरसावले आणि शरीर कमवण्यासाठी कोणी, कधी, किती आणि कसा व्यायाम करावा, आहार काय घ्यावा हे सांगितले. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' म्हणून एकच नियम सर्वांसाठी नाही. शरीराच्या कफ, वात, पित्त प्रकृती, अस्थिप्रधान, मांसप्रधान, मेदप्रधान या प्रकारांनुसार व्यायामाचेही प्रमाण व प्रकार ठरले.

मर्दन म्हणजे मालिश. त्याचे भीमसेनी, नारायणी, चित्रिणी आणि मसृणी असे चार प्रकार सुचवले. नंतर थंड पाण्याने स्नान करावे. मल्लांचे वर्गीकरण करताना ज्योतिषशास्त्राचीही मदत घेण्यात आली. जन्मलग्न व नक्षत्रांवरून मार्गदर्शन करण्यात आले. व्यायाम व्याख्या व प्रयोजन : चरकाचार्यांनी सांगितले की, व्यायामो दैर्ध्यम् किंवा वि+आयाम म्हणजे व्यायाम. अवयवांना दीर्घता येणे, त्यांचा विस्तार आणि विकास ज्या शिस्तबद्ध क्रिया आणि हालचालीतून होतात त्या म्हणजे व्यायाम. आयाम म्हणजेच दीर्घता. ''शरीरचेष्टा या चेष्टा स्थैर्यार्था बलवर्धिनी। देह व्यायामसंख्याता मात्र्यां तां समाचरेत्।।'' शरीराला लाभदायक, दृढता देणारी आणि बळ देणारी अशी क्रिया म्हणजे व्यायाम. अर्थात हे लाभ, ही दृढता आणि हे बळ योग्य प्रमाणात आणि चिरस्थायी असावे.

हनुमान हा बुद्धिमतां तसेच शक्तिमतां वरिष्ठ आहे. यासाठी व्यायामाचे अनेक प्रकार निर्माण झाले. दंड बैठका, मलखांब, लेझिम, मुद्गर व गदा फिरवणे, आखाड्यातील माती खोदणे, जड वजन तोलणे, चालणे, पोहणे, योगासने अशा अनेक पद्धती निर्माण झाल्या. श्रम म्हणजे व्यायाम. अल्पश्रम, अर्धश्रम, पूर्णश्रम, अतिश्रम अशी प्रमाणे ठरली. मल्लाची दिनचर्या, आहार, आचारविचार ठरले. ब्रह्मचर्य पालनाला महत्त्व आले.

मल्लाने कधी स्त्रीचा शीलभंग केला तर 'अवकीर्ण' नावाचे प्रायश्चित्त आहे. म्हणजे समाजापासून वर्षभर अलिप्त राहावयाचे, गाढवाचा होम करून त्याचे कातडे पांघरून गळ्यात आपल्या दुर्वर्तनाचा उल्लेख असलेली पाटी बांधून गावात फिरावयाचे. गजबीड (इंडियन डेथलॉक), नाडीबंद असे कुस्तीचे हुकमी डावपेच आखण्यात आले. सामना आनंददायी व्हावा म्हणून नियम ठरले.

**राजाश्रय :** राजसत्तेने आखाडे स्थापन करावेत. मल्लांच्या योगक्षेमाची जबाबदारी बघावी, सामने आयोजित करून प्रोत्साहन द्यावे आणि मल्लांनीही समाजाचे रक्षण करावे. छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक मल्लांना प्रोत्साहित केले. समर्थांनी गावोगावी आखाडे स्थापन केले. पुढे शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड महाराजांनीही हा वारसा चालविला. यामुळे अनेक नामवंत मल्ल निर्माण झाले. स्त्रियाही मागे राहिल्या नाहीत.


कार्लेकर सर्कशीत राममूर्ती आणि ताराबाईंच्या सर्कशीत स्वतः ताराबाई बलप्रदर्शनाचे अचाट प्रयोग करत. वज्रमुष्टी नावाच्या कुस्तीच्या प्रकाराला सयाजीरावांनी संजीवन दिले. १२ व्या शतकात 'मल्ल पुराण' नावाचा एक अप्रतिम संस्कृत गंथ रचण्यात आला. माझ्या हाती त्याचे हस्तलिखित लागले आणि अमरावतीच्या विश्वविख्यात श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या सांगण्यावरून मी त्याचे मराठी भाषांतर केले. वज्रमुष्टी प्रकारातील देवमल्लाचे लघुचरित्र पण मिळाले. तेही त्यात समाविष्ट केले. हस्तलिखितात असंख्य त्रुटी व दोष आहेत. शक्य ते दूर केले, पण त्या विषयात संशोधनाला प्रचंड वाव आहे.

पुण्यातील हगवणे कुटुंबीयांचे घृणास्पद कृत्य, हुंड्यामुळे सुनेचा केलेला छळ आणि त्यातून तिने उचललेले आत्महत्येचे पाऊल हा चर्चेचा विषय असतानाच विवाहासारख्या कौटुंबिक सोहळ्याचे राजकीयीकरण होत असल्याचा मुद्दाही लक्षात घेण्याजोगा आहे. आज गावोगावी, मध्यम आणि कनिष्ठ वर्गापर्यंत हे लोण पसरत असून कर्जबाजारी झालो तरी लग्न थाटामाटात करणार, हा अट्टहास खूप धोकादायक आहे.

# विवाह सोहळ्याचे राजकीयीकरण होतेय

विशेष

**हेरंब कुलकर्णी**



सासरी होणाऱ्या छळाला आणि वारंवार आईवडिलांकडून पैसे आणण्याच्या मागणीला कंटाळून वैष्णवी हगवणेने आत्महत्या केली आणि हुंडाबळीचा विषय नव्याने ऐरणीवर आला. ही संपूर्ण घटना, तिच्याशी संबंधितांचे धागेदोरे, राजकीय संबंध, प्रचंड पैसा आणि त्याचा माज, अरेरावी यासंबंधीचा तपशील समोर आला आहे. तपासाअंती आणखी सत्य समोर येईलच. मात्र, हुंडाबळीच्या संदर्भात वैष्णवी हे एकच नाव नाही, हेदेखील लक्षात घ्यायला हवे.

या घटनेनंतर अशाच स्वरूपाची चार-पाच प्रकरणे प्रकाशझोतात आली. त्यामुळे प्रत्यक्षात याचे प्रमाण आणि गांभीर्य किती असेल, हे सांगणे न लगे. मात्र ही घटना समाजव्यवस्थेत होणाऱ्या बदलाकडेही डोळेझाक करून चालणार नाही. आधुनिक युग आले, सुबत्ता आली, सगळ्यांना शिक्षण मिळाले की हळूहळू लोक सुधारतील आणि अन्याय्य प्रवृत्ती कमी होईल, अशी आपली भाबडी समजूत होती. एक वर्ग राजकीय सुधारणांबरोबरच सामाजिक सुधारणा घडण्याची मोठी आशा बाळगून होता. प्रत्यक्षात हुंडाविरोधी कायद्यानंतरही खेड्यापाड्यातील एखाद्या घराबरोबरच आधुनिकतेचे वारे लागलेल्या मोठ्या शहरांमध्येही अत्यंत क्रूरपणे अशा घटना घडताना दिसतात, तेव्हा हताश व्हायला होते. आतापर्यंतच्या सुधारणांनी नेमके काय साधले, हा प्रश्न उभा राहतो आणि माणसे बदलतच नसतील तर पुन्हा कुठून सुरुवात करायची, हा प्रश्न समोर उभा राहतो.

सध्या लग्न हा घरगुती समारंभ राहिला नसून त्याचेही आधुनिकीकरण आणि राजकीयीकरण झाल्याचे बघायला मिळते. अजूनही लग्नपरंपरेतील स्त्री शोषणाचा भाग पूर्णपणे संपलेला नाही. आज जुन्या परंपरांचे वैभवीकरण केले जाते; खेरीज त्यामागील बटबटीतपणा आणि जळजळीत वास्तवही अशा काही उदाहरणांवरून समोर येते तेव्हा फोलपणा ठळकपणे जाणवतो. या सगळ्यामागे पैसा ओरबाडण्याची प्रवृत्ती आणि पुरुषप्रधान मानसिकताच दिसते. ती समाजाच्या सर्व स्तरांमध्ये पाहायला मिळते. त्यामुळेच सदर प्रश्नाचे उत्तर शोधायचे तर आपल्याला आधी या मानसिकतेवर काम करावे लागेल. आज पुन्हा एकदा लग्न किती मोठ्या प्रमाणात केले जाते, भेटी कशा दिल्या जातात, डामडौल आणि हौसमौज किती केली जाते याला प्रतिष्ठा मिळत आहे. मधल्या काळात समाजसुधारकांनी केलेल्या कामामुळे मागे पडलेले हे मुद्दे आता नव्याने समोर येत आहेत.

महात्मा फुले यांनी सत्यशोधकीय विवाह ही संकल्पना मांडली आणि अनेकांनी त्याचे अनुकरण केले. काही वर्षांपूर्वी मराठवाड्यात केवळ नारळ-सुपारी देऊन लग्न करण्याचे प्रकार दिसायचे. मधल्या काळात म्हणजेच १९८० च्या काळात सामुदायिक विवाहालाही चांगला प्रतिसाद मिळायचा. त्यावेळी अनेक श्रीमंत घरातील मुलामुलींनी सामूहिक विवाह सोहळ्यात लग्नगाठ बांधल्याची उदाहरणे आहेत. त्यात काही राजकारणी घरातील मुलांचाही समावेश होता. मात्र कालांतराने परिस्थिती बदलली. समाजात अतिरिक्त संपत्ती निर्माण झाली आणि त्यानंतर समारंभाचे राजकीयीकरण सुरू झाले.

शेवटी अतिरिक्त संपत्ती शोषणातून निर्माण होते, हा सर्वमान्य सिद्धांत आहे. बदलता समाज या सिद्धांताप्रमाणे निर्माण झाला आणि तसेच वागू लागला. गावोगावी गुंठापाटील वाढले तर सरकारी वा खासगी नोकरीत मिळणाऱ्या मोठ्या पॅकेजमुळे, जागतिकीकरणानंतर झालेल्या व्यापारवृद्धीमुळे सामान्यांच्या हातात मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त पैसा खेळू लागला. हाच पैसा पुढे प्रतिष्ठेशी जोडला गेला. पूर्वी बक्कळ पैसा बाळगून असणारी माणसेही साधी राहायची. साधेपणाने जगायची.

पैशाचे प्रदर्शन करणे हिणकस असल्याची, हे पाप असल्याची जाणीव तेव्हा सगळ्यांना होती. मात्र जागतिकीकरणाच्या सगळ्या कोलाहलात स्वत:ला एकटे समजणाऱ्या माणसाने आपली ओळख निर्माण करण्याचा मार्ग, मी कोणी तरी वेगळा आहे हे दाखवण्याचा उपाय शोधण्यासाठी पैशाचे प्रदर्शन मोठ्या प्रमाणात सुरू केले. जो तो शक्य त्या सगळ्या संसाधनांचा वापर करून आपले अस्तित्व ठळकपणे मिरवू लागला. कदाचित विवाह सोहळ्याला आलेले अपरंपार महत्त्व आणि त्या निमित्ताने होणारे पैशाचे प्रदर्शन ही बाब या प्रकारांना कारणीभूत ठरली असेल.

पूर्वी राजकारणी वा समाजातील प्रतिष्ठित लग्नसोहळ्यामध्ये लक्षभोजन घालताना दिसले तर सामाजिक कार्यकर्ते निदर्शने करताना दिसायचे. वृत्तपत्रे आपल्या बातम्यांमधून या प्रवृत्तीचा निषेध करताना दिसायची. मात्र, कालांतराने हा वर्ग गप्प झाला आणि आपला नेताच लग्नामध्ये हजारोंची गर्दी जमवत असेल तर आपणही बरेच लोक गोळा करायला हवेत, असे समजून त्यांचे कार्यकर्ते ही घरातल्या लग्नसोहळ्यासाठी संपूर्ण गावाला आमंत्रण देऊ लागले. हा शक्तिप्रदर्शनाचा एक भाग झाला.

केवळ लग्नालाच नव्हे, तर अन्त्ययात्रा वा अगदी दहाव्याच्या कार्यक्रमालाही गर्दी जमवली जाऊ लागली. यातूनच माणसाचे मूल्यमापन तो माणूस म्हणून कसा आहे यावरून न होता, त्याने गर्दी किती जमवली यावरून होऊ लागले. एखाद्याच्या मागे किती लोक आहेत, हा प्रतिष्ठेचा मुद्दा ठरू लागला. अगदी काही वर्षांपूर्वीपर्यंत महाराष्ट्रात वाढदिवस, विवाहाचे वाढदिवस वा यासारखे सोहळे घरगुती स्वरूपाचे असत. मात्र आता लग्नाच्या वाढदिवसालाही मोठे कार्यालय घेण्याचा प्रघात बघायला मिळतो. प्रत्येक छोट्या-मोठ्या गोष्टीसाठी शुभेच्छा आणि भेटवस्तूंचा पाऊस पडतो. अशा प्रकारे हातातला पैसा कोणत्या ना कोणत्या इव्हेंटमध्ये खर्च करण्याची नवी मानसिकता बघायला मिळत आहे. हे सगळे मुद्दे बदलत्या सामाजिक समस्यांच्या मुळाशी आहेत असे म्हणावे लागेल. पूर्वी राजकारण हा ठरावीक गटापुरता मर्यादित विषय होता. मात्र, आज राजकारण वेगवेगळ्या स्वरूपात सर्वत्र पसरत आहे. प्रत्येक राजकारणी जास्तीत जास्त लोकांमध्ये मिसळण्याची संधी शोधतो. पूर्वीचे राजकारणी काम करायचे आणि त्याच माध्यमातून लोकांपर्यंत जायचे. एखादा कार्यकर्ता व्यक्तिगत काम घेऊन आल्यास ते चिडायचे आणि गावाचे काम घेऊन ये, असे सुनवायचे. पण आज हा वर्ग उरलेला नाही. सर्व राजकीय मंडळी बिनदिक्कत धनदांडग्यांच्या विवाह सोहळ्यांना हजेरी लावताना दिसते.

स्वाभाविकच खालच्या कार्यकर्त्यांकडून त्याचेच अनुकरण होते. एखाद्या सभेसारखा मोठा गट एकगठ्ठा मिळत असेल तर तिथे जायला काय हरकत आहे, हा विचार करून नेते तिथे जा-तात. सरकारी खर्चाने हे लोक एखाद्या लग्नाला उपस्थित कसे राहतात, हा प्रश्न कोणीही विचारत नाही. त्यामुळे खरोखर या लग्नात हुंडा मागितला गेला असेल का, सासरचे लोक मुलीचा नीट सांभाळ करतील का, लग्नात खर्च होणारा पैसा कोठून आला असेल यासारखे प्रश्न कोणाच्या खिजगणतीतही नसतात.

नेते आल्यामुळे यजमान मिरवतो. या माध्यमातून आपले राजकीय वजन आणि राजकीय वर्तुळातील ऊठबस वाढवू पाहतो. दुसरीकडे हगवणे कुटुंबीयांसारखे हैवान मिळाले तरी मुली वा तिच्या माहेरची मंडळी दबावाखाली येऊन न्यायालयाचे दार ठोठावण्यास घाबरतात. यातूनच शक्य तेवढ्या मागण्या पूर्ण केल्या जातात आणि अगदीच नाईलाज झाला की जीवन संपवण्याचा विचार करून मुली आपली सुटका करून घेतात. वरच्या वर्गातील साजरीकरणाच्या सर्व पद्धती हळूहळू खालच्या वर्गापर्यंत पाझरत जातात. आज हे वास्तवही अगदी ठळकपणे बघायला मिळते. साखरपुडा, हळद समारंभ, रिसेप्शन यासारखे प्रकार ग्रामीण भागातही मोठ्या धामधुमीत पार पडतात. थोडक्यात, आज ग्रामीण भागातील वधू-वर आपले रोल मॉडेल शहरी भागामध्ये शोधतात आणि त्याचेच अनुकरण करतात. आर्थिक ताण आणि आर्थिक अपेक्षा वाढण्यामागे हा भाग महत्त्वाचा आहे. ग्रामीण भागामध्ये नवरीला मंडपात आणण्यासाठी हेलिकॉप्टरचा वापर केला जातो, तेव्हा समाज किती आणि कशा प्रकारे बदलत आहे हे समजते. हे सगळे प्रकार समाजाला चुकीच्या दिशेकडे नेणारे आहेत. यातूनच पैशाचा हव्यास वाढतो. पैशासाठी, चैनीसाठी मुलींचा छळ करण्याची मानसिकता फोफावते. दिखाऊपणा बोकाळतो आणि वैष्णवीसारख्या अनेक भाबड्या कळ्या हकनाक भरडल्या जातात. म्हणूनच आता तरी हे सगळे थांबवणे गरजेचे आहे. त्यासाठी अगदी शालेय पातळीपासून प्रयत्न करावे लागतील. स्त्रीकडे पाहण्याची मुलांची मानसिकता बदलावी लागेल. हे काम पुन्हा नेटाने हाती घ्यावे लागेल. त्याला काहीही पर्याय नाही.



शहरीकरण, हवामान बदल आणि वन्यजीव संवर्धन यांच्यात संतुलन कसे राखायचे हा आजचा मोठा प्रश्न आहे. एका संशोधनात आढळून आले की, सहा वेगवेगळ्या वर्गांच्या किमान एक चतुर्थांश प्रजातींना हवामान बदलाचा धोका आहे. आतापर्यंत अतिशोषण आणि अधिवास नष्ट होणे जैवविविधतेच्या नुकसानाचे पहिले कारण मानले जात होते; परंतु हवामान वेगाने बदलणे पृथ्वीवरील प्राण्यांसाठी तिसरे सर्वात मोठे संकट बनेल.

# प्राण्यांवरील सर्वात मोठे संकट



पर्यावरण

**मिलिंद बेंडाळे**

‘ओएसयू कॉलेज ऑफ फॉरेस्ट्री’ आणि मेक्सिकोच्या संशोधकांनी सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेल्या जैवविविधता डेटासेटचा वापर करून ३५ विद्यमान वर्गांमधील ७० हजार ८१४ प्रजातींच्या प्राण्यांच्या डेटाचे परीक्षण केले. ‘इंटरनॅशनल युनियन फॉर कन्झर्वेशन ऑफ नेचर’ (आययूसीएन) ने केलेल्या मूल्यांकनानुसार, संशोधकांनी वर्ग आणि हवामान बदलाच्या धोक्यांच्या आधारावर प्रजातींचे विभाजन केले.

या वर्गांमध्ये अर्कनिड्स आणि चिलोपोडन्स (सेंटीपीड्स) तसेच अँथोझोअन्स आणि हायड्रोझोअन्स (जेलीफिश आणि कोरलशी संबंधित सागरी अपृष्ठवंशी प्राणी) यांचा समावेश आहे. इतर वर्गांमधील प्रजातींचे प्रमाण खूपच कमी आहे, जे तापमानवाढीच्या हवामानामुळे थेट धोक्यात आहेत. संशोधकांना समुद्रातील अपृष्ठवंशी प्राण्यांबद्दल विशेष काळजी आहे, जे हवामान बदलामुळे होणारी बहुतेक उष्णता शोषून घेतात. हे प्राणी अधिकाधिक असुरक्षित होत आहेत कारण त्यांची हालचाल करण्याची आणि प्रतिकूल परिस्थितीतून लवकर बाहेर पडण्याची क्षमता मर्यादित आहे. हवामान बदलामुळे मानव आणि वन्य प्राण्यांमधील संघर्ष वाढत आहे. उष्णतेच्या लाटा, वणवे, दुष्काळ आणि पूर यासारख्या घटनांमुळे मोठ्या प्रमाणात मृत्यू होऊ शकतात. परागण आणि परजीवीवाद यासारख्या प्रजातींच्या अंतर्गत परस्परसंवादावरदेखील परिणाम होण्याची शक्यता आहे, जे परिसंस्थेच्या कार्यासाठी आवश्यक आहेत.

मानवनिर्मित सीमा आणि हवामान बदल वन्यजीव धोक्यात वाढ करतात. संशोधकांनी म्हटले आहे की, पाण्याच्या वाढत्या तापमानामुळे इस्रायलच्या किनाऱ्यावरील मोलस्क प्राण्यांच्या संख्येत ९० टक्के घट होणे अपृष्ठवंशी प्राणी किती असुरक्षित आहेत, हे दर्शवते. इतर उदाहरणांमध्ये २०२१ च्या पॅसिफिक नॉर्थवेस्ट हीट डोम दरम्यान अब्जावधी इंटरटाईडल इनव्हर्टेब्रेट्सचा मृत्यू आणि २०१६ मध्ये आलेल्या तीव्र सागरी उष्णतेच्या लाटेनंतर ग्रेट बॅरियर रीफच्या २९ टक्के भागात कोरलचा विनाशकारी मृत्यू यांचा समावेश आहे.

मोठ्या प्रमाणात मृत्युदर हा फक्त अपृष्ठवंशी प्राण्यांपुरता मर्यादित नाही. २०१५ आणि २०१६ मध्ये उत्तर अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील सुमारे ४० लाख कॉमन मुरे हे तीव्र सागरी उष्णतेच्या लाटेमुळे, बदलत्या अन्नजाळ्यामुळे आणि उपासमारीने मृत्युमुखी पडले. त्याच उष्णतेच्या लाटेमुळे पॅसिफिक कॉडमध्ये ७१ टक्के घट झाली; कारण चयापचय मागणी वाढली आणि शिकार बेस कमी झाला. उत्तर पॅसिफिकमध्ये सुमारे ७,००० हंपबॅक व्हेलच्या मृत्यूमागे सागरी उष्णतेच्या लाटांची भूमिका असू शकते. वन्यजिवांना असलेल्या हवामान बदलाच्या धोक्यांबद्दल गोळा केलेली माहिती तुलनेने कमी आहे. बहुतेक वन्यजीव वर्गांचे (१०१ पैकी ६६) अद्याप ‘आययूसीएन’ने कोणत्याही प्रजातीचे मूल्यांकन केलेले नाही.

आज जिवंत वन्य जीव प्रजातींपैकी मूल्यांकन केलेल्या ७० हजार ८१४ प्रजाती सुमारे ५.५ टक्के आहेत. हवामान बदलामुळे बंगालच्या उपसागरात ऑक्सिजनची कमतरता वाढत आहे, मृत क्षेत्रे तयार होत आहेत. अभ्यास संशोधनात केलेले विश्लेषण हे वन्य जीव प्रजातींना असलेल्या हवामानाच्या धोक्यांचे मूल्यांकन करण्याचा एक प्रारंभिक प्रयत्न आहे. माहितीपूर्ण धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी धोके समजून घेणे महत्त्वाचे आहे. सर्व परिसंस्थांमध्ये प्राण्यांच्या प्रजातींसाठी हवामान बदलामुळे होणाऱ्या मोठ्या प्रमाणात मृत्युदराच्या घटनांवर जागतिक डेटाबेस आवश्यक असून सध्या दुर्लक्षित प्रजातींचे मूल्यांकन जलद करणे आवश्यक आहे.

सर्व प्रजातींना हवामानामुळे होणाऱ्या धोक्यांचे मूल्यांकन करण्याची आणि अनुकूलन क्षमतेचा चांगल्या प्रकारे विचार करण्याची आवश्यकता आहे, असे संशोधकांनी पेपरमध्ये म्हटले आहे. जैवविविधता आणि हवामान बदल धोरण नियोजन जगभरात एकत्र आणण्याची आवश्यकता आहे. एक चतुर्थांश प्रजाती नामशेष होण्याचा धोका आहे.

गोड्या पाण्यातील ६४ परिसंस्था पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या एक टक्क्यापेक्षा कमी भाग व्यापतात; परंतु त्या ग्रहावरील जीवनासाठी महत्त्वाच्या आहेत. नवीन संशोधनातून दिसून आले आहे की, वातावरणाचे नुकसान गोड्या पाण्यातील जीवसृष्टीला नष्ट होण्याच्या जवळ पोहोचवत आहे. २४ टक्के प्रजाती नामशेष होण्याचा धोका आहे.

मासे, खेकडे आणि ड्रॅगन फ्लायच्या हजारो प्रजाती येत्या काही दशकांमध्ये नामशेष होऊ शकतात. गोड्या पाण्यातील सुमारे २४ हजार प्रजातींच्या आरोग्याच्या एका महत्त्वाच्या मूल्यांकनात आढळून आले आहे की, सुमारे एक चतुर्थांश प्रजाती नामशेष होण्याच्या स्थितीत आहेत. यापैकी सुमारे एक हजार प्रजाती अत्यंत धोक्यात असल्याचे मानले जाते, तर २०० आधीच नामशेष होण्याची शक्यता आहे. हे आकडे हिमनगाचे फक्त टोक आहेत.

गोड्या पाण्यातील जैवविविधता जपणे हे जागतिक आव्हान आहे. कारण हजारो प्रजातींच्या नामशेष होण्याचा धोका योग्यरीत्या समजून घेण्यासाठी शास्त्रज्ञांकडे आवश्यक ती माहिती नाही. या प्राण्यांना समजून घेण्यासाठी आणि त्यांचे संरक्षण करण्यासाठी तातडीने कृती करण्याची आवश्यकता आहे, असे अभ्यासाच्या प्रमुख लेखक कॅथरीन सेयर म्हणतात. गोड्या पाण्यातील भूदृश्ये पृथ्वीवरील सर्व ज्ञात प्रजातींपैकी १० टक्के प्रजातींची घरे असून अब्जावधी लोकांसाठी सुरक्षित पिण्याचे पाणी, उपजीविका, पूर नियंत्रण आणि हवामान बदल कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत.

या अभ्यासाचे निष्कर्ष ‘नेचर जर्नल’ मध्ये प्रकाशित झाले. जमिनीवरील सर्व जिवांसाठी ताजे, स्वच्छ पाणी महत्त्वाचे असले, तरी गोड्या पाण्यातील परिसंस्था पृथ्वीवर सर्वात धोक्यात आहेत.

अन्न, पाणी आणि संसाधनांची मागणी वाढत असताना गोड्या पाण्यातील पर्यावरण वाढत्या दबावाखाली आहे. दलदल, खारफुटी आणि खाऱ्या दलदलींसह विशेषतः पाणथळ जागा या नुकसानाचा फटका सहन करत आहेत. एका अंदाजानुसार १७०० पासून भारताच्या आकारमानाइतके क्षेत्र म्हणजे तब्बल ३.४ दशलक्ष चौरस किलोमीटर पाणथळ जागा नष्ट झाल्या आहेत. वुडविले कार्स्ट केव्ह क्रेफिश फ्लोरिडाच्या फक्त एकाच भागात आढळते, जिथे त्याला प्रदूषण आणि अधिवासाचा ऱ्हास यासारख्या धोक्यांचा सामना करावा लागतो. पाणथळ जागांचा नाश केवळ तेथे राहणाऱ्या प्राण्यांना आणि वनस्पतींनाच हानी पोहोचवत नाही, तर हवामान बदलाशी लढण्याची आणि पूर रोखण्याची क्षमतादेखील मर्यादित करतो. गोड्या पाण्याचे स्रोत अनेक आव्हानांना तोंड देत आहेत.

नद्यांवर पाणी साठवणे आणि धरणे वन्यजिवांसाठी उपलब्ध अधिवास कमी करत आहेत. कोलोरॅडो नदीसारख्या काही नद्या आता समुद्रापर्यंत पोहोचत नाहीत. या कमी होत चाललेल्या अधिवासांमध्ये राहणारे प्राणी सांडपाणी, औद्योगिक आणि प्लॅस्टिक प्रदूषणामुळे प्रभावित होतात. महासागरांपेक्षा गोड्या पाण्याच्या वातावरणाचा अभ्यास खूपच कमी केला गेला आहे. निरोगी गोड्या पाण्यातील परिसंस्थांना पाठिंबा देण्यासाठी गोड्या पाण्यातील प्रजातींचा डेटा संवर्धन धोरणांमध्ये आणि पाणी वापर व्यवस्थापनात सक्रियपणे समाविष्ट करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्व प्रजातींपैकी सुमारे १० टक्के गोड्या पाण्यावर अवलंबून असताना केलेला अभ्यास विशेषतः चार गटांशी संबंधित होता; जे जवळून संबंधित आहेत. डेकापॉड्स हा क्रस्टेशियन्सचा एक मोठा गट आहे, ज्यामध्ये खेकडे, कोळंबी, क्रेफिश, कोळंबी आणि लॉबस्टर यांचा समावेश आहे.

अनेक प्रजाती समुद्रात राहतात, तर काही जगभरातील नद्या आणि ओढ्यांमध्ये राहतात, जिथे सुमारे ३० टक्के प्रजाती नामशेष होण्याचा धोका आहे. डेकापॉड्ससाठी प्रदूषण हा सर्वात मोठा धोका आहे. कीटकांना मारण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या अनेक कीटकनाशकांमुळे जलमार्गांमध्ये खेकडे आणि कोळंबी माशांचेही नुकसान होते. विशेषतः हे प्राणी त्यांचे पंख सोडतात तेव्हा धोका वाढतो. ही रसायने माशांनादेखील धोका निर्माण करतात आणि त्यांच्या विकासावर, प्रजननक्षमतेवर आणि वर्तनावर परिणाम करू शकतात. ओडोनेट्स हा कीटकांचा एक गट आहे. त्यामध्ये ड्रॅगनफ्लाय आणि डॅमसेल्फलाई यांचा समावेश आहे.

ते हवाई भक्षक म्हणून सर्वात जास्त ओळखले जाऊ शकतात, तरी हे प्राणी त्यांचे बहुतेक आयुष्य गोड्या पाण्यातील नवजात शिशु म्हणून घालवतात. धोक्यात असलेल्या अर्ध्याहून अधिक प्रजाती जमिनींचे शेतीत रूपांतर झाल्यामुळे त्यांच्या अधिवासाचे नुकसान होण्याचा धोका वाढतो. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)

